ज्ञानेश्वरकन्या गोपी पंचलतिका एवं श्रीगुलाबरावमहाराज यांनी रचलेली श्रीमद्भागवतातील प्रथमस्कंधावरील गद्यपद्यान्वित विस्तृत टीका : आमंत्रणविलास व आगमनविलास

**(पैकी आमंत्रणविलास यष्टी ३ मध्ये समाविष्ट आहे)**

# प्रियलीलामहोत्सव : आगमन-विलास

**प्रथम पदन्यासः**

**॥ उपायोपेयनिरूपण ॥**

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

**वंदे वंदारुमंदारवृंदावनविहारिणम् ।**
**कलावस्मद्धितार्थाय यः श्रीज्ञानेश्वरराकृतिः ॥१॥**

॥ अभंग ॥

**सकल मंगळ तयाचिया पायीं । मुखीं शेषशायी नित्य ज्याच्या ॥१॥**
**सुलग्न सुदीन गोविंद हा चित्तीं । आघात ते होती हितमय ॥२॥**
**नारायणनामीं हारपलीं दुःखें । भरलेती सुखें लोक तीन्ही ॥३॥**
**हृदयीं प्रत्यक्ष आळंदीनिधान । मंगलाधिष्ठान ज्ञानेश्वर ॥४॥**

ओव्या :-

**माझी विनवणी संतचरणा । जरी कंटाळला जनिमरणा ।**
**तरी आवडी नारायणा । आठवावें प्रेमभरें ॥१॥**
**तया नारायणाचेनि कृपें । महाराज तुमचे चरण सोपे ।**
**एरव्हीं नाना पुण्यप्रतापें । साध्य न होती ॥२॥**
**संतीं दिधल्या अभयदान । मग हृदयीं न यावया कारण ।**
**समर्थ नाहीं रमारमण । आहे आपण श्रीगुरुचि ॥३॥ (य१४-५०)**
**संतचरणाची आवडी पोटीं । तयाचीं पळती विघ्नें कोटी ।**
**हृदयीं प्रगटे गोमटी । सांवळी मूर्ति ॥४॥**
**म्हणवोनि तुमचिया प्रसादेंकरून । प्रियलीलामहोत्सव मी करीन ।**
**देवोनियां कैवल्यभोजन । सत्कारीन साधु श्रोते ॥५॥**
**तुमचा अभय लाधला म्हणोनि । मियां श्रोतयां आणिले बोलावोनि ।**
**आतां कृष्णकथाभागीरथीजीवनीं । नाहाउनी शुद्ध आपण करा ॥६॥**



**हृदयीं ग्रंथकरणस्फूर्ति । हेचि आज्ञा तुमची पुढती ।**
**शिरीं वंदोनिया निश्चिती । ऐका मम भारती श्रोतयां म्हणे ॥७॥**

आर्या :-

**सूत म्हणे ऋषिवर्या ऐकुनिया प्रश्न हा नृपाळाचा ।**
**कालाचा जय करितचि प्रगटे वाग्बोध व्यासबाळाचा ॥१॥**

श्लोक :-

**शुक म्हणे दिन आजि महा भला । तुज असा पुसता मज लाभला ।**
**हरिकथा सरिता अतिपावनी । गिरिसुतावरमानसभावनी ॥२॥**
**जरि भवीं दिसति दोष अनंतही । तरिच भेटति येउनि संतही ।**
**यतिदया हृदया जहि सांपडे । हरीपदामृत तैं सुलभा पडे ॥३॥**

ओव्या :-

**म्हणोनि राया तुझ्या प्रश्नीं । सद्‌गुणाची उघड खाणी ।**
**दोषलेशाची काहणी । आम्ही कानीं नायको ॥८॥**
**भगवत्कथा प्रश्नाच्या ठायीं । दोषोत्पत्ति सर्वथा नाहीं ।**
**जो प्रेमळ कृपाळु शेषशाई । दोष तेथ उमटेल का ॥९॥**
**जरी कर्माचा प्रश्न असतां । तरी वाक्यार्थ दोष येवोनि पडतां ।**
**श्रुति-लिंग-वाक्य-प्रकरण बलवत्ता । पाहणें सर्वथा मीमांसका ॥१०॥**
**योग प्रश्नाचिया ठायीं । पात्रापात्र दोष पाहीं ।**
**आणि ज्ञान प्रश्नाचिया ठायीं । दुस्तर्कादि बहुदोष ॥११॥**
**विधिमुखानें ज्ञान सांगतां । तैं ब्रह्मीं येऊं पाहे पदवाच्यता ।**
**निषेधमुखें ज्ञान सांगता । तरी वृत्ति आकळितां शिघ्र नये ॥१२॥**
**चालेना वेदाची महाशक्ति । (य१४-५१) यासाठीं शोधावी लक्षणावृत्ति ।**
**मग तेथेहि विवाद उत्पन्न होती । अत्यंतचि ॥१३॥**
**वाक्यसहकृन्मनोवृत्ति । ज्ञान उपजवी ऐसे म्हणती ।**
**आणि मनसहकृद्वाक्यवृत्ति । ज्ञान उपजवी म्हणती कोणी ॥१४॥**
**तेथे वाक्यांत समन्वय कटकट । मननासाठीं तर्क खटपट ।**
**अयं घट अयं पट । हे वाद अचाट धावती ॥१५॥**
**ज्यास विषय नावडती फुडे । म्हणोनि त्रिविधतापें रडे ।**

घटमठादिवाद त्यापुढें । काय कोरडे करोनि ॥१६॥
जो गर्भवासाचे पाहोनि दुःख । घडीघडी विषयांतोनि काढी मुख ।
तयापुढें कर्कश तर्क । होती सकळीक व्यर्थचि ॥१७॥
जो वेदान्त पाहे मनोरंजना । तयासाठींच वादवल्गाना ।
जो निःशेष विटला भवप्रतिकूलवेदना । तेथ तर्कप्रमाणा अनुपयोगू ॥१८॥
तैसी नाही भगवत्कथा । जे ऐकतां वारी संसारव्यथा ।
सांगतां ऐकतां श्रोता वक्ता । दोघे सर्वथा हरिरूप ॥१९॥
चित्तासी आवडती उत्तम गुण । प्रभु तयाचें अधिष्ठान ।
त्याच्या कथेची चर्चा गहन । चालता कवण विटेल ॥२०॥
नास्तिक म्हणती ईश्वर नाहीं । परी संकटीं धांवतां पाहिजे त्यालाही । हा गुण
आवडे मनासी म्हणोनि पाही । मनोवच्छिन्न चैतन्य अधिष्ठान त्या गुणा ॥२१॥
मनास आवडती जे जे गुण । मनोगत साक्षि त्यांचें अधिष्ठान ।
''विवक्षितगुणोपपत्तेश्च'' म्हणोनि । ब्रह्मसूत्र प्रमाण ये विषयीं ॥२२॥
आमुचा ईश्वर तोचि एक । जे गुण पुरुषासी पाहिजेत देख ।
त्या सर्वांचे अधिष्ठान एक । ते नाहीं म्हणोनि चालेना ॥२३॥
जो जो म्हणेल ईश्वर नाहीं । मी पुसे तयाची धरोनि बाही ।
'आवडी-वृत्ति' लवलाहि । आहे कीं नाहीं मनीं तुझ्या ॥२४॥
तुज आवडे कीं नावडे सत्य भाषण । तुज आवडे की नावडे परोपकरण ।
तुज आवडे की नावडे मधुर बोलण । योग्य समाधान तुज रुचे कीं न रुचे ॥२५
तुज आवडे कीं नावडे पूर्णसुख । तुज पाहिजे कीं नको संकटीं रक्षक ।
(य१४-५२) तुज पाहिजे कीं नको तापहारक ।
कोणी सर्वज्ञ एक तुज रुचे कीं न रुचे ॥२६॥
तुज वाटो नाहीं अथवा आहे । माझा आवडीविषीं प्रश्न लवलाहे ।
हे गुण मनी आवडती कीं नावडती पाहे । उत्तर याचे देऊनी ॥२७॥
जरी नावडेल तुज सुखदाता । तरी चोरीसी येऊं देई स्वधर्मता ।
तुज नावडे जरी सत्यवक्ता । तरी जे फसविती त्यांचा संग धरी ॥२८॥
जरी आवडती तुज हे गुण । तरी गुण न राहती द्रव्याविण ।
या सर्व गुणांचे अधिष्ठान । तें द्रव्य कोण सांग पां ॥२९॥



जरी म्हणसी सर्व कोठे नाहीं । एक एक गुण एखाद्या ठायीं ।
तरी तो एक एक गुण त्या ठायीं । प्रगट व्हावया कवण हेतु ॥३०॥
जरी तुज सांपडे एक एक गुण । तरी त्या सर्वांची आवडी ठेवी मन ।
म्हणोनि सकल गुणेच्छावच्छिन्न । ते चैतन्य अधिष्ठान सकल गुणा ॥३१॥
या लागीं सर्वज्ञ कैवल्यदानी । तुझिया गळा पडला येवोनि ।
असो आस्तिका नास्तिका आवडे चक्रपाणी । आवडे निर्वाणी सारिखा ॥३२॥
आस्तिक विश्वासें भजति देवा । नास्तिक म्हणती असेल तरी दावा ।
परी नको आम्हासी ऐसा ठेवा । कोणी न म्हणे ॥३३॥
एवं ईश्वर जरी न दिसे । तरी तयाचे गुण जे सरिसे ।
आस्तिका नास्तिका दोघाही असे । आवडी त्याची ॥३४॥
म्हणोनि द्रव्यासहित सद्‌गुण कथा । ते आस्तिका उपयोगी तत्वता ।
आणि द्रव्यासहित निर्गुण कथा । ते नास्तिका उपयोगी ॥३५॥
म्हणोनि निश्चयें दोघाप्रति । सत्कारें या म्हणो माझी भारती ।
याची साठी प्रश्नाप्रति । प्रशंसिती व्याससूनु ॥३६॥
जे जे आवडे आपणाप्रति । त्यांचे दोष दाखवितां निश्चिति ।
तरी दुर्लक्षचि लोक करिती । गुण घेती वेचोनी ॥३७॥
मायेसी आवडे आपुला नंदन । म्हणोनि त्याचे उदारपण ।
मनीं न आठवी आवडी करून । घाली स्तन पुत्र वदनीं ॥३८॥(य१४-५३)
कामुका आवडे सुंदर कामिनी । मग इतर दोष तो चित्ती नाणी ।
तैसे जे जे गुण आवडती मनीं । तेथ दोष निर्वाणी स्फुरतीना ॥३९॥
सकल सद्‌गुणा अधिष्ठान । माझा दयाब्धि आळंदीरमण ।
यालागी याचे चरित्रगान । निववोत कान सकळांचे ॥४०॥
शुकवचन कीं तुझा हा प्रश्न । सकल दोषाचें अपहरण ।
येथ दोषचि उमटेना म्हणोन । वरिष्ठाहून वरिष्ठ हा ॥४१॥
जेव्हां तुवा हा प्रश्न केला । तेव्हां सर्वचि उपकार तुज घडला ।
आतां पुढें जो श्रवणपुण्यवृक्ष वहिला । त्याचे फळ न वर्णवे ॥४२॥
''कृतं लोकहितं'' या पदावरून । हाचि अर्थ निघे संपूर्ण ।
कीं लोकहिताचे श्रेयनिधान । जे तुज आघवे सांपडले ॥४३॥

एरव्ही संसारी लोकांची रीति । सांगतां कींव येत चित्तीं ।
तयांचे चाळे वर्णावे किती । होतसे मति सविस्मया ॥४४॥
पण्यांगनांचे उत्तम गायन । तेचि जयाचे कर्णभूषण ।
जयांच्या कवित्वा अधिष्ठान । लालान्वित वदन स्त्रियेंचे ॥४५॥
स्त्रीस्तन मांसाची मुटकुळी । तीचि जयांचि चेंडुफळी ।
वित्तचिंता चित्तीं धुमाळी । शिक्षण माळी जयांची ॥४६॥
सकळ चोरांचे अधिष्ठान । सकळ अवगुणा उदार पूर्ण ।
तें धन जयांची हृदयठेवण । कपटी व्यापारी शिष्य ज्यांचे ॥४७॥
छत्र चामर मस्तक भारू । ते जया उपदेशक गुरु ।
प्रतिग्रहार्थ भिक्षातरु । ते उपाध्ये जयांचे ॥४८॥
सदा जारभाव वेश्यांचे अंतरीं । त्यांचिया करें पत्निगळा गळसरी ।
जयांच्या धर्मशास्त्राची थोरी । एवढी आहे ॥४९॥
जयांचा यज्ञ रंभेसाठीं । जयांच्या पदरीं साधूंच्या कोटी ।
मृत्युंजयाच्या जपासाठीं । अथवा गांठी सांवरी ॥५०॥
जे श्रीखंडादिभोजन । प्रातः शौचकुपा देती दान ।
जयांचे कोमल साजिरे वचन । कामिनी मन भुलवाया ॥५१॥
जयाच्या गृहांतील दीपांची स्थिती । स्नेह तेलची जाळी वाती । (य१४-५४)
जो कपटे भरला पूर्ण चित्तीं । तो वाटाड्या जयाचा ॥५२॥
जयाच्या भोंवती रांडापोरं । तोचि सर्व सुखाचें बिढार ।
जयाचे नाक आले ओठावर । तोचि वडील जयाप्रति ॥५३॥
जी योनिद्वारीं उपजवी साची । तीचि माता होय जयांची ।
असो ऐसी स्थिती सांसारिकांची । सहस्रमुखा न वर्णवे ॥५४॥
परी अरण्यास चहूंकडोनि । अवचिता लागता महावन्ही ।
आंत सांपडली कुरंगिनी । द्वारीं येऊनि बैसला व्याधू ॥५५॥
तैसा या देहमहावनीं । संशय कंटकाचिया आंगणीं ।
फुंकत असतां तृष्णा सर्पिणी । मलगुंठित कुरंगिणी ती ॥५६॥
हातीं घेउनी पाश थोर । सवे घेवोनि सहा व्याघ्र ।
कालव्याधें केलें बिढार । बुद्धिदारीं बैसोनि ॥५७॥





ऐसिया भययंत्रीं सांपडतां । अभय इच्छा उपजेल चित्ता ।
तरी दीन होवोनि कमळाकांता । धांव ताता म्हणावे ॥५८॥
तो भेटेल काय करुणाघन । म्हणोनि तळमळ रात्रंदिन ।
कोणी सांगेल काय त्याचे गुण । यालागीं श्रवण उदित व्हावे ॥५९॥
बुद्धिपत्नि वांछील भूषण । तरी नारायणगुणाचे कर्णसुमन ।
लेववोनी शोभा पूर्ण । घेईजे आपण दर्शनसुख ॥६०॥
वाणी एक दुसरी कामिनी । तिस कृष्णकथामृत पाजुनी ।
मग अधरसुधासुखा लागुनी । चुंबन निर्वाणी घेईजे ॥६१॥
केव्हांचि नुपजावी भीति । ऐसे जरी वाटेल चित्तीं ।
तरी अर्धही घडी न व्हावी विस्मृति । यास्तव गीतीं शिव गावा ॥६२॥
वाटेल जनाकडोनी घ्यावा मान । तरी हे सांगावें हरिगुणगान ।
वाटेल कीं वर्णावे आवडी करून । तरीहि तोचि वर्णावा ॥६३॥
वाटेल करावे भोजन । तरी हरि स्मरावा माय म्हणोन ।
वाटेल कीं घ्यावे चुंबन । तरी कांत म्हणोन हरी ध्यावा ॥६४॥
वाटेल करावी वंशवृद्धी । तरी कृष्णीं वाढवावी पुत्रबुद्धी ।
वाटेल पाठिराखा त्रिशुद्धि । तरी कृष्णकृपानिधि बंधु म्हणिजे ॥६५॥
वाटेल कोपावे जरी चित्तीं । (य१४-५५) तरी ऐसे म्हणावे देवाप्रति ।
कीं इतुका वेळ दुरी मजप्रति । कोण्या अन्यायें टाकिले त्वां ॥६६॥
मी जरी असलो अती अपराधी । तरी त्वा गोपीवरी धरिली पत्निबुद्धि ।
मिया मातृसेवा न केली त्रिशुद्धि । तरी त्वांहि वधिली पुतना माता ॥६७॥
म्यां नाहीं पोसिले आपुले गोत । तरी त्वांहि केला मामाचा घात ।
मग माझे अवगुण आठवोनि मनांत । दुरी टाकिसी काय म्हणोन ॥६८॥
एवं भगवंतावांचुनि कही । काम क्रोध मोहा आश्रयो नाहीं ।
ऐसी जयाची चर्या पाही । शपथ लवलाही तोचि मुक्त ॥६९॥
म्हणोनि नारायणाचे नाम । बापा सकलांचा पुरवी काम ।
आणि तुझाही तो प्रश्नक्रम । यास्तव झाले हित परम त्रिलोकांचे ॥७०॥
भगवन्नामाचि अगाध ख्याति । अमंगलाही मंगल स्थिति ।
सद्गुणाचिया एके पाति । दोषहि होती सद्गुणचि ॥७१॥

(मंत्रशास्त्र)

एथ ऐसे म्हणेल कोणी । कीं शब्द जरी शक्तींची खाणी ।
तरी मंत्र नियमावांचुनी । शब्दोपयोग कांही नसे ॥७२॥
आपुलिया नामाक्षरापासून । चार चार अक्षरे मोजून ।
करावे मंत्राक्षराचे गणन । मग संख्येवरून फळ जाणे ॥७३॥
पहिल्या अक्षरीं येत सिद्धता । दुसऱ्या अक्षरी साध्यता ।
तिसऱ्या अक्षरीं सुसिद्धता । असे रिपुता चवथियाते ॥७४॥
एवं सिद्ध-साध्य-सुसिद्ध-अरी । ऐसे क्रमें चारी चारी ।
एवं शब्द घालोनी चक्री । मंत्र साचारी निवडावा ॥७५॥
सिद्धमंत्र फळे कालेकरून । साध्यमंत्र जप होते (होतां) जाण ।
फळें किंवा चुकलिया क्षण । फळही न होय ॥७६॥
सुसिद्धमंत्र स्मरणें फळत । रिपुमंत्र जापकनाश करीत ।
आदि मध्यांत अक्षरांत । असे यांतही तारतम्य ॥७७॥
असो हे मंत्रशास्त्र विस्तरण । सिद्धारिचक्र पाहिल्याविण ।
निरुपयोगी हरिनामस्मरण । म्हणे तो जाण अतिमूर्ख ॥७८॥
एथ नाहीं प्रत्यक्ष अनुमान । निर्णय (य१४-५६) केवळ शब्दावरुन ।
मंत्रशास्त्र शब्दप्रमाण । तरी शब्दानेंच समाधान आम्ही करूं ॥७९॥
नामावरुन सिद्धारि घेणें । परी नामापूर्वी ते कैसे जाणणें ।
आतां जन्मनक्षत्राधिष्ठिणें । तरी वासनेस जन्म नाहीं ॥८०॥
नाम करी सत्ववृद्धि । सत्व तंव अंतःकरण सिद्धी ।
म्हणोनि नामासी सिद्धारी प्रसिद्धी । लागो न शके ॥८१॥
किंवा केशवनारायणादि चोवीस । नामें संध्येंत जपणें सकळास ।
सिद्धारिचक्र पाहतां तयास । संध्याहनन होईल कीं ॥८२॥
प्रणव व्याहृति वेदमाता । ते आहेत तिन्ही वर्णाचिये माथा ।
तया सिद्धारी चक्रीं घालतां । तरी वर्णव्यवस्था बुडेल ॥८३॥
''यावन्ति वेदाक्षराणि तावन्ति हरिनामानि''। म्हणोनि सिद्धारि चक्र न लागे
नामालागुनी । संतीं नामहिमा वर्णितां क्षणीं । नाहीं नाम चक्रीं घातले ॥८४॥
मंत्र आणि छंद शास्त्राचा । निश्चये संबंध असे साचा ।





त्या छंदांत निर्णय शुभाशुभाचा । केला आहे ॥८५॥
छंदाआधीं वर्ण येतां । तरी अशुभ तो होय सर्वथा ।
परि तोचि हरिनामीं आरंभितां । शुभतम होय ॥८६॥
हरिःॐ इत्यादि म्हणोन । आरंभिती वेदपठण ।
तैसे जगण आधीं येता जाण । येत अशुभपण छंदाते ॥८७॥
परी ''श्रियःपति'' या शब्देकरुन । माघकाव्यांत आरब्धजगण ।
सकळ अमंगळा निर्दलन । केले नारायणस्मरणें ॥८८॥
मंत्राची मंत्रता शब्दाधीन । छंदासी शुभता नामाधीन ।
त्या नामासी सिद्धारिचक्रसंस्थान । कल्पांतीहि घडेना ॥८९॥
सकल मंत्राचिया आधीं । पाहिजे प्रणवाची सिद्धि ।
त्या प्रणवाचियाहि आधीं । हरि म्हणोनि वेदपठण ॥९०॥
म्हणोनि भगवन्नामासी कही । रिपु आदि दोष शिवलेचि नाहीं ।
जो जपेल तयासी लवलाही । सुसिद्धचि ते ॥९१॥
''कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे ।
जे नांवचि नाही पापाचे । ऐसे केलें'' ॥९२॥ (य१४-५७)
यास्तव अभय वासना जरी । मदीय प्रिय चिंतनीय तरी ।
म्हणोनि प्रश्न प्रवृत्त तद्वैखरी । जगहित करोनी कृतार्थ ॥९३॥
येरव्ही तरी जगाच्या ठायी । सर्वथा सुखाची वार्ताचि नाही ।
येथ येवोनि शेषशाई । नाठविता विफलायु ते ॥९४॥
पाहोनि सांसारिक श्रेणी । परमाश्चर्य वाटते मनीं ।
कवणिये लोभा गुंतोनि प्राणी । चक्रपाणि नाठविती ॥९५॥
मेळविता रक्षिता व्यय करिता । दुःखावधिं धनाच्या माथा ।
जे जे उपाय कीजेति सुखार्था । ते दुःख तत्वता वाढविती ॥९६॥
मुख्य विषयाचे हेचि लक्षण । सुख तरी लाभे अर्धक्षण ।
वासना दाखवी संपूर्ण । यावन्मरण सोडिना ॥९७॥
कां दांत असती मुखीं तोंवरी । तांबुलाची रुची बरी ।
परी कुटोनि खावया निर्धारी । वासना वार्धक्यीं सोडिना ॥९८॥
आणि वासनेचे हेचि लक्षण । सर्वदा नोहे समाधान ।

**जोवरी नोहे शांतिसंपन्न । तंव सुख निर्वाण श्रोत्रीं नायको ॥९९॥**
**जे रजोगुणाचे केले । कामक्रोधेचि निर्मिले ।**
**जे स्वार्थासाठीं जाहले । कुत्री तयाची ॥१००॥**
**जन तयाचे विश्वासे करुन । नेणोनिया स्वहित पूर्ण ।**
**जो भक्तवत्सल करुणाघन । त्याची आठवण विसरले ॥१०१॥**
**जो ज्ञा सकल सद्गुणाधिष्ठान । जो निष्कांचनाचा मुक्तधन ।**
**तो विसरोनि नारायण । लोभे प्राण पोसितो ॥१०२॥**
**राया तुझिये कुळीची रिती । आधीपासोनि भगवद्भक्ति ।**
**म्हणोनि प्रश्न करताचि निश्चिती । पावन त्रिजगती त्वां केले ॥१०३॥**
**आत्मानात्मविवेक करितां । जरी नाठवी रमाकांता ।**
**तरी शपथ वाहोनि कृतार्थता । जवळी सर्वथा नाकळे ॥१०४॥**

शिष्य :- भगवन् ! कर्म तथा उपास्ति का परिणाम मल व विक्षेप की निवृत्ति है, तहां असद्वासनारूप जो मल है सो कर्मसे निवृत्त **(य१४-५८)** होई जावे है. और सद्वासनाबाहुल्यरूप जो विक्षेप सो उपासना करी निवृत्त होई जावे है. तत्रापि अव्यापक विक्षेप तो सगुणोपासना करी निवृत्त होवे है. और व्यापक विक्षेप तो निर्गुणोपासना करी निवृत्त होवे है.

यद्यपि ब्रह्मते कोई पदार्थ व्यापक नही, तथापि मनको विकृतिरूप और बुद्धि को प्रकृतिविकृतिरूप कपिलानुयायी मानते है. तातैं मन अव्यापक और बुद्धि मन कों अपेक्षा व्यापक है. सहेतुकरी मनोगत विक्षेप कों अव्यापकता और बुद्धिगत विक्षेपकूं व्यापकता संभवे है. यद्यपि वेदान्त में मन को संशयस्वरूप कहा है और बुद्धि को निश्चयरूप कहा है, तातैं निश्चय विक्षेपके विरोधी होने तैं बुद्धिगत विक्षेप कहना संभवे नहीं और सांख्यका मत श्रुतिविरुद्ध होने तैं मानना नहीं, यह शंकाभी असमीचीन है.

काहेतैं बुद्धि और मन दोनो भी अंतःकरण के विभाग है. यद्यपि मन संशयरूप है और बुद्धि निश्चयरूप है तातैं बुद्धि और मन का परस्पर विरोध है. दो विरोधी पदार्थन तैं वस्तु की घटना संभवे नहीं. तथापि यहां साधर्म्यवैधर्म्यबिचार बलवान है. बुद्धिविशेष सत्त्वगुण का परिणाम है, और मन विशेष रजोगुणका परिणाम है ।



यद्यपि कोई वेदान्तग्रंथ में रजोगुण का परिणाम मन को कहां नही तथापि प्राणसमष्टि रजोगुण का परिणाम है व मन प्राणका सहचारी है. बुद्धि भी प्राणकी सहचारिणी है, यह कहना समीचीन नहीं, काहेतैं प्राणायामकरी मनोविकारकी शान्ति होती है; और बुद्धि मे कऱ्या हुवा ध्यानका निश्चय बन्या रहता है; जातैं प्राणके निरोध करी बुद्धि का निरोध होता नहीं इस हेतुकरी मननविक्षेप राजस है और बुद्धिविक्षेप सात्विक है. साम्याधिकरणमेहि पदार्थनका परस्पर विरोध बने है विशिष्ठाधिकरण में बने नहीं. जातैं संशयनिश्चयरूप मनोबुद्धिपर्याय अंतःकरणकी वेदान्तोक्त सिद्धि संभवे है.

तथापि संशयका अर्थ **(य१४-५९)** द्विकोटिक ज्ञान है, और विक्षेपका अर्थ सद्वासनाबाहुल्य पूर्वकरी आये है. वासना द्विकोटिक ज्ञानरूपिणी रहती नहीं, जातैं क्षणक्षण निश्चयभिन्नताहि बुद्धिगत विक्षेपका अर्थ है, सो बुद्धिगत विक्षेप निर्गुणोपासनातै निवृत्त होवे है. पश्चात् आवरणकी निवृत्ति ज्ञानते होवे है. ज्ञानीको कोई कर्तव्य श्रुतिमाता कहती नहीं. सो ज्ञान विवेकके अधीन है. सो आत्मानात्मविवेक सांख्यके अधिन है; तातै सांख्यसिद्ध ज्ञानीको कोई कर्तव्य नहीं.

उपास्ति तो भावनाका स्वरूप है; भावना मै करता हूं इस प्रत्ययके अधीन है. सो कर्तृत्व धर्म अविद्याकरी उपजे है. वस्तुतो आत्मा तो अकर्ता है. तातै आत्मज्ञान अनन्तर भावनारूप उपास्तीकी सिद्धि नहीं. याप्रकार निर्गुणरूप भावना की सिद्धि की नही. तो सगुण उपास्तीका ज्ञानीको उपयोग नहीं. याको क्या कहना है ?

श्रीगुरु :- वत्सा ! एवढ्या दीर्घ संशयाचें प्रयोजन नव्हते. पूर्व विलासांचे ठायी स्थळी स्थळी निरूपिलेल्या भक्तिविषयीं विक्षेप बाहुल्यास्तव तुला अद्यापि आक्षेप उत्पन्न होतात परंतु त्वां काढलेले सर्व आक्षेप निरर्थक आहेत; कारण कैवल्याचे लक्षण तूं कसे करतोस? दुःखाची निवृत्ति जर कैवल्याचे लक्षण करीत असशील तर योग्य नाही कारण निवृत्ति अभावरूप असते आणि अभावाचे ज्ञान अधिकरणज्ञानाधीन किंवा प्रतियोगीज्ञानाधीन असते आणि प्रतीयोगीज्ञान चित्ताचे ठायीं रहात असते. दुःखाभावाला मोक्ष मानला असतां दुःखाभावाचे प्रतियोगी जे दुःख ते मानसगोचर नित्य राहील. म्हणजे मानसिक दुःखावछिन्न-

पुरुषप्रत्यय असें कैवल्याचें लक्षण करावे लागेल. ते तर सर्व कैवल्यवादियांना अनिष्ट आहे. म्हणून दुःखनिवृत्ति आणि परमानंदप्राप्ती असे, मोक्ष भावरूप आहे म्हणणाऱ्या **(य१४-६०)** तुला, त्याचें लक्षण करावे लागेल; तसें केलें असतां आनंदाची अभिव्यक्ति विवेकाधीन नसून आनुकूल्यावच्छिन्न आहे.

सांख्यामध्यें केलेला आत्मानात्मविवेक बुद्धि करिते कीं पुरुष करितो ? प्रथम पक्ष स्वीकारला तर बुद्धि प्रकृतीचे कार्य असल्यामुळें आपल्या कारणरूप प्रकृतिपासून पुरुषाला वेगळे करण्याचे सामर्थ्य तिचें अंगी येत नाहीं. आणि दुसरा पक्ष स्वीकारला तर प्रकृति मला दुःखरूप आहे म्हणून मला नको, असे द्वेषरूप ज्ञान नित्यच पुरुषांचे ठिकाणीं मानावे लागेल. **नित्यच दुःखाचे चिंतन करणें याहून दुःख दुसरे नाहीं,** म्हणून केवळ विवेकज्ञानानें सर्वथा सुखप्राप्तिरूप मोक्ष संभवत नाहीं. एवढ्याकरितां प्रकृति अनुकूल करून घ्यावी तर, पुनः संसार संभवेल; तात्पर्य, अधिष्ठानाविरोधी विषमसत्ताक-सदसद्विलक्षण अनिर्वचनीय अविद्या सकार्य मिथ्या कळल्यावांचून विवेकज्ञान मुक्तिप्रद होत नाहीं. आणि तसे कळण्याकरितां भक्तीची अपेक्षा आहे. कारण सामान्यरूप अधिष्ठान कल्पित वस्तूच्या विरोधी नसते. आणि विशेषरूप अधिष्ठान विरोधी असते. ज्याप्रमाणें शिंपेचा इदं अंश रुप्याच्या विरोधी नसतो परंतु नील पृष्ठत्वादिक जे शिंपेचे धर्म ते रुप्याच्या विरोधी असतात. तद्वत् सामान्य चैतन्य अविद्येच्या विरोधी नसून सच्चिदानंद विशेष प्रत्ययच तिच्या विरोधी आहे. पैकीं परोक्षज्ञानानें कळलेला सदंश अविद्येच्या असदंशाची निवृत्ति करितो आणि अपरोक्षज्ञानानें कळलेला चिदंश तिच्या जडांशाची निवृत्ति करतो. परंतु अवशिष्ट अविद्येच्या दुःखाशी चिदंश विरोधी नसल्यामुळें व ज्ञान चित्प्रकाशरूप असल्यामुळें, ज्ञानाने निवृत्ति संभवत नाहीं.

त्या दुःखाच्या विरोधी एक आनंदच आहे. तो आनंद अभावरूप आहे किंवा भावरूप आहे ? यांत प्रथम पक्ष स्वीकारला असतां दुःखाभावरूप आनंद मानणाऱ्याच्या मताप्रमाणें **(य१४-६१)** दुःखाभावानें दुःखाची निवृत्ति होते असे मानावे लागेल; पण वस्तूच्या अभावानें वस्तूची निवृत्ति होत नाहीं. निवृत्तिचे साधन दुसरें पाहिजे. घटाचा प्रध्वंसाभाव, घटाच्या निवृत्तिचे कारण नसून, मुद्गरादिक तिची साधने आहेत. तद्वत् दुःखाभावाने दुःखाची निवृत्ति संभवत



नसून दुःखाची निवृत्ति करणारा, दुःखाच्या विरोधी भावरूप आनंदच मानला पाहिजे.

तोहि सामान्य मानतां येत नाहीं. कारण सामान्य अधिष्ठान भ्रमाच्या विरोधी नसते असें आम्ही सांगितलें म्हणून तो विशेषच मानला पाहिजे; आणि सामान्याचे विशेष कळण्याकरितां उपाधीची अपेक्षा असते. यद्यपि वस्तु निरुपाधिक आहे, तथापि बाधक उपाधीनें जसा संसार उत्पन्न होतो तसा साधक उपाधीनें संसार उत्पन्न होत नाहीं; म्हणून साधक उपाधि निरुपाधिक वस्तूच्या विरोधी नाहीं. पैकीं ब्रह्म आहे इत्यादि वाक्य सदंश ज्ञानाला निमित्तभूत आहे व मी ब्रह्म आहे इत्यादि विचार चिदंशज्ञानाला निमित्तभूत आहे. परंतु आनंदाच्या अभिव्यक्तीला निमित्तभूत प्रेमांवाचून दुसरें नाहीं म्हणून असज्ज्ञड निवृत्यनंतर ज्ञानियालाही दुःखनिवृत्यर्थ आनंदाभिव्यक्तिरूप सगुण परमात्मनि प्रेमरूपभक्त्यपेक्षा अनिवार्य आहे.

॥ अभंग ॥

**निवालो निवालो स्वामीच्या वचनें । संशयाचें पेणें उठवोनि ॥१॥**
**शंका समाधान विचारावयव । प्रेमामध्ये थांव न लगे या ॥२॥**
**जंववरी साच भूक नाहीं पोटी । तोवरी चावटी अन्नप्रश्न ॥३॥**
**भूक लागलिया मुकेंपणें खाय । वाढ वाढ माय म्हणोनियां ॥४॥**
**तैसी जंववरी नाहीं तळमळ । तंववरी हे जाळ विचाराचे ॥५॥**
**संसार केवल वृश्चिकमंचक । ऐसे जरी एक क्षण वाटे ॥६॥** (य१४-६२)
**तरी नारायणा आळवील मन । जळाविण मीन जयापरी ॥७॥**
**ज्ञानेश्वरवाणी नेत्रीं प्रेमपाणी । येतां मिळे खाणी स्वानंदाची ॥८॥**

ओव्या :-

**श्रीगुरु म्हणती शिष्यराया । तुझिया भक्तिची प्रशंस्य चर्या ।**
**लोकार्थ घेवोनीयां संशया । ज्ञानभक्ति समन्वया करिसी ॥१०५॥**
**आतां तो अद्वैतचूडामणि । जो नारायणचरणप्रेम खाणी ।**
**तो महाराज व्यासनंदन मुनि । काय वदला ते ऐके ॥१०६॥**
**जैसी विवेकज्ञानेकरून । न कृतार्थता भक्तीविण ।**
**तैसा वृत्तिरोध करून । नोहे भक्तीविण जीव सुखी ॥१०७॥**

(गद्य) :- शिष्य :- भगवन् ! आपण जें माझें समाधान केले तें वेदान्तज्ञानाला लागून असल्यामुळें, सांख्योगाविषयीं लागूं होत नाहीं; कारण सांख्यसूत्राच्या प्रथमाध्यायांत ईश्वराचा निषेध केला आहे आणि सांख्यपदार्थच योगामध्यें घेतले असून यद्यपि त्यांत ईश्वराचा स्वीकार आहे. तथापि ईश्वराचे प्रणिधान विकल्पानें सांगितलें आहे. विकल्पविधि मुख्यविधिपेक्षां बलवान् नसतो, म्हणून वेदान्तज्ञानापेक्षां भक्ति बलवान आहे हे मला जरी मान्य असले तरी सांख्ययोगापेक्षां बलवती दिसत नाहीं.

श्रीगुरु :- तुझ्या बुद्धीला संशय काढण्याची संवयच पडली असल्यामुळें मलाही उत्तर देण्याची संवयच पडली आहे. सांख्यकार कपिलाला तूं शहाणा समजतोस किंवा मूर्ख समजतोस? दुसऱ्या पक्षीं त्यांचे वचन प्रमाण नाहीं म्हणून तें तुला शंका काढण्यासाठीं, कक्षी करतां येणार नाहीं. आणि प्रथम पक्ष स्वीकारला तर जसें त्यांनी प्रथम त्या अध्यायांत ईश्वराचें खंडण केलें आहे तसें त्याच अध्यायांत **''ईदृशेश्वरसिद्धिः सिद्धा''** या दुसऱ्या सूत्रांत ईश्वराचें मंडणहि केले **(य१४-६३)** आहे. हा स्वग्रंथविरोधपरिहार तुला केला पाहिजे.

आमचे मत तर असें आहे की, कपिलानीं जें ईश्वराचें खंडण केले ते वस्तुतः नसून ज्वरावर दूध मागणाऱ्या लेकरांना आई जशी ते कडु आहे म्हणून सांगते, परंतु वस्तुतः तें कडू नसते तद्वत् ईश्वराजवळ ऐश्वर्य आहे असें समजून मूर्ख लोक नित्यविषयच मागून घ्यावे म्हणून त्याची भक्ति करितील आणि विषयाचा तर वासनारूप दुःख उत्पन्न करणें हा स्वभावच आहे व वस्तु आहे तोंपर्यंत तर स्वभावाची निवृत्तिही संभवत नाही. म्हणून ईश्वराच्या ऐश्वर्याचे ठिकाणीं देखील वैराग्य उत्पन्न व्हावे एवढ्या करितां पहिल्या अध्यायांत **''ईश्वरासिद्धेः''** या सूत्रानें परमेश्वराचा निषेध केला, म्हणजे **''ईश्वराभावात्''** असें सूत्र केलें नसून **'ईश्वरासिद्धेः'** असे सूत्र केलें आहे. याचें कारण असें आहे की. कर्माने मिळालेलें ऐश्वर्य केव्हांना केव्हां तरी संपावयाचेच अशी श्रुति आहे. म्हणून तुम्हा जीवांना कधीहि नित्य ऐश्वर्य कर्मानें मिळूं शकणार नाही. हा त्या सूत्राचा अर्थ आहे; आणि देवहूतीला कपिलांनी जो योग सांगितला त्यांतही ईश्वरभक्ति स्पष्ट सांगितली आहे.

आतां दुसरीही तुझी शंका बरोबर नाही. कारण योगशास्त्रामध्यें



**'ईश्वरप्रणिधानाद्वा'** या सूत्रांतील **'वा'** शब्द निश्चयार्थी आहे. विकल्प गौणविषयाचें ठिकाणीं संभवतो. मुख्य विषयाचें ठिकाणीं संभवत नाही. योगशास्त्रांत जीवापेक्षां ईश्वराला कोठेच गौण मानलेले नाही. पुनः विभूतिपादांत योगभाष्यकारांनी असेंही सांगितलें आहे की, ईश्वरप्रणिधानानें जो युगपद् उंच भूमिकेवर जातो त्याला खालच्या भूमिकेचा अभ्यास करण्याची आवश्यकता नाहीं. तर मग प्रथम जीवप्रयत्न सांगून ईश्वरप्रणिधान नंतर कां सांगितलें, असा आक्षेप करूं नको, कारण पहिलेच जर ईश्वरप्रणिधान सांगितलें असते **(य१४-६४)** तर मग जीवानीं प्रयत्न न करतां, परमेश्वरानीं आपणच आम्हाला उद्धरून घ्यावे असा समज झाला असता; एवढ्याकरितां जीवप्रयत्नांत तिचा आरंभ होऊन ईश्वरप्राप्तीत तिची समाप्ति व्हावी म्हणून ईश्वरप्रणिधानाचा आनन्तर्यभाव सांगणें असम्यक् नाहीं.

मनाचे ३ संवेग

ओव्या :- **प्रभुवाणीनें शंका गेली । आतां पराशरसूनुनंदनबोली ।**
**ऐकाया सांवरली । श्रोतृवृत्ति ॥१०३॥**
**श्रीगुरु म्हणती तरी ऐके । मनाचे संवेग तीन निके ।**
**मृदु मध्य तीव्र देखे । ही पर्याये तयांची ॥१०४॥**
**ध्यान करितां कर्तृत्व स्थिति । तोंवरि संवेग मृदुस्थिति ।**
**सजातीयप्रवाहवृत्ति । मध्यस्थितिसंवेग हा ॥१०५॥**
**आपली होय विस्मृति । अखंड ध्येयाची स्फुरे स्फूर्ति ।**
**याची नांव तीव्र संवेग म्हणती । समाधिस्थिति बोलिजे ॥१०६॥**
**बळें लाविताचि मन । योगीं कष्ट होती दारुण ।**
**तेचि प्रेम होता उत्पन्न । आपणचि मन तेथ धांवे ॥१०७॥**
**म्हणवोनि श्रीहरी चरणाविण । योगीं नाहीं समाधान ।**
**आळंदीवल्लभाची आण । वाहोनियां वदतसे ॥१०८॥**
**योगीं इंद्रियें कोंडिती । ते कोंडितांचि कष्टी होती ।**
**भक्त भगवंती अर्पिती । तेणें होती नित्यमुक्त ॥१०९॥**
**अवघ्या जगाचा द्वेश करून । जेव्हां साधावे एकटपण ।**
**तेव्हां योगाचे ध्यान । करावया अधिकार ये ॥११०॥**

तैसी नाहीं भगवद्भक्ती । श्रीकृष्ण पहावा सर्वांभूतीं ।
एकांती लोकांतीं हृदयांती । अखंड शांती विराजे ॥१११॥
वाणीनें गावे श्रीहरिगुण । निर्माल्यसुगंध घेवो घ्राण ।
नयनीं पहावा नारायण ।पुष्पादिकीं पूजिला ॥११२॥
हृदयीं भरताचि वनमाळी । दोहीं करें वाजवी टाळी ।
प्रेमें नाचतां धुमाळी । होय रांगोळी महत्पापा ॥११३॥
ऐसे करितां हरिस्मरण । सहज हरे भूक तहान ।
तेणे उपस्थादि दोन्ही लीन । सहजचि होती ॥११४॥ (य१४-६५)
एवं सहजचि इंद्रिये येति हातां । चित्त न रोधितां स्वानंदता ।
एवढिया सांडुनि कृपावंता । मूर्ख भिन्नपथा आश्रयिती ॥११५॥
म्हणोनि सांख्ययोगाचे फळ । श्रीहरीचे चरणकमल ।
सर्व धर्मांचा सार केवळ । गोविंदनाम वदनीं येणें ॥११६॥
नातरी रोगें पिडिला कोणी । तेथ वैद्य आले दोन्ही ।
एक वैद्य म्हणे स्वर्गातुनि । यावे घेउनि अमृत ॥११७॥
दुसरा वैद्य म्हणे आपण । तुझिया आंगणीचें वृक्षपर्ण ।
घेवोनिया अमृतासमान । औषधि करोन मी देतो ॥११८॥
त्यांत कोणाचे ऐकेल पिडीला । तैसा भवार्तागृहीं समुदाय आला ।
तरी योगी सांगती भवार्ताला । विषयविवेके चित्त रोघी ॥११९॥
आणि भक्त सांगती कळवळोन । विषयचि करितां कृष्णार्पण ।
त्या विषयाचेचि अमृत होवोन । देईन निधान कैवल्य ॥१२०॥
आपुल्यासाठीं विषय घेतां । तरी विषयांत दोषसत्ता ।
ते आवडीनें भगवंतीं अर्पिता । तरी द्वेष भूतां उपजेना ॥१२१॥
भगवंती आवडी मोठी । यालागीं उल्हास सौख्य पोटीं ।
आणि विषय अर्पण देवासाठीं । तेथ भूतांचा शेवटी द्वेष नुपजे ॥१२२॥
एवं सर्वांभूतीं भगवंत । भूतें प्रेममय समस्त ।
ऐसी जेव्हां येईल प्रचीत । तै सृदिानंद जीव होय ॥१२३॥
मग माऊली सकळ कामिनी । पुरुष अवघे शूलपाणि ।
जडचेतनीं शार्ङ्पाणि । भरोनी उरला एकटा ॥१२४॥



जीव शिव माया ब्रह्म । हा अवघा शब्दभ्रम ।
सांडोनि तर्कागम । पूर्ण प्रेमा व्यापकू ॥१२५॥
म्हणोनि सकळांची सारसंपत्ति । नारायणचरणस्मृति ।
ऐसे बोलता शुकमूर्ति । अंतरीं परीक्षिती संतोषला ॥१२६॥

सांप्रदायिकस्मरण

सर्वेषामेव सिद्धानां वस्तुतः सूक्ष्मरूपधृक् ।
समन्वयेन वंदेऽहं श्रीमज्ज्ञानेश्वरं गुरुम् ॥१॥

तेथ रायाचा शुद्धभाव । पाहोनि संतोषले मुनिराव । (य१४-६६)
कीं बाल तृप्त होता सावेव । तृप्ती वाटे जननीतें ॥१२७॥
तैसा सच्छिष्य तृप्त होता । ते सुख उपजे श्रीगुरुनाथा ।
संतोष पाहोनि परीक्षिता । व्यासनंदना आनंदू ॥१२८॥
कां सानबाळाच्या अंगावर । जननी घाली अलंकार ।
तयाच्या रुचीचा निर्धार । बाळकाते कळेना ॥१२९॥
तिया अलंकारासहित शिशुशोभा । मातृनयन पहावया उभा ।
कीं कार्याचिया गुणस्वयंभा । कारण जाणे ॥१३०॥
तैसा बोध ठसावता शिष्यहृदयीं । हे पाहोनि तोषे सद्गुरु आई ।
रायाचा संतोष पाहोनि लवलाही । शुक अत्यंत हृदयीं तोषले ॥१३१॥
परी परंपरा बोधिलियाविण । बोध करणें तो महाशीण ।
गुरुसंप्रदाय कळलियाविण । न होती विघ्न दूर कही ॥१३२॥
इहलोक सोडुनि सिद्धजन । अधिकारिकत्वें घेती ब्रह्मस्थान ।
तेव्हां परलोकी देवता करिता विघ्न । ते तत्स्थ सज्जन निवारिती ॥१३३॥
रायाच्या गृहीं ओळखी असतां । तरी राजभेटी साधें तत्वतां । तैसे परलोकीं
निजसंप्रदायिक असता । न करू शकती देवता विघ्न ॥१३४॥
एवं परलोकीचे देवताविघ्न । ते दूर करिती संप्रदायिक सुजन ।
आणि इहलोकीं कामादि विघ्न । श्रीगुरु आपण वारिती ॥१३५॥
म्हणोनि हृदयीं सद्गुरूचें चरण । सेवेलिया करावे सांप्रदायिकस्मरण ।
ते दाखवावया कारण । शुक आपण बोलती ॥१३६॥

आर्या :-

**सद्गुरुवांचुनि वाचुनि विफळ जिणें यांत वाकडे काय ।**
**शुक सांगे भागविला कृष्णें वाहोनि लांकडे काय ॥१॥**

ओवी -

**''देईल गुरुसेवा । इया बुद्धि पांडवा ।**
**शतजन्मांचा सांडोवा । करिती जे'' ॥१३७॥ (ज्ञाने.१३-१६७)**
**एवं तातवचनें करोन । प्राप्ति नोहे सद्गुरुविण ।**
**तै सद्गुरु भेटलिया शुकनिधान । मग काय न्यून रायातें ॥१३८॥**
**शुक बोलती ऐक राया । मी बोलिलो ज्या सदुपाया ।** (य१४-६७)
**तैसीच मानील आप्तचर्या । तुज लवलाह्या कळो दे ॥१३९॥**
**आप्तांचिया ठायीं । अहित असत्य वार्ता नाहीं ।**
**म्हणोनि आप्तवाक्यावर लवलाही । विश्वास ठेवी अत्यंत ॥१४०॥**

गद्य

शिष्य :- आप्तवचन प्रमाण होऊं शकत नाहीं. कारण आप्तवचनानंतर वस्तु प्रत्यक्षच पहावी लागते; जसें नदीतीरावर पांच फळें आहेत असे सांगितलें असतां, ते जाऊन पाहून प्रत्यक्ष करावीत इत्यादि विधिवचनांचा अंतर्भाव होतो.

दुसरे, आप्तवचनाचें ठायीं विश्वास ठेवल्यावर पुष्कळ वाचक लोक भोळ्या लोकांना फसवूं शकतात.

तिसरें, आप्त सर्वज्ञ होऊं शकत नाहीं; कारण ईश्वरावांचून जीव कदापि सर्वज्ञता पावत नाही.

श्रीगुरु :- अशी शंका करणें तुला योग्य नाहीं. कारण आप्तवचनाचें पर्यवसान सर्वथा प्रत्यक्षांत होते असें सर्वथा म्हणतां येत नाहीं. प्रत्यक्षयोग्य दूर वस्तु असल्यास तिजविषयीं आप्तवचनाचें पर्यवसान प्रत्यक्षांत होते खरे, परंतु जगत्कारण प्रकृति व गुरुत्वादि शक्ति जर कोणी शिकवितांना मुलांना सांगितल्या तर त्याचें पर्यवसान प्रत्यक्षांत होत नाहीं, किंतु नित्य अनुमानांत होते;

आणि विष्णुदत्ताच्या मुलाचें नांव देवदत्त ठेविलें व तो मोठा झाल्यावरही आपले देवदत्तच नांव आहे असे सांगतो; येथें आप्तवचनाचें पर्यवसान शब्दांत होतें. कारण नांवाचा व शरीराचा शृंगपुच्छवत् संबंध नाहीं. आहंकारिक संबंध





आहे म्हणून वस्तूला नांव देणें सोडून दिले तर सर्व व्यवहार क्षीण होऊं लागेल.

आतां माझें नांव विष्णुदत्त आहे हे मी आपल्या मनांत धारण करून त्याचा शरीराशीं संबंध केला म्हणून नाम कल्पित आहे व मिथ्या आहे अशी शंका करणें योग्य होणार नाहीं, कारण नाम मनोगोचर आहे हा सिद्धान्त आहे. **(य१४-६८)** आणि मनोगोचर तेवढे मिथ्या असते असा तुझ्या म्हणण्याचा आशय दिसतो आणि शब्दाचा व आकृतीचा संबंध घेतल्यावांचून जगद्व्यवहार घडणार नाही. आकृति सत्य आहे असें तुझें मत आहे असे वाटतें म्हणून आकृतीचा व शब्दांचा संबंध मानल्यास सदसद्व्यवहार होतो असे तुज मानावे लागेल.

विरोधी वस्तूंचा संयोग व्यवहाराला उपयोगी पडत नाहीं. जसा प्रकाश व अंधाराचा एकत्र संबंध व्यवहाराला उपयोगी पडत नाहीं. यद्यपि मंदप्रदीपगृहाचे ठिकाणीं प्रकाश-तमाचा संयोग भासतो तथापि त्यापासून कार्यनिष्पत्ति होत नाहीं.

यद्यपि प्रेताव्हानतंत्रमतें पिशाच-आमंत्रणादिकार्य मंदप्रदीपगृहांतच होते तथापि त्या पिशाचादिकांच्या दर्शनाला केवळ प्रकाशच हेतु आहे. प्रकाशतमसंयोग हेतु नाहीं आणि मंदप्रदीप त्या गृहामध्यें पिशाचांचा येण्याचा उद्देश हा आहे कीं पिशाचांची तनु तीव्र झाल्यावांचून या लोकाप्रमाणें दिसूं शकत नाही. आणि तितकी तीव्र करण्याकरिता त्यांना पुष्कळसे ध्यान करावे लागते. परंतु पिशाच्यांचे चित्त विक्षिप्त भूमिकेवर असल्यामुळें योगियाप्रमाणें सर्व कालच त्यांना इच्छितध्यान करता येत नाहीं. म्हणून मनुष्य शरीरवत् स्वशरीर तीव्र करण्याचा त्यांना त्रास येतो. मंदप्रदीपगृहांत हे कार्य सहज घडते कारण पिशाचांना अंधतमामध्ये राहण्याची संवय असल्यामुळें घुबडांच्या नेत्रांप्रमाणें अत्यंत प्रकाशानें त्यांचे डोळे दिपतात. म्हणून मंदप्रदीपगृहाचे ठिकाणीं येऊन प्रथम गृहीताच्या नेत्रांतील व आपल्या नेत्रांतील रश्मी मिळवितात व नंतर अंतःकरणाचा तेजोमय भाग त्यांच्या अंतकरणांत पाठवून तेथील वृत्तीचा अभिभव करितात, व मग थोडक्या सायासाने त्याला भ्रम उत्पन्न करून देतात.

ही रीति पिशाच लोकांना कसे धरतात या प्रश्नाचे उत्तर म्हणून चतुर्धराचार्यांनीं प्रतिपादिली आहे. **(य१४-६९)**

यद्यपि चरकसुश्रुतादिकांचें मत शरीरांत पिशाच संचार करितात असें आहे, तथापि मनाचा अभिभव केल्यावांचून पिशाचांना शरीरांत संचार करता येत नाही; आणि त्यांची दुसऱ्यांचें मन वश करून घेण्याची रीति तर चतुर्धराचार्यांच्या प्रमाणें आहे; म्हणून त्यांना मंदप्रदीप गृह यद्यपि उपयोगी आहे तथापि गृहीताला जो भास होतो तो प्रकाशाच्याच साह्यानें होतो. म्हणून तेथेही विरोधी वस्तुपासून कार्य उत्पन्न होत नाहीं, आणि प्रकाशाचा व अंधाराचा जरी विरोध आहे, तथापि ते दोन्ही पदार्थ भावरूप आहेत. इतक्या अंशात त्या दोघांचे साम्य आहे.

यद्यपि प्रकाशाचा अभावच तम आहे असे नैय्यायिक म्हणतात पण ते योग्य नाहीं; कारण मंदप्रदीपगृहांत प्रकाशाचा व तमाचा संयोग स्पष्ट दिसतो तसा भावाभावाचा संयोग दिसत नाहीं आणि बळेंच अभ्युपगम करतो म्हणेल तर त्या मूर्ख नैय्यायिकाला आम्ही असे विचारतो कीं, घटाचे ठिकाणीं घटाचा अभाव कोणत्या विभागावर प्रतीत आहे?

आतां जैनमताचा अंगिकार करून अनेकान्त मानशील तर तुझाही अभाव तुला प्रतीत झाला पाहिजे. सुषुप्ति, मूर्च्छा व मरणांत माझा अभाव प्रतीत होतो, असे म्हणशील तर प्रत्यभिज्ञेचा बाध होईल; कारण निद्रेंतून उठल्यावर मी सुखाने निजलो होतो किंवा मला कांहीं समजले नाहीं असा पूर्व अनुभव तूं सर्वांस सांगतोस! आतां तो अनुभव पूर्व जागृतींतील पदार्थाशीं तुलना करून सांगतो असे म्हणशील तर चालणार नाहीं, कारण तुलना करण्याकरीतां पूर्वस्मृतीची अपेक्षा आहे.

आतां त्या पूर्वस्मृतीला धारण करणारा पूर्वीचाच आहे की नूतन उत्पन्न झालेला आहे ? दुसऱ्या पक्षीं पूर्वपदार्थाची तुलना करता येणार नाहीं व त्यामुळें निद्रेतून उठलेला प्रत्येक मनुष्य **(य१४-७०)** आईच्या उदरांतून निघाल्याप्रमाणें शिक्षण घेण्याला योग्य होईल.

पुनः अभावांतून भावाची उत्पत्ति मानत असलास तर आस्तिकालाही पुनर्जन्माचा संशय राहील परंतु तुला मात्र निश्चयच करावा लागेल. कारण भाव-पदार्थांमध्यें जसे नानात्व असतें तसें अभावांत नाहीं. यद्यपि घटाभाव, पटाभाव, जलाभाव असे शब्द आपण उच्चारितो तथापि त्या घट, पट, जल या



तिन्ही व्यक्तीचें मानसिक ज्ञान झाल्यानंतर त्यांच्या अभावाचे ज्ञान आपण करून घेतो.

या स्थानीं हें रहस्य आहे कीं, वस्तूचा भेद जाणण्याकरितां वस्तूच्या विशेषणाचें ज्ञान अवश्य पाहिजे असतें. कंबुग्रीवादिमत्व हें त्या घटाचें विशेषण आहे, व आतान-वितान-तंतुवत्व हे पटाचें व द्रवत्वादि जलाचें. आतां यांच्या अभावाचें ज्ञान जेव्हां आपण करून घेतो तेव्हां घटादिकभावाश्रित पदार्थांची विशेषणें मनांत येतात, अभावाश्रित विशेषणें मनांत येत नाहीं व ज्याअर्थी अभावाश्रित विशेषणच मनांत येत नाहीं त्या अर्थी अभावांतच भेद मानणें अशक्य आहे.

आतां प्रतियोगिभेदाने किंवा अधिकरणभेदानें आम्ही अभावाचा भेद मानतो असे म्हणशील तर अधिकरण व प्रतियोगी हे दोन्ही भावरूप आहेत. भाव पदार्थ भेदवान् आहे म्हणून तद्विरोधी अभावपदार्थही भेदवान् असला पाहिजे, असे म्हणणें म्हणजे, आमच्या शत्रूला ज्याअर्थी पुष्कळ संतति आहे त्याअर्थी आम्हांस आहेच या म्हणण्याप्रमाणें विनिगमक तिरस्कृत आहे म्हणून अभाव एकच मानला पाहिजे, आणि एका अभावांतून भाव उत्पन्न होतो तर जो भाव अनंत वेळ उत्पन्न झाला तोच भाव पुनः उत्पन्न झाला पाहिजे; कारण ज्या कारणांत नानात्वाची सामुग्री असते त्याच कारणांतून दुसरे कार्य उत्पन्न होणे संभवनीय असते. ज्या कारणांत नानात्वाची सामुग्री नाहीं, त्या कारणांतून प्रगट होणारी व्यक्ति कितीहि **(य१४-७१)** वेळ उत्पन्न झाली तरी एकच असते. म्हणून 'जो आत्मा निजला होता किंवा मेला होता त्याचा अभाव झाला होता' असें म्हणशील तर जागृत झाल्यावर किंवा एखादे बाळ जन्मल्यावर तो अभावांतूनच आला होता असें म्हणशील तर पूर्वीचाच आत्मा पुनः आला पाहिजे, कारण अभावांत नानात्वसामुग्री नाहीं. म्हणून आस्तिकाला एकदांचा पुनर्जन्माचा प्रतिषेध करतां येईल पण तुला मात्र करतां येत नाहीं. आणि अभावांतून भाव उत्पन्न होतो असें म्हटले असतां अभावाचे विरोधित्वच रहात नाहीं. मग भाव व अभाव हा शब्दवादच राहिला. शब्दवादावर जाणते पुरुष आग्रह करीत नाहींत.

पहिला पक्ष स्वीकारशील तर आत्म्याचा अभाव स्वीकारतां येणार नाहीं म्हणून जैनमताप्रमाणें भावाभावाचा संयोगही मानणें विरुद्ध होईल. अतः तम

अभावरूप नाहीं म्हणूनच त्यांच्या भावरूप एकांशसाम्यत्वामुळें मंदप्रदीपगृहांत प्रकाशाशीं तादात्म्यभिन्न संयोग दृष्टीस पडतो. परंतु भावाभावाचा संयोग मात्र कोणत्याच काळीं दृष्टीस पडत नाहीं आणि नामरूपाचा संयोग तर तूं प्रत्यक्ष करून व्यवहार करतोस, नामाला कल्पित म्हणतोस, कल्पिताला खोटें म्हणतोस, बाह्य आकृतीला सत्य म्हणतोस आणि त्याचा परस्पर संयोग करून व्यवहार करतोस तर मग तूंच हा व्यवहार भ्रमाने करीत नाहींस काय?

एक तर दोघालाही सत्य समज. दोघालाही सत्य समजल्यास मनोगोचर नामालाही सत्य समजल्यामुळें आप्तवचनाचें पर्यवसान शब्दांतही होतें असें मानावें लागेल; अथवा दोघालाही मिथ्या समजलास तर मिथ्यावस्तु वाचारंभण मात्र असते म्हणूनही आप्तवचनाचें पर्यवसान तुला शब्दांतच करावें लागेल.

एक खोटें व एक खरें मानून व्यवहार करण्याचें तर वर आम्ही खंडण केलें आहे म्हणून आप्तवचनापेक्षां प्रत्यक्ष बलवान आहे हा तुझा पहिला आक्षेप बरोबर नाहीं.

एवं दुसरा पक्षही समीचीन नाहीं; कारण आप्तवचनांत जसा फसण्याचा संभव आहे **(य१४-७२)** तसा वातपित्तादि दोषेंकरून कुपित झालेल्या कामलादि रोगांत दृष्टि दूषित झाल्यानें प्रत्यक्षानेंहि फसण्याचा संभव आहे. घुबडांच्या समाजाला जसें दिवसा दिसत नाहीं, म्हणून कोणालाच दिसत नाहीं असें कोणाला म्हणतां येणार नाहीं. तद्वत्, चित्काळावरून आप्तवचनविश्वास प्रतिषेधणें योग्य नाहीं.

पुनः असा विचार कर कीं मनुष्य फसूं कोठें शकतो? एखाद्या गोष्टीची आशा लावून त्या गोष्टीकरितां आपले सर्वस्व सोडून देऊन जेव्हां ती गोष्ट आपल्याला मिळत नाहीं तेव्हां आपल्याला फसल्यासारखें वाटतें. या दृष्टीनें पाहिलें तर हा फसविण्याचा दोष लौकिक आप्तावर येऊं शकतो. पण येईना बापडा ! त्यापासून पारमार्थिक आप्तावर विश्वास ठेवणाऱ्या आमची मुळींच हानी नाहीं. कारण पारमार्थिक आप्त कोणाला विषय सोड म्हणत नाहींत, तर विषयामध्यें दुःखादि दोष पाहून मुमुक्षूच त्यांच्याकडे आपण होऊनच जातो. म्हणून विषयाची आशा दाखवून फसविण्याचा दोष त्यांच्यावर येऊ शकत नाहीं.

**विषयी लोकाला जो ब्रह्मबोध करील तो निश्चित आप्तच नाही.** म्हणून



लक्षण अतिव्याप्त नाहीं व वादीचा वाद नसल्यामुळें अव्याप्त नाहीं, आणि श्रुत्यादि विषयरहितताबोधक असल्यामुळें असंभूत नाहीं.

मुमुक्षु आप्ताजवळ गेल्यानंतर 'रागद्वेष दुःखरूप आहेत म्हणून तूं त्या दोहोहूनही वेगळा आहेस' हें सांगणें फसविणेंच होऊं शकत नाहीं, कारण फसविणाऱ्याला व फसणाऱ्याला रागद्वेष यांपैकीं कोणता तरी विकार पाहिजे. फसविणाऱ्याचे, ज्याच्याकडून जो फसला जातो, त्याच्यावर प्रेम असले तर फसविणें होणार नाहीं व फसणाऱ्याचेहि फसविणाऱ्याच्या वचनावर प्रेम असले तर फसणें होणार नाहीं. आणि रागद्वेष तर आपल्या आत्म्याहून बाह्य विषयांचें ठिकाणींच राहूं शकतात. **(य१४-७३)**

यद्यपि आत्म्याचें ठिकाणीं प्रेम आम्ही पूर्वी सिद्ध केले आहे तथापि ते रागरूप नाहीं, कारण राग हा रजोगुणाची वृत्ति आहे. तो वासनाकाळी असतो व आनंदकाळीं अभिभूत होतो आणि प्रेम तर आनंदकाळींहि असतो. एवं भगवद्भक्ति ही राग होऊं शकत नाहीं. कारण रागगृहीतविषय स्वभोगाकरितां असतात आणि भगवद्भक्ताचें सर्वस्व ईश्वराकरितां असते.

आतां स्वस्त्रीचे ठिकाणीं सर्वस्व वेचणारे कोणी आहेत असे म्हणशील तर ते त्यांचे रागदान नसून प्रेमदानच आहे. परंतु तें प्रेमदान अपात्रीं आहे. कारण प्रेम जितका नित्य ठेवावासा वाटतो तितका स्त्रीदेह नित्य राहूं शकत नाहीं आणि स्त्रीच्या देहांतील आत्म्यावर जर तो प्रीति करीत असेल तर तिचा आत्मा व आपला आत्मा दुसरा नाही म्हणून तो आत्मप्रेमच होतो.

सारांश, **विकाररहित आत्म्याचा उपदेश करणारा आप्त कोणत्याही काळीं फसविणारा होऊंच शकत नाहीं.** याप्रमाणें तिसराही आक्षेप अयोग्य आहे. कारण आप्त सर्वज्ञ म्हणजे तुला कसा पाहिजे ? सर्व १.वस्तुहून निराळा राहून सर्वज्ञ पाहिजे ? किंवा २.सर्व वस्तुरूप होऊन सर्वज्ञ पाहिजे ?

पहिला पक्ष स्वीकारशील तर वस्तूचे ठिकाणीं जें त्वां सर्वज्ञत्व दिले ते सर्वत्व जाति आहे. ती सर्वत्वजाति आपल्या अंगावर ओढून घेतली किंवा तूं आपल्या मनानेंच स्थापन केलीस ? पहिल्या पक्षी सर्व वस्तु चैतन्य होऊन सर्वच सर्वज्ञ होतील म्हणून तुला शंका करतांच येणार नाही.

दुसऱ्या पक्षीं त्यांच्यावर सर्वत्वजाति स्थापन करणारा तूं सामान्यतः

सर्वज्ञच आहेस. आतां तुलाहि जें ठाऊक नाहीं ते आप्त सांगतात म्हणून ते मजपेक्षां विशेष सर्वज्ञ आहेत असे तुला म्हणावे लागेल. दुसरा पक्ष स्वीकारशील तर सर्वज्ञत्वाच्या शंकेची आवश्यकताच नाहीं.

पुनः ज्या पदार्थांत नानात्व असते त्यांतच **(य१४-७४)** अल्पज्ञत्व संभवते. आणि ज्या पदार्थांत एकत्व असते त्याच्या एकांशाचें ज्ञान देखील सर्वज्ञत्व सिद्ध करिते.

घटपटादि ज्ञान सर्वत्र आहे. म्हणून घटाला जाणणारे पटज्ञानी होणार नाहींत. परंतु आकाश हें एकच आहे. आकाश अवकाशरूप आहे हे घरांत बसून सांगणाऱ्याचे व पुष्कळ दुरून सांगणाऱ्याचें ज्ञान सारखेंच. तद्वत् ब्रह्म एक आहे त्याला जाणणारे सर्वच त्याविषयीं सर्वज्ञ आहेत आणि मायेचे कल्पित पदार्थ नाना आहेंत. त्याविषयीं मात्र पारमार्थिक आप्त सर्वज्ञ राहतीलच असा नियम नाहीं, व तशी सर्वज्ञता नसणें आप्तांना दूषण नसून भूषण आहे, कारण त्याच सुखाला खरें सुख म्हणतां येईल कीं ज्या सुखांत मागील दुःखाची आठवण रहात नाहीं. मायाकल्पित सर्व पदार्थाचे ठिकाणीं दुःखरूपता निर्विवाद आहे. हें सिद्ध केले व करूंहि. म्हणून ब्रह्म जाणणारा मायाकल्पित पदार्थाविषयीं सर्वज्ञ होईल तर तो ब्रह्मानंद भोगीत असतांना दुःखरूप पदार्थाची त्याला स्मृति आहे असें म्हणावे लागेल. तसे म्हटले म्हणजे तो आनंदस्वरूप पूर्ण झाला नाहीं तर त्याचें मन अर्धे जडाकडे व अर्धे ब्रह्माकडे लागले असे म्हणणे भाग पडत असल्यामुळें, त्याला जीवन्मुक्त न म्हणतां नारकी जनापेक्षांहि तो दुःखी आहे असे म्हणणाऱ्या स्मृतींतला तो विषय होईल.

स्मृति :-

**यस्य ब्रह्माभिमानोऽस्ति देहेऽपि ममता तथा ।**
**न स भोगी न वा योगी केवलं दुःखभागसौ ॥१॥**

म्हणून वत्सा ! पारमार्थिक गुरुसंप्रदायाचें तूं उल्लंघन करूं नकोस. त्या संप्रदायांतीलच आप्तचर्या आतां मी तुला सांगतो.

**ओव्या - म्हणोनिया जाणते मुनि । आपुली कर्तृबुद्धि सोडुनि ।**
**विधिनिषेध टाकोनि । झाले निर्गुणीं निष्ठापन्न ॥१४१॥ (य१४-७५)**
**तेही जयाचें कोमल चरण । हृदयीं धरोनि वर्णिती गुण ।**





**त्या हरीचे महीमान । तुज मी सांगू कोठवरी ॥१४२॥**
**कां केवळ सुवर्णातें जाणतां । तरी भूषणाविण नाहीं उपयोगिता ।**
**तैसे मी देहावेगळा म्हणतां । विश्वप्रेमाविण तत्वतां स्वानंद नाहीं ॥१४३॥**
**तो विश्वप्रेम ठेवावा नाना पदार्थी । तरी चंचल होईल चित्तवृत्ति ।**
**आणि चंचलत्व तंव स्थिति । रजोगुणाची बोलिजे ॥१४४॥**
**यालागीं विश्वप्रेम तंव असावे । परीं मनाचे नैश्चल्य न मोडावें ।**
**आणि आपुलेही न विसरावे । देहाहोनी वेगळेपण ॥१४५॥**
**या तीहीचा समन्वय । करावया एकचि उपाय ।**
**यशोदानंदनाचे पाय । धरोनि हृदय सुखी कीजे ॥१४६॥**
**श्रीकृष्ण माझा, एक व्यक्ति । यालागी तेथ ठेविता वृत्ति ।**
**चंचलता नये चित्तीं । हा निश्चिती अनुभवो ॥१४७॥**
**सकल विश्वा अधिष्ठान । तोचि एक करुणाघन ।**
**यालागीं विश्वप्रेम संपूर्ण । तेणेचि साधे ॥१४८॥**
**तोचि विश्वा अधिष्ठान कैसा । या निरूपणाचा ठसा ।**
**मागे ओळखिला तैसा । पुढेही ओळखिजे श्रोतीं ॥१४९॥**

महाराजांची प्रतिज्ञा

**वाहोनि आळंदीपतीची आण ।**
**मी प्रतिज्ञा करिते स्वबळें करोन ।**
**कीं श्रुति-युक्ति-अनुभवहीन ।**
**न बोले वचन सर्वथा ॥१५०॥**

हृदयस्थ ध्यान

**आणि हृदयीं धरितां सावळी मूर्ती । देहाचिये आंत जाणें लागे आपणाप्रति ।**
**मी देह म्हणता निश्चिति । तरी मूर्ती राहील हृदयबाह्य ॥१५१॥**
**मूर्ति पुढें रहावी म्हणोन । तिस द्यावे हृदय-आसन ।**
**आणि देह गृहासम जड समजोन । आपण देहाहून वेगळे व्हावे ॥१५२॥**
**हृदयकमळी गोविंदचरण । आपण देहाहून आंत भिन्न ।**
**मग पूजिता आवडी करून । तरी साक्षित्वरक्षण सहज झाले ॥१५३॥**

एवं ज्ञानयोग आणि भक्ति । साधे ठेवितां कृष्णीं प्रीति ।
आपले निर्गुणत्व रक्षावयाप्रति । ईश्वरभक्ति अति दृढ ॥१५४॥
आपण एक निर्गुण होवावे । आणि विश्वाने आपुल्या विरोधी रहावे ।
(य१४-७६) तरी शत्रुद्वेषगुण स्वभावें । निर्गुणीं तयां होईल ॥१५५॥
आणि विश्व करावे आपले मित्र । तरी आपण जैसे झालो ईश्वर ।
तैसे विश्वाहि ईश्वर । केले पाहिजे ॥१५६॥
तरी ते सर्वथा नव्हेचि ज्ञानें । यालागी ईश्वरांत विश्वाचा लय करणें ।
मग ध्यान धरणें । प्रेममय ॥१५७॥
तया प्रेमध्यानाचे योगेंकरून । अंतरी ध्यान बाहेरी वंदन ।
सर्वांभूतीं नारायण । आपणासहित भक्त देखे ॥१५८॥
मग ईश्वरगुणावरून । ज्ञानाभिमानाचे निंबलोण ।
केलिया प्रेममयें आपण । जीवन्मुक्त भक्तरूप ॥१५९॥
ऐसें सांगता मौनप्राप्ति । हीच मुनीची मुख्य स्थिती ।
मज वाटे शुक आणि परिक्षिती । एकात्म स्थिति पावले ॥१६०॥
माझ्या प्राकृत वचनें करोन । रिझले तुम्हां श्रोतयांचे मन ।
तरी जेथ वक्ता व्यासनंदन । ते गुरु-शिष्य दोन एक कां न होती ॥१६१॥
कां नदीं आणि सागरीं पाहतां । पाणियांत नाहीं भेदवार्ता ।
तथापि लोकांसी दिसे तत्वतां । कीं हा नदीसागरसंगमु ॥१६२॥
कीं पहिल्या दिव्याहून दीप लावितां । दोघांत न राहे किंचित् न्यूनता ।
तथापि पहिल्या दीपाची वडिलता । सर्वथाही न मोडे ॥१६३॥
तैसे सद्गुरुरूप शिष्यराव । झालियाहि स्वयमेव ।
सद्गुरुचरणीं प्रेमभाव । तिनही काळी ठेवितु ॥१६४॥
तो श्री शुक कृपानिधि । मज वाटे ज्ञानेश्वरराव आळंदी ।
तयाच्या वचनें मीहि त्रिशुद्धि । शुकज्ञानेश्वरशिष्यपण पावेल ॥१६५॥
तेथे माझ्या सखया सकळ । साह्य देवोत करुणामेळ ।
मग पति कराया व्रजपाळ । मेळवीन तातसंमति ॥१६६॥
असो हा गुरुशिष्याचा एकांत । पुढें आपणासाठीं ते समर्थ ।
संवाद करिते झाले यथार्थ । त्यांतील शुकगुरूक्त श्लोक पुढें ऐका ॥१६७॥



॥ श्लोक ८ ॥

इदं भागवतं नाम पुराणं ब्रह्मसंमितम् ।
अधीतवान्द्वापरादौ पितुर्द्वैपायनादहम् ॥

(भाग.२-१-८)

(य१४-७७) पावलियाही जीवन्मुक्ति । मुनि आश्रयिती भगवद्भक्ति ।
तें अपूर्व वाटे मजप्रति । राय परिक्षिती बोलत ॥१६८॥
तैं शुक म्हणे ऐक राया । या भागवताची चर्या ।
साधी श्रुत्युक्त कार्या । निवटी माया अशेष ॥१६९॥
''यं सर्वे देवा नमन्ति, मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्च'' ही श्रुति ।
ज्ञानानंतर भगवद्भक्ति । सांगे निश्चिती विधियुक्त ॥१७०॥
या भागवताचेंचि वर्णन । यालागी वेदतुल्य तें प्रमाण ।
सर्वव्यापकही ब्रह्म पूर्ण । होये सगुण यद्वचनें ॥१७१॥
कां व्यापक सुवर्णावरुती । आवडी अनुसार भूषणें होती ।
तैसें व्यापक ब्रह्म स्वानंदप्राप्ति । पावले व्यक्ति भागवतीं या ॥१७२॥
कां मनीचे अर्थजात सकळ । अक्षर प्रकाश करिती केवळ ।
तैसे व्यापूनि उरले जे ब्रह्मांडगोळ । तें सगुण घननीळ भागवतीं ॥१७३॥
ते द्वापारयुगाचिया अंती । मी शिकलो गा परिक्षिती ।
माझा पिता श्री व्यासमूर्ति । केलें तदुक्ति अध्ययन ॥१७४॥
अरणींपोटीं माझे जनन । ऐसें ही सांगती पुराण ।
यास्तव जननी जनक आपण । सत्यवतीनंदन मजलागीं ॥१७५॥
म्हणोनि दोहींपक्षीं प्रेमकर्ता । त्यावांचोनि मज नाहीं तत्वतां ।
तात्पर्य कीं मज सांगेल अन्यथा । हें कदापि घडेना ॥१७६॥
एवं माता पिता भगवान् व्यास । या भागवताचें करूनि मिष ।
माझा श्रीगुरुहि जगन्निवास । तोचि एक ॥१७७॥
जया जाहलीं ब्रह्मप्राप्ति । जया निरंकुश तृप्ती ।
त्याची ग्रंथाचे ठायीं प्रवृत्ति । कदापि नोहे ॥१७८॥

॥ अभंग ॥

पामर विषयी जिज्ञासु कृतार्थ । पुरुष जगांत चारचि हे ॥१॥

**पामर तो जेवीं शुकर वा श्वान । नेणें तो प्रमाण वेदशास्त्र ॥२॥**
**वेदविरुद्धचि आवडे तयाला । आणीक जनाला तेचि सांगे ॥३॥ (य१४-७८)**
**अन्यवीर्यबाळ पितयाविरुद्ध । तैसा मूढ वेद अव्हेरीतो ॥४॥**
**विषयी तो काम्य कर्म आचरीत । अप्सराभोगार्थ स्वर्गीचिया ॥५॥**
**मुक्तासी तो नाहीं कर्तव्यचि कांहीं । शास्त्र तया ठायीं निवर्तते ॥६॥**
**जिज्ञासूचि एक ग्रंथा अधिकारी । केली ज्यानें चारी साधनें ती ॥७॥**
**आपण तो शुक कृतकृत्य झाला । शीण कांहों केला पठणाचा ॥८॥**
**ज्ञानेश्वरबाळ पुसतां सखोल । श्रीगुरूसी डोल स्वानंदाचें ॥९॥**

॥ चूर्णिका ॥

**एवं नृपवर प्रश्नातें श्रवण करोनी । परम संतुष्ट अंतःकरणीं ।**
**कृपास्तनीं मधुर वचन दुग्ध भरोनी । स्नेहे घालावया सत्पुत्रवदनीं ।**
**करुण व्यासनंदन सप्रेम मुनी । प्रेमळ वाणी बोलतो ॥१॥**

॥ श्लोक ९ ॥

परिनिष्ठितोपि नैर्गुण्य उत्तमश्लोकलीलया ।
गृहीतचेता राजर्षे आख्यानं यदधीतवान् ॥

(भाग.२-१-९)

श्रीशुक उवाच -

**राया तुझा प्रश्न ऐकुनी । ऐसें वाटतें अंतःकरणीं ।**
**कीं तूं जीवन्मुक्त असूनी । पुससी मजलागुनी लोकहिता ॥१७९॥**
**पतिसुख अनुभवलियावीण । कन्या वदों न शके आपण ।**
**तैसे ब्रह्म अनुभवलियावीण । संतचिन्ह कळतीना ॥१८०॥**
**शास्त्र पढीक वैद्य जैसा । आतुरापुढें न धिंवसा ।**
**मी ब्रह्म बोभाट करणार तैसा । संतापुढें टिकेना ॥१८१॥**
**तूं बोलिलासी मुक्तचिन्ह । तें यथार्थ अनुभवलिया समान ।**
**येथ आश्चर्य करावया नाहीं कारण । कृष्णशिष्यनंदननंदन तूं ॥१८२॥**
**जयाचें नांव घेतांक्षणीं । चारी मुक्ती लोळती चरणीं ।**
**तो भक्तवत्सल कैवल्यदानी । सारथ्यकर्ता त्वद्वंशीं ॥१८३॥**
**जयास अखंड हृदयीं धरुनी । स्मशानी बैसला शूलपाणी ।**



**तो रमावल्लभ चक्रपाणी । तव पितामहाचे धूत घोडे ॥१८४॥**
**म्हणवोनियां तुझ्या ठायीं । ब्रह्मनिष्ठेचे नवल नाहीं ।** (य१४-७९)
**आम्रबीज पेरितां लवलाही । फळें कां येती निंबोळिया ॥१८५॥**
**जे कृष्णमुखभूमीचें गीताबीज । अर्जुनीं अंकुरत्व पावले सहज ।**
**अभिमन्युहृदयीं पल्लवित सतेज । ते तव हृदयीं साच आज फळलें ॥१८६॥**
**म्हणवोनि माझें मुक्तचिन्ह । तूं बोलिलासी संपूर्ण ।**
**यथार्थ पाहतां मजकारण । नाहीं प्रयोजन सर्वथा ॥१८७॥**
**मला हें हें पाहिजे म्हणूनी । ऐसी वासना अंतःकरणीं ।**
**तोवरीच प्रयोजनीं । धावें चित्त ॥१८८॥**
**माझें ठायीं पाहतां सकळ । वासना-मरूमरीचि जळ ।**
**मी परब्रह्मरूप निष्फळ । मज प्रयोजन कासया ॥१८९॥**
**परंतु भोजन झालियावरी । तृप्ती वाटे जी अंतरी ।**
**तिच्या योगें निर्धारी । भुक्तान्नगुणाची स्मृति होय ॥१९०॥**
**तोंचि अन्न पुढती भक्षितां । तरी रुचीस ये परमपुष्टता ।**
**आतां हाचि दृष्टान्त सिद्धान्ता । उपयोगिजे ॥१९१॥**
**तैसे झालिया ब्रह्म पूर्ण । तोचि ब्रह्मानंद जाण ।**
**अंतरीं स्फुरवी हरीचें गुण । सांवळेपण सौंदर्य ॥१९२॥**
**म्हणाल अन्नें अजीर्ण होय । परी येथ तैसी नाहीं सोय ।**
**मरण म्हणोनि अजीर्ण भय । ब्रह्म तंव नित्य जनिरहीत ॥१९३॥**
**म्हणोनि ब्रह्मानंद भोगोनि । जैसी हृदयीं तृप्ती निर्वाणी ।**
**तेचि तृप्ती व्यापावी अवघ्या जनीं । तरी आवडी सगुणीं अतिहित ॥१९४॥**
**ओळखोनि कनकसार । जरी घालणें आंगावर ।**
**तरी तयाचे अलंकार । करणें लागती अवश्य ॥१९५॥**
**तैसा ब्रह्मानंद ज्ञानें जाणिला । तो जरी नित्य पाहिजे हृदयाला ।**
**तरी अनध्यस्तविवर्त पाहिजे भजला । साकार हरी ॥१९६॥**
**म्हणोनि जरी मन्निष्ठा निर्गुणीं । तरी उत्तमश्लोक लीला ऐकुनी ।**
**द्रव सुटला अंतःकरणीं । मग लागलो चरणीं पितयाच्या ॥१९७॥**
**बाळ दूध पिऊनी होय तृप्त । परी मायेस कडीये घेई म्हणत ।**

**तैसा मी ब्रह्मज्ञानें होवोनि मुक्त । मोहिलों गोविंदगुणलीलें ॥१९८॥**
(य१४-८०) **नातरी सुरतसुखा अनुभवोनि । अबला पुत्रप्रेम वांछिती मनीं ।**
**तैसा मी ब्रह्मनिष्ठ असूनी । सगुण श्रीकृष्णीं मन धांवे ॥१९९॥**
**का गंगा जरी सिंधूस भेटे । तरी मागील वाहतां ओघ न खुंटे ।**
**आणि जनांचे पापपर्वत मोठे । सहज क्षाळी ॥२००॥**
**तैसा मी मिळालो ब्रह्मसागरीं । परी अनंत जन्म जो स्मरला हरी ।**
**तो जडलाचि राहे हृदयांतरी । घालितां बाहेरी न जाये ॥२०१॥**
**म्हणोनि सहज हरिभजन । तेणे तरोत का आघवे जन ।**
**या लागीचि भागवताख्यान । जीवेंभावें पढलो मी ॥२०२॥**
**नदी समुद्री मिळोनी खुंटता । तरी तियेची हरपेल सहज मधुरता ।**
**समुद्राची अति क्षारता । लागेल तिज ॥२०३॥**
**तैसा ब्रह्मीं मिळतां मुनी । तयाची भक्ति जातां खुंटूनी ।**
**तरी व्यापक ब्रह्मानंद तयालागुनी । अन्वयेंकरोनि मिळेना ॥२०४॥**
**ज्ञानानंतर विक्षेप राहे । म्हणोनि ब्रह्मसमुद्रहि क्षार होये ।**
**त्या क्षाराचा अभिभव स्वयें । मधुरभक्तिगंगा करी ॥२०५॥**
**यालागीं पावोनि जीवन्मुक्ति । श्रीकृष्णचरणीं मम आसक्ती ।**
**म्हणोनि साष्टांग दंडवत तातांप्रति । करोनि भागवत पढलों मी ॥२०६॥**

॥ श्लोक २० ॥

तदहं तेऽभिधास्यामि महापौरुषिको भवान् ।
यस्य श्रद्दधतामाशु स्यान्मुकुन्दे गतिः सती ॥

(भाग. २-१-२०)

**ते हृदयीची व्यासोक्तिभक्तिगंगा । आज मी मिळवितो तव हृदयसंगा ।**
**येथ नवलावो श्रीगुरुमतिगंगा । शिष्यहृदयसमुद्र ॥२०७॥**
**कीं शांत हिमालय श्रीशुकमूर्ती । तेथोनि गंगा निघाली भगवद्भक्ति ।**
**ते परिक्षिद्बुद्धिरूप यमुनेप्रति । येऊनि अवचिती मिळाली ॥२०८॥**
**एवं गंगा शुकाची उक्ति । यमुना परिक्षितीची विरक्ति ।** (य१४-८१)
**सरस्वती श्रोत्यांची आर्ती । ही त्रिवेणी सत्संगप्रयागी ॥२०९॥**
**शुक म्हणे एवढें भाग्य । भोगावया तूं परमयोग्य ।**



**तरी ते आख्यान सुखसौभाग्य । सांगणे श्लाघ्य मज वाटे ॥२१०॥**
**आधींच श्रीविष्णूच्या चरणीं । माळ घालावया लागुनी ।**
**तुझी श्रद्धाकन्या उपवर होउनी । सिद्धचि असे ॥२११॥**
**ती माझिया वचनेंकरून । श्रीकृष्णावरी सती होऊन ।**
**येथ मूळांतील 'सती' शब्देंकरून । परमात्मलग्न बुद्धीसी ॥२१२॥**
**मती जालिया पतिव्रता । मग अवघ्या विश्वास येईल पुत्रता ।**
**परमप्रियत्व कमलाकांता । कामना सर्वथा हारपे ॥२१३॥**

**॥ श्लोक ११ ॥**

एतन्निर्विद्यमानानामिच्छतामकुतोभयम् ।
योगिनां नृप निर्णीतं हरेर्नामानुकीर्तनम् ॥

(भाग. २-१-११)

विषयवासनेचे बळ

**विषयवासना जोंवरी मनीं । तोंवरी निष्फलता साधनीं ।**
**जैसी जेथवर आवडी कुपथ्यसेवनीं । तोवरी निर्फळ औषध ॥२१४॥**
**नवल विषयवासनेचे बळ । सत्साधन गरुड केलें व्याळ ।**
**शेखी मिरविते नागविलें सकळ । मोहजाळ घालुनी ॥२१५॥**
**इनें [१]कर्मनिष्ठा गोविले स्वर्गी । इने [२]भक्तां बैसविले वैकुंठचौरंगीं ।**
**इनें सिद्धिकरीं दिधले [३]योगी । [४]निस्पृह भुलविलें मानबळें ॥२१६॥**
**धन कामिनी सुत त्यागून । [५]जे कां सेवूं गेलें वन ।**
**तेही गुरुत्वडोहीं बुडवून । स्वबळेंकरून वश करी ही ॥२१७॥**
**[६]शरीराची वळोनी मुर्कुंडी । जिहीं मनाची मोडिली मुंडी ।**
**ते या वासनेनें ब्रह्मलोक नरडीं । घालोनियां गिळिलें हो ॥२१८॥**
**जे शरीरां नांव ठेवोनि वैरी । शीत उष्ण साहती शिरीं ।**
**त्या [७]तपोनिष्ठांहि क्रोध भारी । वासना आणोनि देववी शाप ॥२१९॥**
(य१४-८२) **दुर्वास तपोनिष्ठ गाढा । तो अंबरीषां शाप देत फुडा ।**
**एवं सुलभ ब्रह्ममार्ग निसरडा । वासनेनें पैं केला ॥२२०॥**
**परी त्या वासनेसी एक खोडी । तीस तृप्तीची अत्यंत गोडी ।**
**तृप्तीसाठीं घाली उडी । नाना साधनीं अति दुःखी ॥२२१॥**

नित्यतृप्त नारायण । त्यास जरी वासना देईल आलिंगन ।
तरी निःशेष जावोनि वासनापण । विद्यारूप होय ते ॥२२२॥
म्हणोनि जगदुःख कळलें जया । विषयासक्ति महामाया ।
ऐसे अंतरीं जाणोनियां । जो अखंड सावध ॥२२३॥
ऐसिया वैराग्यनिष्ठाप्रति । भगवन्नाम ते सद्गती ।
हे शुक बोलिले, माझी उक्ती । न म्हणावी कदाहि ॥२२४॥
शुकाचा अभिप्राय ऐसा पूर्ण । कीं विषयाभिलाषा निवर्तलीयावीण ।
केलियावांचोनि इंद्रियदमन । नामस्मरण विनोदू ॥२२५॥
इंद्रियासी नेम नाहीं । मुखीं नाम करील कायी ।
ऐसे अभंगीं बोलिले पाही । तुकाराम समर्थ ॥२२६॥
की माय अपराध करिते क्षमा । म्हणोनि जो बाळ धावेल मातृसंगमा ।
तो तियेनें करावा क्षमा । कीं मारावा हें बोलिजे ॥२२७॥
तेवीं नामस्मरणें पापें जळती । ऐसें समजोनि पापें करी पुढती ।
तया नामधारकासी भगवंती । तारिजे कीं संहारिजे ॥२२८॥
मायबापांवरी प्रेम गहन । ऐसें दाखवीतसे वरून ।
आणि आज्ञाहि न पाळी एकही क्षण । तरी ती काय पितृभक्ति ॥२२९॥
तेवी हरीची आज्ञा श्रुति । तीस न मानोनि मंदमति ।
नामें तरणोपाय होईल म्हणती । तेचि वैरी हरीचे ॥२३०॥
ऐसें ऐकोनि वक्तृवचन । आशंका करिती श्रोते जन ।
की वाल्मीकि महापापें करून । नामेंकरून तो तरला ॥२३१॥
तरी वाल्मिकी-इतिहास विचारूनि पाहतां । नारदाच्या वचनें तत्वतां ।
सकळांच्या पापांस मीचि भोक्ता । म्हणूनि विरक्तता जाहली तया ॥२३२॥
(य१४-८३) 'पुढती पापें करणार नाहीं' । ऐसी आण वाहूनि पाही ।
पुढती पापें न करितां लवलाही । नामे जळालें पापशिखर ॥२३३॥
नामें अजामिळाचें पाप गेले । त्यानें पुढेही नाहीं त्या वेश्येस वरिले ।
तात्पर्य नामें शुद्ध झालें । तरी शुद्धत्व रक्षावया पाहिजे वेदाज्ञा ॥२३४॥
म्हणाल विदुराची नीच जाती । वेदाधिकार नव्हता त्याप्रति ।
तरी करोनि भगवद्भक्ति । तरला निश्चिति केवि तो ॥२३५॥



तरी हे शंकाचि गेली वाया । वेदाधिकार नाहीं जया ।
एक नामस्मरणचि धर्म तया । धर्मलोप न होय ॥२३६॥
आपुला धर्मलोप करून । केवळ केलें नामस्मरण ।
ऐसा तरला आहे कवण । द्यावा निवडोन पुराणीं ॥२३७॥
विदुरयातीस नामस्मरण । तोचि तयाचा धर्म जाण ।
यालागीं अधर्मी पुरुषाचें तारण । भगवंती केलें, न घडे हे ॥२३८॥
विदुर जरी वेद शिकता । आणि नामस्मरणें हरी तारिता ।
तरी संशय योग्य होता । काढला तुमचा ॥२३९॥
जयासीं धर्म बोलिला जैसा । तयाचा धर्म घेऊनि तैसा ।
अधर्मियाचा उद्धार होतो आपैसा । ऐसें बोलणें अधर्म ॥२४०॥
म्हणाल गोपिका सोडोनि पति । जारभावें रतिल्या भगवंतीं ।
तरी अष्टवरुषाच्या मूर्तिवरुती । कामविकृती घडेना ॥२४१॥
आणि श्रीकृष्णरूपीं जडता ध्यान । गोपिका विसरति देहभान ।
देहांवरि येताचि जाण । पुढती धर्म आचरिती ॥२४२॥
जोंवरी आहे देहाऽहंता । तोंवरी विधि पाळिजे सर्वथा ।
विदेही पुरुषाची वार्ता । नोहे कल्पांतीं बद्धक ॥२४३॥
येचविषयीं सूरदासवचन । घेवोनियां येथ प्रमाण ।
गोपिकांचे कैसे मन । होते ते आधी निरोपूं ॥२४४॥

सूरदासांचे पद

राग - कल्याण

तबलगि सबै सयान रहै ॥धृ०॥
जबलगि नवलकिशोर मुरली नहिं वदन समीर वहै ॥१॥
तबहीं लौ अभिमान चतुरई पतिव्रत फलहि चहै ॥२॥ (य१४-८४)
जबलगि श्रवणरन्ध्रमारग मिलि नाहिं न मनहिं महै ॥३॥
तबलगि तरल तरू चंचलता बुधिबल सकल अहै ॥४॥
सूरसखी जबते यह धुनि सुनि नाहिं न बचन कहै ॥५॥
मुरलीचा स्वर ऐकिल्याविण । आम्हां पातिव्रत्याचे राहे भान ।
ऐसें गोपी म्हणती आपण । हें वचन सूरदास बोलिले ॥२४५॥

देहांहकृति विरे जेव्हां । काम कैसा राहील तेव्हां ।
कामादि विकारांचा गोवा । देहाचें माथां सर्वहि ॥२४६॥
अष्टवरुषांची कृष्णमूर्ति । गोपिकांची विदेहस्थिति ।
ऐसिया रासक्रिडेस कामक्रीडा म्हणती । ते मज वाटती अतिमूर्ख ॥२४७॥
जैसा ब्रह्मानंदासी कोणी । सांगती स्त्रीसुखाचा दृष्टान्त देउनि ।
तेवीं रासक्रीडा भक्तिसुखालागुनी । कामसुखदृष्टान्त देती मुनी ॥२४८॥
तयाचे हेंचि कारण । कीं भक्तीस लागावें विषयीजन ।
एकवेळ नारायणीं प्रवेशलिया मन । मग अशुद्ध जाण नव्हे कदा ॥२४९॥
म्हणोनि गोपिकांचे उदाहरण । घेउनि नोहे अधर्ममंडण ।
तात्पर्य इंद्रियनियम केलियावीण । नामस्मरण आकुंचे ॥२५०॥

अभंग

"नामस्मरतां म्हणुनी आचराल दोष ।
तरी श्रवण मनन भक्ती पडली ओस" ॥१४॥

ओव्या

एवं मागील सिद्धवचन । तया निःशेष अवमानुन ।
अधर्मी करील नामस्मरण । तरी तो जाण अपराधी ॥२५१॥
म्हणोनि मुमुक्षुलागी पाही । हरिनामावीण गती नाहीं ।
सर्वज्ञ न वळतां शेषशाई । जडकर्म दे ना शुद्धबुद्धी ॥२५२॥
एवं मुमुक्षूसी भगवद्भक्ति । हे वैध सांगितली तुजप्रति ।
आतां जिहीं मिळविली मुक्ति । त्यासही भक्ती श्रेयस्कर ॥२५३॥
मुक्त जाहलियाही वरी पूर्ण । प्रारब्धानें करावें भोजन ।
तरी जो कल्याणनिधान नारायण । तयाचें स्मरण त्यजावें कां ॥२५४॥
धन पुष्कळ मिळालियावरी । घरीं ठेविल्या बहुत नारी । (य१४-८५)
म्हणोनि काय घालावी बाहेरी । जन्मदात्री निजमाता ॥२५५॥
तेवीं झालिया ब्रह्मज्ञान । विषय सेवावेत प्रारब्ध म्हणोन ।
आणि ज्याच्या कृपेनें जाहले ज्ञान । तो भगवान कां उपेक्षावा ॥२६५॥
म्हणोनि रामकृष्णहरिगोविंद । या नामाचे अखिल प्रबंध ।



गातां गातां परमानंद । भोगीत जावा, तनुवाङ्मनें ॥२५७॥
येथ न लगे प्रमाण कांहीं । भ्रमभीतिस्तव प्रमाणावश्यकता पाहीं ।
भ्रम तंव संभवू शके विषयीं । निर्विषयीं नाहीं भ्रांतिभाव ॥२५८॥
निर्विषयासाठीं नामस्मरण । म्हणुनि ते भ्रम न करूं शके उत्पन्न ।
भ्रमाची भीतिचि नसता जाण । मग कां अन्य प्रमाण अपेक्षावें ॥२५९॥
म्हणोनि भयवंत आणि निर्भय । या सर्वांस हाचि उपाय ।
पुलकाश्रुसमन्वित करोनि हृदय । यादवराय चिंतिजे ॥२६०॥

॥ श्लोक ॥

किं प्रमत्तस्य बहुभिः परोक्षैर्हायनैरिह ।
वरं मुहूर्तं विदितं घटेत श्रेयसे यतः ॥ भा.२-१-१२
खट्वाङ्गो नाम राजर्षिर्ज्ञात्वेयत्तामिहायुषः ।
मुहूर्तात्सर्वमुत्सृज्य गतवान्अभयं हरिम् ॥ भा. २-१-१३
तवाप्येतर्हि कौरव्य सप्ताहं जीविताविधिः ।
उपकल्पय तत्सर्वं तावद्यत्सांपरायिकम् ॥

भा. २-१-१२-१३-१४

यास्तव पूर्वकृतांची आतां । वत्सा सोड सर्व चिंता ।
असेल तेवढियाचि जीविता । भजोनि भगवंता सफल करी ॥२६१॥
बाळ खेळले दिवसभरी । माय म्हणोनि रडे भुकेचे अवसरी ।
तै माता धांवोनि प्रेमभरी । घेवोनि कडियेवरी स्तन पाजी ॥२६२॥
तैसे पूर्वी जें जें केले । अवचित मन विरक्त झालें । आणि तै पासूनि निश्चयें
धरितां प्रभुपाउलें । तरी शपथ नारायण उपेक्षिना ॥२६३॥ (य१४-८६)

मनाचे श्लोक

'उपेक्षा कदा रामरूपीं असेना । जिवां मानवां निश्चयो तो दिसेना ॥
सदा सर्वदा देव सन्निध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे' ॥३५॥
एवं श्री समर्थाचे वचन । वेदतुल्य वाटे प्रमाण ।
यालागीं असतिया आयुषीं धैर्य धरून । धाव नारायण म्हण प्रेमें ॥२६४॥
कोणी देवपक्षी खट्वांग राय । दैत्यांना सर्वदा जिंकिता होय ।
तयासी देव म्हणती स्वयें । वर कांहीं माग आतां ॥२६५॥

**तो म्हणें माझे आयुष्य किती । मुहुर्तमात्र देव वदती ।**
**तेव्हा सोडोनि स्वर्गादिकांप्रति । श्रीकृष्णमूर्ती आठवी तो ॥२६६॥**
**पृथ्वी आणि स्वर्गाआंत । विषयवासनामय चित्त ।**
**यालागीं एक भगवंत । अभयदाता कृपाळू ॥२६७॥**
**जैसे उगेचि बाळ रडता । खेळणे देवोनि रिझवी माता ।**
**परी क्षुधेने बाळ रडता । स्तन्यावांचूनी राहिना ॥२६८॥**
**तैसे मंद विरक्तासाठीं जाण । श्रुतिमाता दे स्वर्ग खेळण ।**
**परी तीव्र मुमुक्षुजनाकारण । शरण एक भगवंत ॥२६९॥**
**ऐसें जाणोनि खट्वाङ्गराय । हृदयीं धरी गोविंदपाय ।**
**मुहुर्तमात्रामाजी स्वयें । पावला लवलाहे सद्गतीते ॥२७०॥**
**तुज अवधी दिवस सात । मग खेद कां करिसी व्यर्थ ।**
**आणि वास्तविक पाहता भगवंत । सद्भक्तार्थ वेळ न लावी ॥२७१॥**

ज्ञानेश्वरी -

**''पै रंक एक आडलेपणें । काकुळती धांव गा धांव म्हणे ।**
**तरी तयाचिये ग्लानी धावणें । काय न घडे मज?'' ॥१२८॥**
**''आणि भक्ताही तेतुलीचि दशा । तरी भक्तीचा सोसू कायसा ।**
**म्हणोनि हा ध्वनि ऐसा । न वाखाणावा'' ॥२७२॥ ज्ञानेश्वरी अ. ८**
**''आणि जेव्हांचि कां भक्ति । दिधली आपुलि चित्तवृत्ती ।**
**तेव्हांचि मज सूति । त्यांचिये नाटीं ॥९५॥ (ज्ञाने.अ.१२) (य१४-८७)**
**इत्यादि श्रीमंतवचनें । जी प्राकृती फळली श्रुतिसुमनें ।**
**यालागीं भय निःशेष सांडणें । अभय चिंतोनि गोविंद ॥२७३॥**

**॥ श्लोक १५ ॥**

अंतकालेतिपुरुष आगते गतसाध्वसः ।
छिन्द्यादसङ्गशस्त्रेण स्पृहां देहेऽनु ये च तम् ॥१५॥

(भाग.२-१-१५)

**परी ही लाधावया श्रीकृष्णभक्ती । वमनासम त्यागिजे विषयासक्ति ।**



**यालागीं आधी विरक्ति । नृपाळाप्रति शुक सांगे ॥२७४॥**

॥ अभंग ॥

**जरी तुज देव पाहिजे आवडी । तरी सांडी उडी संसाराची ॥१॥**
**वमनासमान स्त्रिया पुत्र धन । पांडुरगाविण इच्छूं नये ॥२॥**
**मान अपमान ठेवी गुंडाळोनी । संतासी नमोनी सदा राहे ॥३॥**
**ज्ञानेश्वरकन्या वचन अन्यथा । नाहीं नाहीं यार्था साक्षिगुरु ॥४॥**

श्लोक

**हेतुस्वरूपकार्यभेदेन त्रिलक्षणवैराग्यम्-**
**विरक्तेः कारणं प्रोक्तं (१)दोषदृष्टिरनात्मनि ।**
**(२)जिहासा तत्स्वरूपं स्यात् कार्यं (३)भोगेष्वदीनता ॥१॥**
**परापरविभागेन तदप्यस्ति द्विधा पुनः ।**
**तत्राद्यं ()गुणभोगेषु ()विषयेष्वन्त्यमुच्यते ॥२॥**

॥ ओव्या ॥

**जे जे पदार्थ आत्मभिन्न । त्यांचे ठायीं दोषदर्शन ।**
**हेचि वैराग्याचे कारण । नाना मुनिजन बोलती ॥२७५॥**
**जप तप आणि अनुष्ठान । आसन मुद्रा योग ध्यान ।**
**हें आचरणें अवघा शीण । जंव विषयीं मन धुंडाळें ॥२७६॥**
**कोल्हाटियाचिया खेळणीं । नाना आसनांची कडसणी ।**
**परी कोल्हाटिणी योगिनी । जाहल्या केव्हां ॥२७७।**
**ना तरी पोहणार जळीं शिरती । ते बुडी मारोनि श्वास कोंडिति ।**
**म्हणोनि काय तयाप्रती । समाधिस्थिती लाधत ॥२७८॥**
**यालागीं विषय जिंकलियाविण । परमार्थ न कळे करिता साधन ।**
(य१४-८८) **ते विषय सोडावया कारण । दोषदर्शनहेतुक ॥२७९॥**
**ते दोष कैसे पहावे विषयीं । येचविषयीं लवलाही ।**
**शौनकादिकाप्रती पाही । सूत वाक्प्रवाहीं सांगत ॥२८०॥**
**मी मातृजठरीं गर्भाशयीं । मलमूत्राचिया मध्यठायीं ।**
**नवमास राहिलो ते समयीं । दुःख झालें तें वदवेना ॥२८१॥**

माय भक्षी तिखट लवण । तेणें वाढे रजोगुण ।
दाह होय पित्तेंकरोन । परी नव्हे रुदन सर्वथा ॥२८२॥
श्लेष्मेंकरोनि बांधलें मुख । बोलतां नये दारुण दुःख ।
मग सोहं शब्दाचा निष्टंक । आरंभिला जपू ॥२८३॥
तोही करिता साक्षेपू । बाहेर यावया खटाटोपू ।
..................। ईश्वरासी याचना ॥२८४॥
तेथूनि सुटता महीवरी । मायावायूचिया लहरी ।
तेणे भुलोनी निजनिर्धारी । पूतनारी अंतरला ॥२८५॥
बाळपणीचें दुःख भारी । मलमूत्र लाळ लागे शरीरीं ।
माशा तोडिती तथापि करीं । सामर्थ्य कांहीं असेना ॥२८६॥
नानारसांची वासना धांवे । परी सांगतां नये जीव्हें ।
मग मातुःपयोधररसे पोसावे । लागे शरीर अनुपायी ॥२८७॥

॥ हिंदी पद ॥

शिशुपन में सब खेल किये ॥धृ॥
जननिजनकमुखवचन न सुने नहि हरि नाम लिये ॥१॥
खेलत खेलत सीस परस्पर पाथर खाय दिये ॥२॥
श्रीज्ञानेश्वरचरण बिसरिके दिन बिनमोल गये ॥३॥

॥ ओव्या ॥

विषवल्लीचा अंकुर निघाला । तो जरी फुलीं फळीं आला ।
तरी पहिलिया परीस जनाला । अधिकचि तापू ॥२८८॥
तैसे वासना बीजांकुर बाळपण । तयाचा विषवृक्ष झाला तरुण ।
सकल विकाराचें सदन । (य१४-८९) तारुण्य जाण बोलिले ॥२८९॥
नवल या तारुण्याची भ्रांति । येथ विलया जाय शांती ।
केवळ मांसाचिया ग्रंथी । त्यांची संगति आवडे ॥२९०॥
धन्य तारुण्य मोहकपण । कित्येक भुलले बुद्धिसंपन्न ।
कवि तथापि हरि सोडोन । वर्णिती गुण स्त्रियेचे ॥२९१॥
कुच प्रत्यक्ष मांसगाठी । कमंडलु तुळिती तयासाठीं ।
जे लाळ उमटें स्त्रियांच्या ओठी । अमृतवाटी म्हणती तया ॥२९२॥





जे बिभत्स मूत्रसदन । तया उत्तम नाम ठेवून ।
नसते मोहिती कामिकजन । ते जळो कविपण कवीचे ॥२९३॥
मायेवरोनी शिवी देतां । तरी विषाद न वाटे चित्ता ।
स्त्रियेसी डोळे उचलोनी पाहतां । वाटे युद्धार्था निघावे ॥२९४॥
सहोदरांचा सोडोनि संग । वित्तानें पुजी स्त्रियेचे अंग ।
दिसावया सुंदर भांग । मौक्तिक लडी आणवी ॥२९५॥
जया वित्ताचिया पाठी । दोषसमुदाय कोट्यानुकोटि ।
ते वित्त वनिता-पुत्रासाठीं । कष्टे गांठी बांधत ॥२९६॥
धन मेळविता अति कष्ट । नीचांची सेवा करणें स्पष्ट ।
स्वामीसेवकभाव उद्धट । जड धनें या योजिला ॥२९७॥
धनाची आशा एक नसती । तरी सेवकतेस पृथ्वी नोळखती ।
एका धनाचिया हातीं । कवी सरस्वती तेही मिळे ॥२९८॥
कनकासारखे आपुले प्राण । विकती धनार्थ सैन्यांत नेऊन ।
मग वासना तृप्त न होता मरण । पावती करोन बहु युद्धे ॥२९९॥
धनार्थ स्त्रिया सोडिती पती । धनार्थ पुत्र बापा निंदिती ।
जरी पुत्र होता परमार्थी । तरी धनार्थ करिती प्रतिबंध वडील ॥३००॥
मेलिया रडती याचीकारण । कीं आम्हां कवण पुरवील धन ।
एवं सकल दोषांचे निधान । निश्चयें धन बोलिजे ॥३०१॥
खावयास पाहिजे अन्न । त्या अन्नाचें कारण धन ।
ऐसे म्हणती ते अति अज्ञान । न कळे खूण तयांते ॥३०२॥ (य१४-९०)
जवळी नसोनि द्रव्य कांही । पशु जीवंत असतीं सदाही ।
म्हणाल कीं पशुसम देही । मनुष्य केंवी राहती ॥३०३॥
तरी पशुसम असावे समाधान । आणि देवासरिखे बुद्धि मन ।
याचे नांव मनुष्यपण । एर ते पाषाण मी म्हणे ॥३०४॥
जे 'पाहिजे' वाटे चित्तीं । त्याचा अर्थ न्यून सहनशक्ति ।
शीत उष्ण पर्जन्य भिल्ल साहती । तैसी देहस्थिती असावी ॥३०५॥
देह वसावा घराविण । बुद्धि असावी ज्ञानापन्न ।
हेंचि मुख्य संतचिन्ह । उन्मादपण इतरतः ॥३०६॥

केवळ देहासी मात्र दंडिता । सत्पुरुषत्व नये हातां ।
बुद्धि वाढतां वाढतां । देहव्यथा न भासावी ॥३०७॥
याचि नांव सज्ञनपण । यालागी नापेक्षावे धन ।
परी पुनः मेळविल्याहि वरी जाण । करावया रक्षण अति चिंता ॥३०८॥
व्यय होता दुःख भारी । ऐसे कळोनिहि अंतरीं ।
जो असलिया धनातें दूर न करी । त्याहोनि अज्ञानी कोणता ॥३०९॥
मूर्खामाजी परम मूर्ख । जो संसारी मानी सुख ।
पुर्वी गोड अंतीं विख । नेमस्त आहे ॥३१०॥
दिवस जाये कष्ट करितां । रात्र जाय निद्रा करितां ।
शेवटीं काळाचीही सत्ता । देहाचें माथां लागली ॥३११॥
मरमरोनि स्त्रीसुतासाठी । जन्मभरोनी झालो कष्टी ।
त्याही मज एकटे शेवटी । टाकोनियां दिघलें ॥३१२॥
देहसंगे सुखाची काहणी । कोणाच्याही न दिसे नयनीं ।
तथापि जडवाद अवलंबुनी । जन संस्कार स्थापिती नवल हें ॥३१३॥
देहसंगे दुःख दारुण । तरी निश्चय हा कळे पूर्ण ।
की देह नव्हे आपुला गुण । आपण देहाचा गुण नहो ॥३१४॥
जो जयाचा स्वभाव पाही । तो तयास दुःख होत नाहीं ।
सर्पाचें विष कही । सर्पा नाहीं बाधले ॥३१५॥
कीं अग्नीच्या उष्णें करोन । अग्नि जळे म्हणे कवण ।
आपण जडस्वभाव असतों जाण । तरी न कंटाळतो जडदुःखा ॥३१६॥
जड जरी असता आपुला स्वभावो । तरी दुःखदायक न होते पहा हो ।
दुःख जरी असते आपुला स्वभाव । तरी तन्निवृत्तिइच्छा न होती ॥३१७॥

विषयदोषदर्शन

(य१४-९१) यालागीं या दुःखा । विषयां(श्वां)वरी हाणोनी लाथा ।
हृदयीं धरोनी वैकुंठनाथा । वंदिजे माथा साधुचरण ॥३१८॥
कोणी आपुली करितां स्तुती । तेणें शब्दविषयीं गुंते मति ।
मग निंदा करिती तयांचा चित्तीं । उपजे द्वेष ॥३१९॥
स्तुतीचिया प्रेमेंकरून । निंदकाचा द्वेष करी मन ।



एवं स्पर्शविषयीं गुंतता जाण । आळस पूर्ण वाढत ॥३२०॥
भुलोनि रूपविषयाप्रति । पतिव्रता सोडोनि युवती ।
मेळविलें धन वेश्येस वोपिती । अंती जाती यमालयीं ॥३२१॥
रसविषयलोभेंकरोन । अजीर्णयोगें पावती मरण ।
गंधविषयलोभे करोन । रोग दारुण पैं होती ॥३२२॥
एवं सर्व विषयांचिया ठायीं । क्षणोक्षणींहि दोष पाही ।
कांहीं सुख म्हणावें विषयीं । तंव चित्तातें हे रुचेना । ३२३॥
विषय-स्वभाव सुख म्हणतां । तरी रसविषय अधिक सेवितां ।
अजीर्ण होऊनी दुःख देता । न होवावा तो ॥३२४॥
म्हणाल सुख घ्यावयाकारण । प्रमाणांत विषयसेवन । तरी शारीरिक सुख
असो ते पूर्ण । वासना वाढे कीं अधिक सेवनीं ॥३२५॥
एक समयावच्छेदेंकरोन । सर्व विषयभोग अघटमान ।
आणि एक एक विषय सेवितां जाण । होतसे मन चंचल ॥३२६॥
एवं विषय दोषांचे निधी । विषय दुःखाची परमावधी ।
जयासी वाटे व्हावी स्वशुद्धि । तेणें सद्बुद्धि धरावी ॥३२७॥
ऐसें विषयदोषदर्शन । वैराग्याचे मुख्य कारण ।
सांपडलिया समाधान । अंतःकरण पावतु ॥३२८॥
विषयांचे ठायीं दोष पाहतां । उपजे वैराग्य प्रथमावस्था ।
मन विषयीं धांवता धांवता । दोष पाहोनि परतविजे ॥३२९॥

वैराग्याचा अभ्यास

तंव सच्छिष्य करी प्रश्न । विषयापासोन काढणें मन ।
या नांव वैराग्य ठेवलें आपण । तंव अभ्यास तो कवण, वदावा ॥३३०॥
वक्ता वदे सावधान । दोष देखोनि उलटे मन ।
याची नांव वैराग्य पूर्ण । अभ्यास संस्थान धारणेचें ॥३३१॥ (य१४-९२)
नदीचिया रूपकें-करून । योगभाष्यांत सत्यवतिनंदन ।
बोलिले की चित्त आपण । द्विधा वाहे ॥३३२॥
कां एका केदारीचे जळ । केदारान्तरीं नेती सकळ ।
पापवाहिनी मनोनदी प्रबळ । वैराग्यबळें रोधिजे ॥३३३॥

मग कैवल्यापर्यंत यत्न विशेष । याचि नांव बोलिजे अभ्यास ।
तेणें विवेकप्रवाहास । भरते वाटें ॥३३४॥
एवं विषयप्रवाहाची क्षीणता । वैराग्य बोलिजे तत्वतां ।
विवेकाची शनैः शनैः विवेकदृढता । अभ्यास सर्वथा या नांव ॥३३५॥
तद्वैराग्यमादौ निरूपयामः -

॥ अभंग ॥

दोषदरुशनीं घडतो प्रयत्न । तेचि यतमान वैराग्य कीं ॥१॥
इतुकें जिंकिले इतुकें राहिले । व्यतिरेक बोले वैराग्य ते ॥२॥
बाह्य इंद्रियांची खुंटलिया धांव । भोगाभासभाव मनीं वाटे ॥३॥
एकेन्द्रिय तया वैराग्यासी नांव । स्वयें मुनिराव बोलिताती ॥४॥
या तिहीपासोनि चवथें निष्पन्न । ग्राह्य-त्याज्य मन चिंतीना कीं ॥५॥
वशीकार तया बोलताती साधु । प्रसंख्यानें बोधू सांपडे हा ॥६॥
ज्ञानेश्वर प्रभु आठवितां पोटीं । भोगची शेवटी योग देती ॥७॥

प्रपंचीं जनांचा परमार्थ ?

ओव्या :- हेचि वैराग्य व्हाया रक्षण । मुख्य उपाय संन्यासग्रहण ।
पाहोनि सदनीं स्त्री पुत्र दीन । आसक्त मन होय पुढती ॥३३६॥
कामिनीनंदनाचिया करुणा । पुढती करवी संसारयाचना ।
सत्त्ववृत्ति ही विषयीं जाणा । रजोगुणा वाढवी ॥३३७॥
जैसे कां उत्तम अन्न । अधिक खातां आणी मरण ।
तैसा ज्ञानावांचोन सत्त्वगुण । विकारस्थान बोलिजे ॥३३८॥
कोणा एकाचे ऐसे मत । प्रपंचींच घडे परमार्थ ।
तरी ते रसनाशिश्नांकित । न होती समर्थ पुरुषार्थी ॥३३९॥ (य१४-९३)
प्रातःकाळीं उठतांक्षणीं । जया इंधनाची चिंता मनीं ।
ऐसे प्रसंगीं चक्रपाणि । कवणिये गुणीं आठविजे ॥३४०॥
दिवस आलिया दोन प्रहर । पात्रीं अन्न पाहिजे मधुर ।
तेथ एकाग्र करोनी अंतर । कोण कमलावर आठवी ॥३४१॥
रात्रीं पहुडोनी मंचकावरी । आवडी चिंती सुकुमार बाळी ।
तेथ सर्वात्मा पूतनारी । कवण अंतरीं आठवी ॥३४२॥



पुत्र बंधु परमार्थी होती । तयास विषयीं परतविती ।
एवढी ज्यांची विषयासक्ती । आणि करूं म्हणती प्रपंचीं परमार्थ ॥३४३॥
विश्व आघवें नारायण । जंव न देखती आपुले नयन ।
तंव वाहोनि सांगतो आण । प्रपंचीं परमार्थ कदा नव्हे ॥३४४॥
जोंवरी कामिनी आणि कनका । न मानी जेवीं थुंकिला थुंका ।
तोंवरी परमार्थ गोष्टी फुका । व्यर्थ आवांकां प्रपंचीं ॥३४५॥
इंद्रियाचे वाढते चाळे । परमार्थाचें शब्द कोरडे ।
जळो ते तयांचे उपाये वोंगळे । जे वासनाजाळे अतिबद्ध ॥३४६॥

सत्पुरुषाचा पारमार्थिक संसार

यास्तव धन-सदना नमुनी । करुणापन्न होईजे मनीं ।
जे जे भूत देखिजे नयनीं । कृपापात्र परम ते ॥३४७॥
तान्हिये बाळ देखतां संकटी । मायेसी कळवळा उपजे पोटीं ।
तैसे भूत पाहतां दृष्टीं । करुणा पोटीं उचंबळे ॥३४८॥
तया करुणेचिया तळीं । मरणकल्पनेची झाली होळीं ।
तेथ अहिंसेची रळी । चहूंकडे सहज ॥३४९॥
मग यज्ञामाजीं पशुमारण । ऐसे जे कां निगमवचन ।
तें इंद्रियपशुविषयीं गणून । हिंसा निर्वाण त्यागिजे ॥३५०॥
मागें पुढें देखितां भूत । निपटोनि वांछिजे तयाचे हित ।
तेथ असत्याची मात । निषेधार्थही न सांपडे ॥३५१॥
जंव अकल्याणचि नाहीं मनीं । तंव असत्यबोली न वर्ते कोणी । 'नहि प्रियं प्रवक्तुमिच्छन्ति मृषा हितैषिणः' म्हणोनि । भारवी-वाणी गर्जत ॥३५२॥
भूतहितार्थ ज्याची काया । सत्ते करोनी जीवनदया ।
तया अस्तेय सांगावया । समर्थ कोण तिहीं लोकीं ॥३५३॥
जया शिरीं विश्वकल्याणभार । तयासी म्हणावया थोर । (य१४-९४)
ब्रह्मा विष्णु पार्वतीवर । अवघे साचार अशक्त ॥३५४॥
ज्याची स्वभोगार्थ नाहीं क्रिया । त्याची कोण कोठली जाया ।
म्हणोनि तो ब्रह्मचर्या । माजीं एक मुकुटमणी ॥३५५॥
जो देहही आपुला न म्हणे कदा । तो घेईल कासया कुणाची संपदा ।

जयाच्या दृष्टिं आपदा । न दिसेची कोठें ॥३५६॥
एवं अहिंसेच्या पोटीं । धर्म-कनकाची उघडे पेटी ।
मग ऐसे तद्बुद्धि भावी गोमटी । जे अहिंसा नेहटी वाढवी ॥३५७॥
चालत असतां भूमिवरोन । तीस रुतले असतील माझें चरण ।
त्या पापाचें निर्दाळण । करावया स्नान तीर्थी करी ॥३५८॥
कां नित्य निर्मळ पतिव्रता । आपणावरी मानी पतिसत्ता ।
तैसा तोचि 'धर्माधार' असतां । धर्मसत्ता निजांगीं मानी ॥३५९॥

चैतन्यव्यक्ती गंगा

जलोपहित चैतन्यव्यक्ति । याचेचि नांव गंगा म्हणती ।
जी दृष्टि पाहतां उद्धरती । पापप्रवृत्ति अति मूढ ॥३६०॥
जियेच्या तिरीं क्रीडती म्हणून । आम्हीं इंद्रासहि आणू शीण ।
ऐसा वाहती अभिमान । कावळेही ते ॥३६१॥
बाळास स्तन्यदात्री माय । परी ते स्तन्यही वस्त्रबद्ध होय ।
म्हणोनि उघडे स्तन्य गंगामाय । निर्मी जलमय महीवरी ॥३६२॥
पापी अपापी बाळ पाहोन । जी एकसरा होय सकरुण ।
मग कैवल्यकडीये उचलोन । प्रेमपसायदान दे तया ॥३६३॥
त्या विश्वजननीचिया चरणीं । जो न लवेल योगाभिमानी ।
तयास विघ्नें चहोंकडोनी । सिद्धि धांवोनी पाठविती ॥३६४॥
एवं पुण्य सरिता । यांचे भावें सेवन करीतां !
उपलक्षणें भगवदाराधनादि तत्वतां । नियमवार्ता अनुष्ठिजे ॥३६५॥
अहिंसादि यमें शुद्ध अंतर । गंगास्नानादि नियमें शुचि शरीर ।
मग तातोक्त मठप्रकार । पाहोनि राहे एकांती ॥३६६॥

उपासनेचे स्थान

जें स्थान पाहतां रोकडे । वैराग्यासी दुणीव चढे ।
शांति-सुखाचे वाढे । स्वयंवर ॥३६७॥
वर्षाकाळावांचोनि अमृत । जीवनमय निर्झरे जेथ । (य१४-९५)
आपणां कोणी न तोडी निश्चिंत । झाडें आनंदीत सदा फळती ॥३६८॥
जे अवचट डोळियां देखतां । या राज्यादिकां मारोनी लाथा ।



येथची आठविजे भगवंता । ऐसिये आस्था कामुकाही ॥३६९॥
तेथ अभ्यासासाठीं शिवमंदिर । भजनासाठीं कृष्णमंदिर ।
दोन्ही असावें अति समोर । जेवी भेटती हरिहर नयनांगणीं ॥३७०॥

जडात ब्रह्मानुभव

जडामध्यें देव कैसा । या भावनेचा ठसा ।
मिळवावया आपैसा । मूर्तिमय जगन्निवासा आठविजे ॥३७१॥
एक मूर्तिही जयाच्या मनीं । न वाटे शिव वा चक्रपाणि ।
तो भूत ब्रह्म देखेल म्हणोनी । वेदान्त पढोनी शक्य नाहीं ॥३७२॥
मग तया मूर्तीची चेतनचेष्टा । तेथ आपुली कीजे प्राणप्रतिष्ठा ।
ऐसी साधता उपास्यनिष्ठा । जीवेश्वरैक्य काष्ठां सांपडे ॥३७३॥
दृढनिष्ठा देखिलियाविण । मनुष्यही नव्हे प्रसन्न ।
मग चंचल चित्ताप्रति पाषाण । देव म्हणोन बोलेल कां ॥३७४॥
यालागीं हा विचार कीजे मनीं । विषय दुःखाची खाणी ।
तेथ न जावे पुढती चुकोनी । निष्ठा म्हणोनी वाढवूं ॥३७५॥
मग तया निष्ठेचिया हातीं । समाधानाची रसाळ पाती ।
ज्या बाहेर दिसती शिव कृष्ण मूर्ति । हृदयीं प्रगटति त्याची तेव्हां ॥३७६॥
बाहेर दिसत होती जडमय स्थीर । तेचि हृदयीं प्रगटे चेतनाकार ।
मग जडचेतनाचा भेद समग्र । जावोनी हरिहर विश्वमय ॥३७७॥

अभ्यासाची रीती

ऐसी भावना शुद्ध जेव्हां । आत्मा शरीरापासोनि तेव्हां ।
वेगळा काढावया बरवा । आरंभावा अभ्यासू ॥३७८॥
मग पाठी न होईल मूर्तिकडे । ऐसे आसन रचावे रोकडे ।
जेवी बाळ निःशंक मातेपुढें । तेवि बैसावें विकार रहित ॥३७९॥
जे सकल ब्रह्मांडा अधिष्ठान । उपासनेसाठीं झाले सगुण ।
तया शेष भगवंताचें चिंतन । निष्ठा धरून करावे ॥३८०॥
म्हणाल युक्तिवांचोनि कही । सांगणें तुझी प्रतिज्ञा नाहीं ।
येथ निष्ठा ठायीं ठायीं । बोलणें हें अनुचित ॥३८१॥ (य१४-९६)
तरी वस्तु-भावना संगम करितां । श्रद्धेवांचोन न घडे तत्वता ।

व्यवहारांत या दृष्टान्ता । अनंतता देखिजे ॥ ३८२॥
ही माझी माय म्हणोन । ऐसे ज्या स्त्रियेस म्हणतो आपण ।
तेथ नाहीं कोणते प्रमाण । सामान्य अनुमान तेही न घडे ॥३८३॥
मायबाप इतरासी । म्हणोनी तोही असावा मजसी ।
हें सामान्य अनुमान विशेषीं । परी व्यक्ति विषयीं विश्वासची ॥३८४॥
हा माझा पशु हें माझे धन । येथ ममत्व ठेवावया तर्क कवण ।
केवळ वस्तुभावना संगम करून । निष्ठाचि दृढ पै केली ॥३८५॥
तैसी भूतीं भगवद्भावना आधीं । करावया निष्ठाची सिद्धी ।
मग युक्ति करोनियां प्रसिद्धी । आत्मानात्मविवेकाची ॥३८६॥
जोंवरी खावया मिळे अन्न । तोंवरी अभ्यासा काय कारण ।
यास्तव विषयीं दोष देखिलियाविण । विवेकीं प्रवृत्ति कदा नव्हें ॥३८७॥
सुखी जे जे कोणी होती । दुःखियाअधिन तयांची स्थिती ।
जरी जगीं दीनता नसती । तरी पालखी राहती कुणाचे स्कंधीं ॥३८८॥
एवं श्रीमंताचें जिणें । तें निःशेष दरिद्रियाचें देणें ।
तेथ ते नाचती अति अभिमानें । हेचि आश्चर्य वाटते ॥३८९॥
पशूस चारोनियां तृण । काम करविती त्यापासोन ।
आपण भक्षिती उत्तम अन्न । हेचि आश्चर्य वाटते ॥३९०॥
जळो जळो ही देहवासना । जी पळपळही गोवी मना ।
यालागीं थुंकोनी कामिनी धना । कल्याणनिधाना चिंतीजे ॥३९१॥
जयासी मुळीहुनी कही । अविद्यादि क्लेश-संस्पर्श नाहीं ।
जो निराकार सोडोनी लवलाही । भक्त हृदयीं अभिव्यक्त ॥३९२॥
चार वेद ते अतिकृपण । जे जवळ करिती तीन वर्ण ।
हे पाहोनि बोधावया अवघे जन । जो सहस्त्रवदन आविष्करी ॥३९३॥
सर्प असोनि द्वेषी याती । संपादती जयाची प्रीति ।
तो शुभ्रतर तनु सत्यमूर्ति । स्मरिजे चित्तीं योगदाता ॥३९४॥ (य१४-९७)
ऐसिया श्लोकें करूनि ध्यान । हृदयीं करावे सद्‌गुरुस्मरण ।
मग रचावे उत्तम आसन । निर्भयमन होऊनी ॥३९५॥
हा शेष भगवान् हृदयीं ध्याता । योगियांच्या शरीरा तत्वतां ।



विघ्न करो न शकती सर्वथा । कृमी कीटक भूतादिक ॥३९६॥ .........
सर्वथा मन एकाग्र करोनी । आवडी बैसिजे तया आसनीं ।
मग रूपापासोनि मन काढोनी । हरिनामीं वाणी नियमावी ॥३९७॥
ते वाणीचे नियमन । शुक सांगतील आपण ।
श्रोतीं सर्वांगा करोनी कान । द्यावे अवधान आदरें ॥३९८॥

॥ श्लोक १७ ॥

अभ्यसेन्मनसा शुद्धं त्रिवृद्ब्रह्माक्षरं परम् ।
मनो यच्छेज्जितश्वासो ब्रह्मबीजमविस्मरन् ॥

(भाग. स्कं.२-अ१.श्लो.१७)

चौऱ्यांशी लक्ष जीव जाती । तितुकीही आसनें होती ।
परी अवघिया भेदास जाणती । शंकर एक ॥३९९॥
सकल विद्येचे आदिपीठ । तो कैलासनाथ श्रेष्ठ ।
यालागीं आसन प्रकार अचाट । तोचि एकट जाणतू ॥४००॥
यमें गेलें मनोमळ । नियमें आटले इंद्रियमळ ।
तेव्हां बैसावें केवळ । आसनावरी कवण्याही ॥४०१॥
अभ्यास करिता देह व्याधी । दुःख देवोनी करिती उपाधी ।
तिया आसन करिता सुविधी । लयाप्रति पावती ॥४०२॥

(१) सिद्धासन

॥ दोहा हिंदी ॥

जवलो आसा छूटि नहि, त्यागि नहीं जगलाज ।
जबलो इंद्रिय हात नहीं, आसन बिधी बेकाज ॥१॥
जातें त्यजकर सकल यति धन कामिनी मद मान ।
सिद्ध-पद्म कोऊ करे आसन सुखद सुजान ॥२॥
शिवणीस्थानी लावूनी वाम टांच अतिगूढ ।
सव्य टांचही तेचि मेंढ्रोपरि करि रूढ ॥३॥ (य१४-९८)
हृदयीं लावुनी हनुवटी नयन चालती आंत ।
सिद्धासन या म्हणती मुनी भेदक मोक्षकपाट ॥४॥
वज्रासनही गौण असे, बोलति कोणि सुजान ।

**मूळबंधही नांव यया, तात सुवचन प्रमाण ॥५॥**

॥ ओव्या ॥

**एवं बोलिले सिद्धासन । ते साधे जयाकडून ।**
**त्यानें करावे पद्मासन । सर्व व्याधि नाशत ॥४०३॥**
**जे न साधें सुखें करोनी । बैसो नये तया आसनीं ।**
**शरीरश्रमें पावता ग्लानी । मग मन एकाग्रतेंत निद्रा घडे ॥४०४॥**
**मूर्ख साधकांची ये मती । रोग झालिया औषध न घेती ।**
**प्रारब्धवाद प्रशंसिती । दाविती योगविश्वासु ॥४०५॥**
**आहार निद्रेचिया वाटा योग्य न वचे । ऐसा हृढीवेचेनि अवतरणे नाचे ।**
**तात म्हणति ते शरीरचि नव्हे तयाचे । तरी मग योग कवणाचा ॥४०६॥**
**नवल या मूढ जनांची गोष्टी । आपण न होती किंचित्कष्टी ।**
**जो सुकुमार जगजेठी । तया म्हणती 'देह रक्षी' ॥४०७॥**
**आपुला व्याधी देवाचें शिरीं । घालुनी म्हणती आम्ही अविकारी ।**
**जैसा कोकशास्त्र पढोनि चारी । वेद पढलों मी म्हणे ॥४०८॥**
**कां मायेची सेवा करावी म्हणून । आपण बैसावें अरण्यीं जावून ।**
**मग मातेस कंटकवनांतून । सेवाकरणार्थ बोलाविजे ॥४०९॥**
**तैसें आपण शरीरें रोगी । आणि भाव ठेविती पांडुरंगी ।**
**कीं आम्हांस येऊनि हरि आंगीं । रक्षोनि योगीं करिल स्थीर ॥४१०॥**
**असो तया मूढांचें मत । जेणें सुख होय विख्यात ।**
**ऐसें आसन यथास्थित । रचावें कीं ॥४११॥**
**''स्थिरसुखमासनमिति, न नियमः''।**

*(सांख्यदिवाकर पंचमप्रकाश सूत्र २४)*

**ऐसें सांख्यसुत्रीं वदले मुनी महा ।**
**यालागीं सुख होय ऐसें पहा । आसन करोनी आवडीं ॥४१२॥** (य१४-९९)
**तें सिद्धासन बोलिलें  एक ।**

(२) बद्ध पद्मासन

**आता पद्मासनाची रीती देख ।**
**चिंतोनिया भोगीनायक । पद्मासन बद्ध व्हावे ॥४१३॥**



॥ अभंग ॥

**वाम मांडीवरी ठेवी सव्य पाय । ठेवी वाम पाय दक्षिणांकीं ॥१॥**
**पाठिमागोनियां नेइ दोन्ही हात । धरावें त्वरित आंगोठे ते ॥२॥**
**ज्या पायाचा त्याचि करानें धरावा । बंध तो करावा जालंदर ॥३॥**
**दृष्टी ती ठेवावी नासिकाग्रपीठीं । आठवावा पोटीं गोपीरंग ॥४॥**
**हेचि पद्मासन निवारी देहव्याधी । जडवी समाधी ज्ञानेश्वरीं ॥५॥**
**॥ द्वयोरप्यासनयोर्मध्ये मेरुदंडो रुजुः कर्तव्यः ॥**

चूर्णिका -

**एवं ऐसे जिंकिलिया आसन । मग तया आसनजयाचें होवावया रक्षण ।**
**योग्य संचरावा पवन । यालागीं करावे आहारनियमन ।**
**आधीं वर्जावे तिक्त लवण । अति शुष्क अति द्रुत त्यजावे अन्न ।**
**अतिरूक्षही द्यावे सोडून । तैसे न सेवावें कुळिथादि अत्युष्ण ।**
**महिषीदुग्धादि निद्राकारण । आविघृतादि वमनार्ह पूर्ण ।**
**मद्यमांसादि तामस गहन । हे अवघेचि अन्न परित्यागुन ।**
**जेणें देह होय सत्त्वसंपन्न । ऐसे घृताप्त तंडूळ सेवून ।**
**अथवा केवळ दुग्धपान । करोनि जीवन धरावें ॥१॥**

ओवी

**परी जो वानप्रस्थ संन्यासी । हा आहारनियम तयासी ।**
**आणि गृहस्थ योगियासी । नियम ऋतुचर्या दिनचर्या ॥४१४॥**
**एवं आहार नियमोनि जाण । मग मेळवावया ब्रह्म पूर्ण ।**
**ब्रह्मचर्य निर्वाण । पाळावे कीं ॥४१५॥**
**जयाची ब्रह्मचर्यस्थिति । पाहोनी कैलासीं पार्वती ।**
**म्हणे माझें बाळ एक क्षितीं । जाईन त्या पयः पाजावया ॥४१६॥**
**ऐसी जयाची स्त्रियांच्या ठायीं । उचंबळे मातृता पाही ।**
**ब्रह्मचारी तोचि लवलाही । येर अवघे सलज्ज ॥४१७॥ (य१४-१००)**
**प्राण गेलियाही निश्चिती । जो चित्तीं न वांछी कामिनीरती ।**
**जयाचें वदन पाहतां युवती । उपजे तैं पोटीं वात्सल्य ॥४१८॥**
**एक अतिदृढ लावोनि कौपिन । अंतरी वांछिती सुंदर कामिन ।**

**वाहोनि सांगतो श्रीकृष्णआण । ब्रह्मचारी नव्हती ते ॥४१९॥**

ब्रह्मचारी : मुख्य लक्षण : मातृभाव

**आतां ब्रह्मचारी मुख्य लक्षणी । बोळखिजे ते ऐकिजे श्रवणीं ।**
**आधी पुरुषनारीभाव कही । उमटेचिना कदापि ॥४२०॥**
**आणि प्रारब्धें उमटला जरी । अवचटें डोळिया देखिली नारी ।**
**कैसी भावना उपजे तरी । तेचि अंतरीं ऐकावें ॥४२१॥**
**पायावरी दृष्टी जातां । म्हणे ही एक माझी माता ।**
**म्हणोनि घाली दंडवता । बाह्य अथवा अंतरी ॥४२२॥**
**नेसलें वस्त्र दृष्टी पडतां । ऐसे भावी आपुल्या चित्ता ।**
**म्हणे मज अंबेची दत्तकता । झांकावया पल्लवें हें वस्त्र ॥४२३॥**
**उदर पाहतां त्रिवलीपूर्ण । म्हणे हें माझें गर्भीचें सदन ।**
**नाना विघ्नें बाधतील म्हणून । याचि उदरीं राहिलो मी ॥४२४॥**
**हृदयीचें सुंदर देखिता स्तन । पोटीं क्षुधा वाढे गहन ।**
**ऐसें चित्तें करी प्रार्थन । अंबे दुग्ध पाजी माते ॥४२५॥**
**वदन दृष्टीं पडतां म्हणत । मज बाळा म्हणोनिया त्वरित ।**
**आई केव्हां हांकारीत । ते अजून कळेना ॥४२६॥**
**एवं जे जे अवयव देखे नयनीं । तेथ तेथ देवत्व भावी मनीं ।**
**ऐशी भावना करिता करिता कामिनी । अवघ्याचि होती अंबिका ॥४२७॥**
**मग ज्या देवीपुढें सकाम जन । मनुष्यबळी देती नेऊन ।**
**ती देवीच माता स्वयें होऊन । कामिनीरूपें चहूंकडे ॥४२८॥**
**मायेचिया क्रोधाची भीती । जैसी न वाटे बाळकाप्रति ।**
**तैसी कालिकास्वरूपी जी पार्वती । तेथही प्रीती अत्यंत ॥४२९॥**
**कुरूप सुरूप नाहीं ठावा । चहुंकडे प्रेमदुग्ध ठेवा ।**
**शेवटीं स्त्रीपुरुषभाव आघवा । आटोनी शिवा-शिवरूप जन ॥४३०॥**
**ऐसें ब्रह्मचर्य साधल्यावीण । जे यती होती लंगोटी कसून ।** (य१४-१०१)
**तिही सांडोनि भगवेपण । करावें लग्न मी म्हणे ॥४३१॥**
**यति होवोनि मनांत झुरणें । त्याहुनि उत्तम विवाह करणें ।**
**पक्षीं वा मासीं स्त्रीसंगनियम धरणें । हे गौण ब्रह्मचर्य तरी साधे ॥४३२॥**



पत्नीस माता म्हणू नये

**कोणी ब्रह्मचर्याचिया संमति । अत्यंतचि वेडाविती ।**
**तया वेडामाजी म्हणती । आपुलिया पत्नीस माता ॥४३३॥**
**तेही योग्य नव्हे जाण । जरी ब्रह्मचर्य आवडे आपणाकारण ।**
**तरी वानप्रस्थ घ्यावा आपण । परी पत्नीस माता न म्हणावे ॥४३४॥**
**पत्नीस माय आपण म्हणता । तिने मग धर्म करावा कोणता ।**
**पतिसेवाचि धर्म पुरता । पत्नीलागीं बोलिला ॥४३५॥**
**पतीचि जरी जाहला सुत । मग तियेचा धर्म बुडाला समस्त ।**
**धार्मिकाचे संगति धर्म बुडत । तरी ती संगत काय कार्या ॥४३६॥**
**यालागीं पत्नी असलिया जाण । ब्रह्मचर्य पाळावें गौण ।**
**अणि परस्त्रीविषयी अति कठिण । पूर्वोक्त ब्रह्मचर्य पाळावे ॥४३७॥**
**अथवा तीव्र असेल वैराग्य जरी । आश्रमांतर करावे तरी ।**
**परंतु माय म्हणूनि आपुली नारी । धर्म तिचा भ्रष्टवूं नये ॥४३८॥**
**आपणांस विषय आवडत नाहीं । तंव तैसे तीस सांगावें लवलाही ।**
**परी ती मस्तक ठेविता पायीं । सेवा घ्यावी आदरें ॥४३९॥**
**अति वैराग्य असेल जाण । तरी संगमात्र वर्जिता पूर्ण ।**
**पूजा घेतां स्त्रियेकडून । दोष नाहीं सर्वथा ॥४४०॥**
**परी मज पूजते माझी कामिनी । ऐसी महंती न धरावी मनीं ।**
**आणि तिनेंही भावावें अंतःकरणी । कीं पती जीव नव्हे ईश्वरू ॥४४१॥**
**ब्रह्मचर्य इच्छील स्त्रियांचें मन । तरी न घडेचि पति आज्ञेवीण ।**
**असो हें वाढले निरूपण । परी या नियमावीण योग साधेना ॥४४२॥**
**एवं जितासन मिताहारी । एकनारी वा ब्रह्मचारी ।**
**राहोनियां वाणीवरी । श्रीपूतनारी वसवावा ॥४४३॥**

प्राणायाम व ॐकार

**एवं बोलिले अवघे नियम । आतां आरंभावया प्राणायाम ।**
**जपगर्भाचा उपक्रम । सूत सांगे शौनका ॥४४४॥** (य१४-१०२)
**सकल जपामाजी वरिष्ठ । नाम हरीचें घ्यावें प्रगट ।**
**ते कोणते तरी स्पष्ट । जे प्रसिद्ध श्रुतिमाजी ॥४४५॥**

जे ब्रह्मवाचक अक्षर । तेचि बोलिजे ब्रह्माक्षर ।
जेथ अकार उकार मकार । तिन्ही एकत्र मिळाले ॥४४६॥
अथवा हृदय कंठ आणि मुख । हेंचि तीन स्थानें देख ।
यामाजी जितुकें हरिनाम अलौकिक । तितुके ब्रह्माक्षर बोलिजे ॥४४७॥
मूळ पदाचा अर्थ ऐसा । कीं नाम घ्यावें शुद्धमनसा ।
यालागी नाम जपोनि वाटेल तैसा । आचरी तो योगी नव्हे ॥४४८॥

॥ चौपाई ॥

राम नाम सब जाने कोई । कोप काम मानस पत खोई ।
जो नहि त्यागहि दस अपराधा । नाम लेत नहि मिटे कुबाधा ॥१॥

॥ दोहा ॥

राम नाम निज वदन रहे, अंतर कामिनिकाम ।
अनयातम सुधि मूढमति, छूटत नहिं जमधाम ॥१॥
राम नाम शिव जपे सदा, तदपि विरक्ति सुहेत ।
छोरि सकल सुविलास सुख, कीन मसान निकेत ॥२॥
यास्तव नाम विरक्तिविना, उपजवि अति अभिमान ।
ते मनिं जपतां परम शुची, हृदयिं प्रगटे राम ॥३॥

॥ ओव्या ॥

यालागीं भाषांतरी कल्पित । सांवळा गोवळा नामें अनंत ।
चांडालादि वर्णा विहित । पाप हरत निजबळें ॥४४९॥
आणि प्रसिद्धें जीं पुराणीं । तीं नामें सच्छूद्रा लागुनी ।
जपतां विक्षेपतरंगिणी । परतीरा नेतीं ॥४५०॥
आतां द्विजासी परम सुंदर । वेदारंभीचा जो ॐकार ।
एक करोनि अंतर समीर । जपतां पार पाववी ॥४५१॥ (य१४-१०३)
तो जपावा संध्या प्राणायामीं । सर्वदा वाणी रंगावी हरिनामीं ।
सकल नारीनर आश्रमीं अनाश्रमीं । नामेकरोनि तरती हो ॥४५२॥
यालागीं आधी चित्त । शुद्ध करूनियां विख्यात ।
मग योजावें अखंडित । प्रणवार्थी ॥४५३॥
अ-कारेकरुनी चिंतिजे विधी । त्याची उ-कारे करावी समाधी ।





उ-कारीं विष्णू कृपानिधि । चिंतोनी म-कारीं समाधी कीजे ॥४५४॥
म-कारें चिंतूनि शूलपाणी । पुढें जा जेथ तुर्या-राणी ।
तेथ गेलिया आटणी । वाणी मन पवनाची ॥४५५॥
ऐसे ब्रह्मबीज-स्मरणफळ । मेळवावया केवळ ।
आधीं न होता उतावेळ । मनःप्राण संयमावे ॥४५६॥

॥ अभंग ॥

रेचक पूरक कुंभक हे तीन्ही । प्राण संयमनीं उपयोगी ॥१॥
अगर्भ सगर्भ तयांतही भेद । अगर्भ प्रसिद्ध हीनवर्णा ॥२॥
शूद्रा नामगर्भू द्विजा तारगर्भू । देवता स्वयंभू ध्यानासाठीं ॥३॥
मात्र काळ तेही मोजोनिया घ्यावें । आवडी भजावें ज्ञानेश्वरा ॥४॥

॥ श्लोक ॥

वायु नासापुटें वारा देहाबाहेर काढुनी ।
आकाशात्मकता चित्ता तो प्राणायाम रेचक ॥१॥
आंत ओढोनिया वायु भरणें उदरीं दृढ ।
सर्व शक्ति प्रदाता जो त्यास पूरक बोलती ॥२॥
रेचकं पूरकं त्यक्त्वा नैव गात्राणि चालयेत् ।
चित्तही स्थिरता पावे त्यास बोलति कुंभक ॥३॥
आतां मात्रेचें लक्षण । श्वासाचे उर्ध्वाधोगमन ।
तयाचें नांव मात्रा जाण । किंवा प्लुत प्रणवोच्चारण ही मात्रा ॥४५७॥
(य१४-१०४)

॥ अभंग ॥

इडेनें पूरक करावा तो आधी । जप मात्रावधी द्वादश कीं ॥१॥
कुंभकीं षोडश प्रणव जप हा । रेचकांत दाहा संख्या कीजे ॥२॥
पिंगलेनें रेचू झालिया पुरावा । इडेनें रेचावा पुढती तो ॥३॥
या नांव बोलिजे एक आवर्तन । मध्यम द्विगुण प्राणायाम ॥४॥
उत्तम त्रिगुण मात्राजपे होय । उचलत स्वयें आसन खीं * ॥५॥
पुरकीं चिंतावा नाभिस्थानीं हरी । कुंभकीं सावित्रीकांत हृदीं ॥६॥
रेचकीं ललाटीं चिंतावा गिरीश । सद्गुरु ज्ञानेश कृपाघन ॥७॥

(टीप-*आकाशाचे ठायीं )

**ओवी :- ऐसा संवित कुंभक वाढे । मग केवळ-कुंभक जोडे ।**
**तेणें मनाची प्रवृत्ति मोडे । आंत मुरडें इंद्रियगण ॥४५८॥**

**॥ श्लोक १८ ॥**

नियच्छेद्विषयेभ्योऽक्षान्मनसा बुद्धिसारथिः ।
मनः कर्मभिराक्षिप्तं शुभार्थे धारयेद्धिया ॥

(भाग.२-१-१८)

प्रत्याहार

**मग जें जें मन अति चंचल । जें निरोधितां थकलें सकळ ।**
**तापसी व्रती ध्यानशील । व्रतभंग पावले हो ॥४५९॥**
**अगाध या मनाची ओढी । तपिया सिद्धि देवोनी पाडी ।**
**या मनाचे पायी बेडी । प्रत्याहाराची घालिजे ॥४६०॥**
**जिकडे जिकडे जाय मन । विवेकांकुशें आवरून ।**
**आंतचिया आंत निरोधन । या नांवा प्रत्याहार म्हणें ॥४६१॥**

धारणा

**तया प्रत्याहाराचेनी बळें । शिथिल जाहली वासनामुळें ।**
**मग धारणेचेनि बळें । उपटोनि टाकिजे तें ॥४६२॥**
**कां बाहेरूनी मन परतविणें । या नांव प्रत्याहार म्हणणें ।**
**परतविलें मन स्थळींच ठेवणें । या नांव बोलिजे धारणा ॥४६३॥**
**ते धारणाही बहुविध देख ।** (य१४-१०५) **परी त्यांत रहस्य आहे एक ।**
**सकल धारणेंसी आश्रय सम्यक् । श्रीयदुनायक जरी होय ॥४६४॥**
**तरी इतरत्र केलियांचे फळ । पावोनिया स्वयें सकळ ।**
**हातीं सांपडे तमाळनिळ । जो प्रेमळचित्तचोरटा ॥४६५॥**

**श्लोक १९**

तत्रैकावयवं ध्यायेदव्युच्छिन्नेन चेतसा ।
मनो निर्विषयं युंक्त्वा ततः किंचन न स्मरेत् ॥१९॥

(भाग.२-१)

**ऐसें ऐकोनि श्रीगुरुवचन । सच्छिष्यें आरंभिला प्रश्न ।**



**श्रोतीं सर्वांगा करोनि कान । सावधान ऐकिजे ॥४६६॥**

॥ दोहा ॥

**स्वामी दीनदयाल कह्यो ईशधारणविधान ।**
**पतंजली क्यौं भेद कहत कहिये कृपानिधान ॥**

प्रश्नाभिप्राय :- ''भगवन्, केवल परमेश्वरचरण की धारणा करि समाध्यंत सकल योगसिद्धि की प्राप्ति होवे है ऐसी श्रीगुरुवचनाभिप्रायवत्ता दिखती है और योगशास्त्रके वेत्ता भगवान पतंजली तौं भिन्न भिन्न धारणाओंते भिन्न भिन्न सिद्धियों की प्राप्ति कहते हैं. यदि केवल परमेश्वरचरणधारणातेही सकल योगसिद्धियों की प्राप्ति होती होवे तो ईश्वरप्राणिधानतें भिन्न अन्योपायोंका कहना अत्यंत निष्फल है. क्या यह पतंजलीने नहीं जाण्या था?''

''वत्सा, तुला त्यांचा अभिप्राय समजला नाहीं. योगशास्त्राचें पूर्वापर अवलोकन करून पहा. ज्या विभूतिपादांत धारणेचें अनंत प्रकार सांगितले आहेत, त्या पादांतच भाष्यकारांनीं असें म्हटलें आहे कीं, जो ईश्वरप्रसादानेंच वरच्या भूमीवर गेला आहे, त्याला खालच्या भूमीवर संयम करण्याची आवश्यकता नाहीं.

आतां, ईश्वरप्रणिधानाहून भिन्न उपाय सांगण्याचें कारण असें आहे कीं, योगी नसूनही पाण्यांत प्रहर **(य१४-१०६)** प्रहर बुडून रहाणारे पुरुष ज्याप्रमाणें श्वासनिरोध करितात तद्वत् खरे मुमुक्षु नसूनही केवल सिद्धीच्या आशेनें सकाम लोकांची योगाचे ठिकाणीं प्रवृत्ति होते; आणि कामनेचा नियम तर हा आहे कीं, जितके जितके तिला विषय द्यावे तितकी तितकी तूप घातलेल्या अग्नीप्रमाणें ती वाढतच जाते. ह्या सकाम लोकांना जर ईश्वरप्रणिधान सांगितले तर ईश्वराचें ऐश्वर्य आपल्याला असावे अशी ते अपेक्षा करतील व एकवेळ नित्यऐश्वर्य प्राप्त व्हावे अशी वासना उत्पन्न झाली म्हणजे कधीही वैराग्य होणार नाहीं. वैराग्य न झाल्यामुळे ईश्वर जसा ऐश्वर्याचा साक्षी होतो तसे हे सकाम ईश्वरोपासक योगी साक्षी न होता प्रत्युत (उलटे) भोक्ते होतील.

भोग कर्मावाचून घडत नाहीं. कर्माला आरंभ असतो. ज्याला आरंभ असतो ते नित्य नसते. म्हणून कर्माचें फल जे भोगरूप ऐश्वर्य ते नित्य होणार नाहीं. अनित्य ऐश्वर्यापासून च्युत झाल्यावर दुःख होईल. अशा अनित्य सुखाचा

उपदेश करण्याकडे शास्त्रकारांची प्रवृत्ति नाहीं. आणि ऐश्वर्यभोग कितीही उग्र असले तरी ते भोगण्याकरितां व्युत्थानदशा पाहिजे. समाधिदशेंत भोग कधींही घडत नाहींत, म्हणूनच ह्या सिद्धीला व्युत्थान दशेंतच थोरपणा आहे. समाधिदशेंत ह्या सिद्धि केवळ विघ्न आहेत, असें योगसूत्रकारांनी विभूतिपादांत म्हटलें आहे. समजलास?

सकाम लोकांची कामना सिद्धिपर्यवसायी असल्यामुळें भिन्न भिन्न सिद्धी मिळविण्याकरितां भिन्न भिन्न अनेक उपाय आहेत तितके मिळवून घेण्याकरितां अत्यंत श्रम लागतात. आणि ह्या सिद्धीहि उपायसाध्य असल्यामुळें अनित्यकर्मफलरूप आहेत म्हणून जसें विषयांत दुःख आहे तसें ह्या सिद्धी मिळवून घेण्यांतही अत्यंत दुःख आहे. **(य१४-१०७)**

एवढ्याकरितां इहलोकचे भोग जसे श्वानविष्ठेप्रमाणें त्याज्य आहेत, तसें पारलौकिक ऐश्वर्यभोगहीं काकविष्ठेप्रमाणें त्याज्य आहेत. असा सकाम धर्मनिष्ठांच्या चित्तांत विचार येऊन त्यांना वैराग्य व्हावें हाच ईश्वरप्रणिधानभिन्न अनेक उपाय सांगण्याचा उद्देश आहे.

एक रहस्य

तथापि ह्यांत आणखी एक रहस्य आहे. शाखेवरील चंद्र पहाणाऱ्याला ज्याप्रमाणें चंद्रच ग्राह्य असतो, शाखा ग्राह्य नसते, त्याप्रमाणें विभूतिपादांत जे धारणा करण्याला अनेक देश सांगितले आहेत, त्या त्या देशावर चित्त स्थिर करतांना **खरें योगसौख्य इच्छिणाऱ्याला तत्तद्देशोपहित परमात्माच ग्राह्य आहे, तो देश ग्राह्य नाहीं.** परमेश्वरावांचून नुस्त्या हृदय आदि जड देशावर धारणा करणाऱ्याला काय प्राप्ति होणार? – आतां हे रहस्य योगसूत्राचे भाष्यकारांनी कां प्रगट केले नाहीं असे म्हणशील तर तो प्रश्न तूं आम्हास विचारूं नकोस. त्यांना जाऊन विचार. अद्यापि ते भगवान् व्यास चिरंजीवी आहेत.

शिष्य :- भगवन्, भाष्यकारांकडे बोट दाखविण्याचें कारण मी समजलो. सामान्यतः गूढ असलेल्याचें सद्‌गुरुमुखानें विशेषतः स्पष्टीकरण होत असते, अशीच श्रुतिसूत्रभाष्यादिकांची परंपरा चालत आलेली आहे. म्हणून आम्हा सारख्यांना अगोचर असा भाष्यकारांचा गूढ सिद्धान्त आपण स्पष्ट केला. त्याविषयी माझा कोणत्याही प्रकारचा विवाद नाहीं.





परंतु निरनिराळ्या देशांची उपाधी घेऊन ईश्वरधारणा करण्यापेक्षां भक्तिशास्त्रांत सांगितलेलें त्याचें शामसुंदरत्वादिस्वरूप धारणेचा विषय केल्यास शीघ्र कृतार्थता व्हावी असें मला वाटतें, म्हणून ती साकार धारणा प्रथम कशी करावी व तिजपासून समाधि कसा मिळवून घ्यावा ह्या प्रश्नोत्तराची प्रभुकृपाजननीपुढे पदर पसरून याचना करितो. **(य१४-१०८)**

श्रीगुरु - सम्यक् विचारलेस, आतां उत्तम अवधान दे.

ओवी :-

**एवं हातां आलिया मन । इंद्रियीं सोडलिया विषयध्यान ।**
**मग करावे संधारण । आवडीकरूनि हरिपदाचें ॥४६७॥**
**कां पतिव्रता आणि जारिणी । राहूं न शके एके ठिकाणीं ।**
**तैसी भगवद्भक्ति आणि भोगवासना मनीं । एक वेळी न राहे ॥४६८॥**
**जवळीचे धन वेंचल्याविण । पल्लवीं न पडे उदारपण ।**
**तैसी विषयाशा सोडिल्यावीण । भगवद्ध्यान अनर्थू ॥४६९॥**
**श्रीरामनाम आवडे मानसीं । स्मरण न करीच अति आळसी ।**
**वांझ गाय कपिला जैसी । जाणा तैसी ते भक्ति ॥४७०॥**
**भगवद्ध्यान आवडे पोटीं । बाहेर करी टवाळ गोष्टी ।**
**तेही आवडी समूळ खोटी । ओस देठीं फुल जैसें ॥४७१॥**
**जरी करावें लागें भोजन । तरी आधी हस्तपादप्रक्षालन । तैसें जरी करणें**
**आहे भगवद्ध्यान । तरी आधी करावें मन निर्विषय ॥४७२॥**
**करावया आधीं भगवद्ध्यान । निःशेष सुटावे स्त्रीधनचिंतन ।**
**आणि ते सुटावया कारण । प्रत्याहारें मन वश कीजे ॥४७३॥**
**तो साधावया प्रत्याहारू । यम-नियम-आसन-प्राणायाम प्रकारु ।**
**हा उपायसमुदाय निर्द्धारू । बोलिला उपरी सर्वही ॥४७४॥**
**अनध्यस्तविवर्त हरिशरीर । तया पादाद्यवयव अति सुंदर ।**
**तेथ चित्त होय सामान्य एकाग्र । धारणा नाम ययाचें ॥४७५॥**
**जैसा दुरूनि पदार्थ पाहतां । तरी डोळिया दिसे सामान्यता ।**
**अवघे भाग जवळी येता । स्पष्ट तत्वता दीसती ॥४७६॥**
**तैसें सामान्यतः भगवच्छरीर । सावयव जे तेथ अंतर ।**

**एकाग्र होय त्या धारणाप्रकार । स्वामी श्रीधर बोलती ॥४७७॥**
**व्यासभाष्योक्तिहूनि देख । श्रीधरोक्त धारणा मज वाटे सम्यक ।**
**जयाचा हात धरोनि लेखक । प्रल्हादरक्षक जाहला ॥४७८॥**
**श्रीमद्भागवताचा अर्थ । करावया जेथ बुद्धि नव्हे समर्थ ।** (य१४-१०९)
**तेथ स्वयें धरूनि हात । नृसिंह लिहवित श्रीधराकडुनी ॥४७९॥**
**व्यास तव विष्णुचि आपण । पाळावया भक्तवचन ।**
**आपुलिया उक्तिहुनि श्रेष्ठ धारणालक्षण । श्रीधरा कडोन लिहविलें ॥४८०॥**
**ना तरीं व्हावया सत्पुत्र कीर्ति । मायबाप त्यापासुनी पराजय वांछिती । तैसी**
**स्वभक्त महिमा वाढवावया प्रति । श्रीधराकडुनि लिहविती व्यास विष्णु ॥४८१॥**
**असो उपरोक्त लक्षण धारणा । दृढ साधलिया जाणा ।**
**येथचि एकतानता होय मना । तैं अवयवस्पष्टता सहजचि ॥४८२॥**
**जवळील पदार्थ स्पष्ट दिसे । तैसे ध्यानीं अवयव दाढर्य भासे ।**
**''तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्'' ऐसे । योगसूत्रही प्रमाण कीं ॥४८३॥**
**पात्रामाजीं असतां पक्वान्न । तितुके धारणेमाजी दूरपण ।**
**जिभेवरी ठेवितां पक्वान्न । तैसे समीपपण ध्यानासी ॥४८४॥**
**पक्वान्न भक्षिलिया जी राहे तृप्ती । तैसी हारपोनी ध्यात्याची वृत्ति ।**
**जे उरे परमानंद भगवन्मूर्ति । समाधि बोलती या नांव ॥४८५॥**

शिष्य :- भगवन् वितर्क, विचार, आनंद आणि अस्मिता असे सविकल्प समाधीचे चार प्रकार योगसूत्रकारांनी सांगितले आहेत. आपणही समाधींत आनंद होतो म्हणून आतां सांगितलें आहे. हा आपला समाधि सविकल्प असावा असें मला वाटतें.

॥ ओव्या ॥

**सावधानमनें ऐक ताता । योगसूत्रोक्त आनंदसमाधिपैलीकडे अस्मिता ।**
**आम्ही भगवद्ध्यान करिता । अहंकृति सुटे, वदलों ॥४८६॥**
**विकल्पसाक्षि भगवंत । तेथ विकल्प न राहे किंचित् ।**
**भगवदितर वस्तुगत । बोलिजे समाधि सविकल्प ॥४८७॥**
**भगवंतीं समाधि करितां । तरी सहसा साधे निर्विकल्पता ।**
**जैसे इतर पक्वान्न गोड करितां । अपेक्षा लागे शर्करा ॥४८८॥**



**परी शर्करा गोड करावया पाही । इतर पक्वान्नाची अपेक्षा नाहीं ।** (य१४-११०)
**तैसी मायिक पदार्थी समाधि करितां पाही । अपेक्षा लागे सद्विकल्पाची ॥४८९॥**
**परी जो सर्व सत्याचें सत्यपूर्ण । जो सर्व चेतनाचें चिद्घन ।**
**त्या प्रभुचें समाधींत स्मरता चरण । विकल्पविंदान कासया ॥४९०॥**
**कीं पारकिया राव भेटी घेतां । लागे सेवकाची आवश्यकता ।**
**प्रत्यक्ष रायाची मैत्री करितां । सेवकावश्यकता निरुपयोगी ॥४९१॥**
**तैसी इतर पदार्थद्वारा जाण । जेव्हां करावें भगवच्चिंतन ।**
**तेव्हांचि विकल्पापेक्षा म्हणोन । सविकल्प समाधि म्हणती तया ॥४९२॥**
**परी जे प्रत्यक्ष भगवदवतार । तत्पदीं चित्त करितां एकाग्र ।**
**विकल्प न लगेचि साचार । या लागीं निर्धार निर्विकल्पीं ॥४९३॥**
**म्हणूनी योगाच्या समाधीहून । भक्तियोगसमाधि श्रेष्ठ ग्रहण ।**
**घेरंडाचार्य योगी असून । भक्तियोगसमाधि प्रशंसिती ॥४९४॥**
**तो भगवद्भक्तियोग समाधि । करवि ज्याचिये बुद्धी ।**
**सांगत असे कृपानिधि । बादरायणनंदनू ॥४९५॥**

॥ श्लोक १९ ॥

''तत्रैकावयवं ध्यायेदव्युच्छिन्नेन चेतसा ।
मनो निर्विषयं युंक्त्वा ततः किंचन न स्मरेत् ।
पदं तत्परमं विष्णोर्मनो यत्र प्रसीदति ॥१९॥

(भाग.२-१)

**तरी विषयाचिया अटवीं । निजात्मया तृष्णा *अटवी ।** ***(*अटवी = फिरविते)***
**तेथ आपुली दशा नुमटवी । सद्विवेकू सद्धैर्य ॥४९६॥**
**तेचि तृष्णा सोडोनि मन । जैं विषयावांचोनि समाधान ।**
**तैं विवेकाचा प्रकाशू गहन । षडरी तमा जाळित उठे ॥४९७॥**
**समाधीचें प्रयोजन । विवेकख्याति उद्भवन ।**
**ती विवेकख्यातीही होय क्षीण । भगवद्भक्तिसमाधौ ॥४९८॥**
**''तयोपक्षयाच्च इति'' । भगवान् शांडिल्य सूत्रोक्ति ।**
**तदर्थ कीं भगवद्भक्ति । विवेक-ख्याति क्षय करी ॥४९९॥**
**विषयाची तृष्णा सुटे जेव्हां । अपर वैराग्य होय तेव्हां ।**

गुणांची तृष्णा तुटेल जेव्हां । पर वैराग्य तेव्हां बोलिजे ॥५००॥
ऐसें ऐकोनि श्रीगुरुवचन । आदरे सच्छिष्य करी प्रश्न ।
श्रोते होवोनि सावधान । संवादसुख अनुभविजे ॥५०१॥ (य१४-१११)
मननावांचुनिया श्रवण । जैसें पालथीया घटीं जीवन ।
न प्रवेशतां जाय निघोन । तैसे ज्ञान वरी वरी तें ॥५०२॥
गोड बोलोनि आज्ञा न पाळितां । तो सेवक न रुचे स्वामीच्या चित्ता ।
तैसा शब्दज्ञानी न आचरितां । तो भगवंता रुचेना ॥५०३॥
कीं आचार्या दिधलें आमंत्रण । मग प्रान्ननामांचें करविलें श्रवण ।
तरी आचार्य शापील जेवी कोपोन । तैसींच गती येथ ॥५०४॥
प्रेम नाहीं अंतःकरणीं । नारायण जपे वाणी ।
तयाच्या हृदयीं चक्रपाणी । कल्पकल्पही प्रगटेना ॥५०५॥
ना तरी आपुली कांता । अंतरी करी परचिंता ।
जगांत म्हणवी पतिव्रता । तरी ते कांता नावडे ॥५०६॥
तैसे मन धावे विषयापाठीं । आणि श्रवणीं ऐके हरिचरितगोठी ।
तयाच्या हृदयीं जगजेठी । कल्पकोटी प्रगटेना ॥५०७॥
म्हणोनि तुम्हां कर जोडोनी । करितसे एवढीं विनवणी ।
क्षुत्तृट्निद्रा दूर दवडुनी । धरावें कानीं मनीं कथामृत ॥५०८॥
प्रश्न :- सच्छिष्य म्हणे श्रीगुरुराया । जैं का चित्त सोडी विषया ।
तरी गुण राहताती तया । हा निर्धार मज न कळे ॥५०९॥
विषय जड तमोगुण । विषयभोग तो रजोगुण ।
आनुश्रविक भोग सत्त्वगुण । तयातें मन सोडी जरी ॥५१०॥
तरी मग गुणामाजी बद्ध । ऐसें होऊं न शके सिद्ध ।
आणि गुणी मन जंव नाहीं बद्ध । तव परवैराग्य कासया ॥५११॥
उत्तर :- तैं ऐक म्हणती श्रीगुरुराय । प्रधानतमोगुणकार्य विषय ।
इंद्रियें प्रधानरजःकार्य । प्रधानसत्त्वकार्य अंतःकरण ॥५१२॥
प्रधान म्हणावयाचें कारण । कीं दोन गुण ते असती गौण ।
विषयवैराग्य झालिया जाण । कार्यगुण निवर्तती ॥५१३॥
परी कारणगुणापासूनि आत्मा । सुटावया एकचि प्रमा ।



विवेकख्यातीची परवैराग्य गरिमा । पाहिजे कळली ॥५१४॥
प्रश्न :- तंव शिष्य पुसे पुढती । कारण गुण म्हणजे प्रकृति लय स्थिति ।
आनुश्रविकभोगीं प्रकृतिलयाप्रति । घालती व्यास पतंजली ॥५१५॥ (य१४-११२)
आनुश्रविक विषय सोडणें । हेंही अपरवैराग्याचें करणें ।
यास्तव कारणगुणछेदक म्हणणें । परवैराग्य अनर्थू ॥५१६॥
उत्तर :- श्रीगुरु म्हणती बरवा प्रश्न । परी प्रकृतिलयाचा अर्थ कवण ।
केवल शब्दार्थ घेतां जाण । तरी येईल निद्रापण प्रकृतिलया ॥५१७॥
*तमरहितसत्त्वीं लय । या नांव बोलिजे प्रकृति लय ।
ऐसा तव मती अर्थ होय । तरी तेही बंधन ॥५१८॥
*प्रकृतिलय जे योगी होती । ते सत्त्ववृत्तीनें सुख भोगिती ।
मी भोक्ता ऐसी वृत्ती । सूक्ष्मस्थितीं राही तेथ ॥५१९॥
भोक्तृवासना गेलियाविण । आत्मा न होय प्रकृतिभिन्न ।
आत्मा न सुटतां मायेपासून । तरी न चुके बंधन कांहीं केल्या ॥५२०॥
आत्मा सुटावया मायेपासून । केवळ विषयनिवृत्तिचि नाहीं साधन ।
सर्व जगाचे जे प्रकृति कारण । तिचेही गुण निवर्तावे ॥५२१॥
तेथ सत्ताज्ञानें कारणतम नाशे । चैतन्यज्ञानें कारणरज न दिसे ।
कारणसत्त्व कदा न उल्लसे । आनंद ब्रह्मज्ञानें की ॥५२२॥
फलमय त्यागिल्या कारणगुण । वृत्तिव्याप्ति सत्त्व राहे म्हणून ।
तेही करावया क्षीण । भगवद्भक्ति समर्थ ॥५२३॥
ज्ञानमय आपुलें स्वरूप निर्गुण । ते साक्षिरूपें न घे सत्त्वगुण ।
अनध्यस्तविवर्त परमात्मा सगुण । .................॥५२४॥
ऐसी दोन्ही संधींत सांपडे वृत्ति । तेथ जडे ऐक्यसमाधिस्थिति ।
या नांव परवैराग्य पराशांती । परमपद म्हणती विष्णूचें या ॥५२५॥
पावावया प्रेमें सगुण । ब्रह्मस्थानीं प्रस्थान ।
ऐसें जें सज्ञनवचन । तेचि प्रमाण अस्मन्मतीं ॥५२६॥

॥ श्लोक २० ॥

रजस्तमोभ्यामाक्षिप्तं विमूढं मन आत्मनः ।
यच्छेद्धारणया धीरो हन्ति या तत्कृतं मलम् ॥२०॥

(भाग.२-१)

**शुक म्हणे गा परिक्षीति । जेविलेचि जेवावे पुढती ।**
**कीं कडेवर घेतलियाही बाळकाप्रति । घेई म्हणे बाळ मातें ॥५२७॥**
(य१४-११३) **तैसें ऐकिलेचि निरूपण । ऐकावें दृढ व्हाया कारण ।**
**नाना उपपत्ती करून । समाधान वाढविजे ॥५२८॥**
**राय शत्रूचा देश जिंकिती । मग जिंकिलिया देशा संरक्षती ।**
**कीं नित्य राहावा आपुलिया हातीं । ऐसीच करितीं व्यवस्था ॥५२९॥**
**तैसें ऐकिले निरूपण । तेथचि गुंतावे अखंड मन ।**
**यालागीं नाना उपपत्तीकरून । करावें श्रवण पुनः पुनः ॥५३०॥**
**"आवृत्तिरसकृदुपदेशादिति" । शारीरक मीमांसाध्याय चतुर्थी ।**
**प्रथम पादीं सूत्रवृत्ति कृती । श्री बादरायणें ॥५३१॥**

॥ चूर्णिका ॥

**तयाचा ऐसा अर्थ । कीं एकवार श्रवण केलिया ज्ञान होत ।**
**तेथ वारंवार श्रवण करणें लागत । पूर्वपक्षी म्हणे एक श्रवणेंचि ज्ञान होत ।**
**म्हणोनि वारंवार श्रवण करावें । हा सिद्धान्त सांगती आचार्य ॥**

॥ ओव्या ॥

**छांदोग्य उपनिषदीं ऐसी कथा । कीं श्वेतकेतूस उद्दालक उपदेशिता ।**
**"तत्त्वमसि" हें वाक्य तत्त्वतां । नव वेळ उपदेशिलें ॥५३२॥**
**वैदिक महर्षिकारण । नव वेळ करावें लागलें महावाक्य श्रवण ।**
**तेथ इतर जीवांची वार्ता कवण । म्हणोनि करावें आवर्तन श्रवणाचें ॥५३३॥**
**असकृत म्हणजे वेळीं अनेक । वाक्य उपदेशी उद्दालक ।**
**म्हणोनि आवृत्ति करावी देख । श्रवणाची हा सूत्रार्थ ॥५३४॥**
**यालागीं दूसरी उपपत्ति । घेवोनि तुज सांगू भक्ति ।**
**ऐसे बोलिता शुक कृपामूर्ति । झाला परिक्षिति श्रोत्रमय ॥५३५॥**
**शुक म्हणे गा मार्तण्डबुद्धि । जो आम्ही सांगितला समाधि ।**



**त्यांत अनादि उपाधि संस्कारप्रमादी । विघ्न करी अद्दढा ॥५३६॥**
**जैसे उचलूनि घेतां आपुली जननी । परी बैसतां नये जंव बाळकालागुनी ।**
(य१४-११४) **तंव क्षणक्षणा पाय जाती सुटोनी । कडियें वरोनि निश्चयें ॥५३७॥**
**तैसें इया बाळकाचित्ता । उचलोनियां सद्‌गुरुमाता ।**
**ब्रह्मकडियें बैसवितां । तरी ये व्युत्थानवत्ता अप्रत्वें ॥५३८॥**

॥चूर्णिका ॥

**अप्र मना स्पर्शिता कारणतमोगुण । तै निद्रा येतसे दारुण ।**
**यासचि बोलती लयविघ्न । अप्र मना स्पर्शे कारणरजोगुण ।**
**ते विक्षेप नामक उठे विघ्न । अप्र मना जैं स्पर्शे मिश्रकारणगुण ।**
**तैं उगेचि उठे कषायविघ्न । अप्र मना जैं स्पर्शे कारणशुद्धसत्त्वगुण ।**
**तै रसास्वाद विघ्न उठे ॥४॥**

॥ ओव्या ॥

**लय बोलिजे निद्रा तत्त्वतां । विक्षेप बोलिजे चांचल्य वृथा ।**
**कषाय बोलिजे वृत्तिस्तब्धता । ज्ञानाहंकार रसास्वादू ॥५३९॥**
**लयविघ्न येता क्षणीं । मन योजिजे बोधस्थानीं ।**
**जैसे बाळका थापटोनी । उठवी जननी मृदुलकरें ॥५४०॥**
**तैंसे लाडवूनि संबोधुनी । मन योजावें ज्ञानधारणीं ।**
**येणें लय विघ्नाची कहाणी । पुढती कानीं नायको ॥५४१॥**
**अतिशय खेळणीं बाळक गुंतता । तैं स्तन मुखीं घालुनि जवळी घे माता ।**
**तैसा विक्षेप होता चित्ता । तैं ब्रह्मानंद दुग्धें वारिजे तो ॥५४२॥**
**अतिशय खेळणीं बाळक गुंतता । तैं स्तन मुखीं घालुनि जवळी घे माता ।**
**तैसा विक्षेप होता चित्ता । तैं ब्रह्मानंद-दुग्धें वारिजे तो ॥५४२॥**
**न निजतां न खेळतां । बाळ उगेचि समीप बैसतां ।**
**बाहेर निघोनी न जावे तत्वतां । म्हणोनि पाहे माता त्याकडे ॥५४३॥**
**तेवी लय विक्षेप सांडोन । जैं स्तब्धचि राहे अंतःकरण ।**
**तेव्हां तयाचे साक्षी होऊन । कषाय विघ्न वारावें ॥५४४॥**
**परी मियां मिळविलें सकळ । मी तृप्त जाहलों केवळ ।**
**मी निर्विघ्न अति निर्मळ । या नांव बोलती रसास्वादु ॥५४५॥**

हा रसास्वादही मायावृत्ति । या विघ्नाची व्हावया निवृत्ति । (य१४-११५)
मुख्य उपाय भगवद्भक्ति । आणिका शक्ति असेना ॥५४६॥
जैसी कन्या जाहली पतिगृहस्वामिनी । तेणें मानें पतीस न मानी ।
तरी तीज म्हणती जारिणी । जे निर्वाणी नीतिमंत ॥५४७॥
स्वामिनी होवोनि पतिचरण । जी का धरील आवडी करून ।
तरी ऐसे वांछी ग्रंथकर्तृमन । कीं जावें मरून उदरीं तियेचें ॥५४८॥
तेवी ज्ञानें निरंकुशा तृप्ती । पाउनीया यथारीती ।
अहंता धरितां मायावृत्ति । सर्वथाही सोडीना ॥५४९॥
ती अहंता करावया क्षीण । पती मानोन नारायण ।
माधुर्यभक्तीचें विंदान । पतिव्रता होउनी भोगिजे ॥५५०॥
मन जीव पत्नी, श्रीकृष्ण पती । मिळालिया समाधिसुरतीं ।
दोघांच्या एकीं भक्तिरती । सुखवीर्य स्थिती बाळ ब्रह्ममय विश्व ॥५५१॥
एवढा भक्तियोगू उत्तम । सांपडे समाधि संभ्रम ।
जैं विश्वासामाजी सद्गुरु निगम । नितांत येती ॥५५२॥

॥ श्लोक २१ ॥

यस्यां संधार्यमाणायाम् योगिनो भक्तिलक्षणः ।
आशु संपद्यते योग आश्रयं भद्रमीक्षतः ॥२१॥

(भा. २-१)

**पद**

(मानसमरालवृत्त - राग - भूप - ता. झंपा)

यापरी कृष्णपादाम्बुजीं प्रेम वाढे तदा सांपडे योग सरळ ।
उन्मनी बह्मसौख्यांत व्युत्थानही दोन्ही गोविंद हे पाही विरळ ।
यास्तव त्यजुनियां नरपते आळसा आवडीनें धरी धारणातें ।
ज्ञानदेव प्रभू करुणा ऐकुनि करिल भवविभवभयवारणातें ॥१॥

॥ ओव्या ॥

एवं भक्तियोगप्रशंसा । कळतां सोमवंशावतंसा ।
तत्काळ करानी कामारिहिंसा । शुकपरमहंसा विनवीतु ॥५५३॥
(य१४-११६)



जय जय आचार्य अगम्य । जय जय आचार्य निगमगम्य ।
जय जय आचार्य प्रेमरम्य । तुझें अनुपम्य कृपाबळ ॥५५४॥
जय जय जननी सद्गुरुआई । दृष्टांत तुळितां तुझिये पायीं ।
विचार करीतां शिव शेषशायी । तरी त्या सोई सांपडेना ॥५५५॥
दृष्टांतीं तुळावा परिस । तरी तो कनक करी लोहास ।
तुझें पायीं झगटतां विगतभोगास । तरी आपणा ऐसें करिसी तूं ॥५५६॥
तुझिया नामगुणसुधेपुढें । सुरसुधा तक्र-मैत्री जोडे ।
ज्यालागीं युगीं युगीं तापसी वेडे । ते तूं रोकडे देसी हातीं ॥५५७॥
तुलने तुळावा विधाता । तो सांपडला कर्मपथा ।
तुझें पायीं नमन करितां । नैष्कर्म्यता विश्वभरी ॥५५८॥
तुलने तुळावा धुर्जटी । तोही लागला भिल्लीणीपाठीं ।
माया भिल्लिणी कवटाळी मोठी । ते तव पाय दिठीं पाहतां पळे ॥५५९।
तुलने तुळावा रमारमण । तरी तयाचें पाक्षिक मन ।
देवाचें करोनि रक्षण । दैत्या मारूं धांवतो ॥५६०॥
तुझी पाउलें जेथ वसतीं । मग देव दैत्य वा हीन याती ।
विधि हरिहरा वंद्य होती । नाहीं निश्चिती संशयो ॥५६१॥
तुझेनि वाक्ये लक्ष्मीपति । सांपडे निष्कंचना हातीं ।
म्हणोनि श्रीगुरुचरणीं पराभक्ति । असो ही ख्याति श्रुति सांगे ॥५६२॥
माये तुझे पाहतां चरण । माझे निमालें जन्ममरण ।
तरी तुवां सांगितलें धारण । ते न करितां होईल अवज्ञा ॥५६३॥
धारणा सांगितली आतां । आम्ही तिकडे दुर्लक्ष करितां ।
तरी अवज्ञा-पाप बैसेल माथां । म्हणोनि वाटे अभ्यासिजे ॥५६४॥
बाळा दूध देवोनि पोशी माता । म्हणोनि काय बाळें मारिजे लाथा ।
तैसी तुमच्या दर्शनें कृतार्थता । झाली म्हणूनि काय आतां अवज्ञा करूं ॥५६५॥
यालागीं जेणें आपुली आज्ञा । घडेल मज हातोनि सर्वज्ञा ।
ऐसी माझी शिशु-प्रतिज्ञा । न्यावी प्राज्ञा शेवटा ॥५६६॥
नवल शुकाचें शुकपण । सांडोनि ब्रह्मतनुभ्रमण । परिक्षितिप्रेमपंजरीं अडकोन ।
वेदान्त बोलून रिझवीं राया ॥५६७॥ (य१४-११७)

तो तरी सर्वात्मा सर्वसाक्षी । जाहला प्रेमळारत्तव शुकपक्षी ।
ज्ञान वैराग्य पक्षें रक्षी । शापसंकटीं नृपनाथा ॥५६८॥
जयाचें अज्ञान जाहलें क्षीण । त्यासी ज्ञानवैराग्याचें काज कवण ।
तें ठेवावयाचें हेंचि कारण । कीं पक्षीपण सार्थ व्हावे ॥५६९॥
ऋषीशापाचीं अर्गळा । झणि लागेल माझिया बाळा ।
म्हणोनि तया पक्षतळा । घालोनि न्यावें ब्रह्मसदनीं ॥५७०॥
मुहूर्तमात्रही कोठे क्षितीं । स्थीर न राहणे जयाप्रति ।
तो पाहोनि परीक्षिताची आर्ती । प्रेमसंपत्ती तिष्ठतू ॥५७१॥
सच्छिष्य सांपडतां सप्रेम । सद्‌गुरु सोडिती आपुला नियम ।
ऐसी अहेतुक करुणा परम । देखोनि निगम नवल करी ॥५७२॥

॥ श्लोक २२ ॥

राजोवाच -

यथा संधार्यते ब्रह्मन् धारणा यत्र संमता ।
यादृशी वा हरेदाशु पुरुषस्य मनोमलम् ॥
(भा. २-१-२२)

तो ऐकूनि सच्छिष्यप्रश्न । म्हणे वत्सा देई अवधान ।
सुखें जिंकोनि एखादें आसन । प्राणायामें पवन जिंकावा ॥५७३॥
जरी न होय आसनसिद्धि । तरी त्रासवितील देहव्याधि ।
न जिंकितां प्राण सस्पंदी । तरी चांचल्य कधीं सुटेना ॥५७४॥
जैसे विष मारक होय । परी हळु हळु करितां संवय ।
अमृताचेनि पाडे स्वयें । तेंचि होय गुणप्रद ॥५७५॥
अभ्यासें विष कीं आहारी पडे । समुद्रीं पायवाट जोडे ।
लोखंडादि धातू रोकडे । जिरती भक्षिता अभ्यासें ॥५७६॥

मरणाचा अभ्यास

असो हे अभ्यास बहुत । परी एका अभ्यासीं लावावें चित्त ।
जैसे विष शनैः शनैः सहन होत । तैसे मरण सहन करावें ॥५७७॥
हळुहळु जितचि राहोन । आपुलिये आंगी अनुभवावें मरण ।
तयाचा क्रम तो कवण । तेचि निर्वाणी ऐक पां ॥५७८॥



श्वासोच्छ्‌वासाचें स्तंभन । याचें नांव दृश्यमरण ।
ते शनैःशनैः अभ्यासितां जाण । येतसे मरण हातातळीं ॥५७९॥ (य१४-११८)
दृश्यमरण श्वासबंधन । अदृश्य मरण मूर्छा दारुण ।
कीं देहही अग्नींत टाकितां जाळोन । ज्या मूर्छेतुनी मन निघेना ॥५८०॥
तो श्वास जिंकावा प्राणसंयमनें । मूर्छा जिंकावी सावध मनें ।
ऐसें मरण जिंकिलीया क्षणें । मग चिंतावें मनें गोविंदा ॥५८१॥
विष जे हळु हळु सहन करिती । त्या विष भक्षोनि न होय विस्मृती ।
तैसे जिता जे मरण हातीं आणिती । तत् भगवद्विस्मृती मृत्यु न करी ॥५८२॥
प्रत्यक्षही येतां मरण । मन धरी श्रीकृष्णचरण ।
यालागीं करावया धारण । आधीं प्राणसंयमन कीजे ॥५८३॥

जन्मग्रहण : स्वेच्छेने

स्वप्न जय

आतां जैसे सहन केलें मरण । तैसें हातां आणावें जन्मग्रहण ।
तेही रीती श्रोतेजन । सदृष्टान्त ऐकिजे ॥५८४॥
ज्या ज्या पदार्थी आपली सक्ती । तैसेचि स्वप्न दिसे राती ।
ज्याची सर्वदा चंचल वृत्ति । त्यासि स्वप्नें दिसती नाना ॥५८५॥
ज्याचे एकाचि ठायीं मन । तो तेचि देखे सर्वदा स्वप्न ।
परी अभ्यासाकरिता जाण । स्वप्नही पूर्ण जिंकावे ॥५८६॥

वासना जय

तैसी नाना ठायीं आसक्ती । यालागीं नाना जन्म होती ।
ती वासना जिंकिलिया निश्चिती । जन्मस्थिती न सांपडे ॥५८७॥
वासना जिंकावयाकारण । न लाडवावा इंद्रियगण ।
एवं जितासन जितप्राण । जितःसंग जितेंद्रिय ॥५८८॥
प्राणायामें जिंकिजे मरण । पुनर्जन्म जिंकिजे वासना मोडून ।
माया जिंकावी ज्ञानेंकरून । भक्तीनें अभिमान जिंकावा ॥५८९॥
तें लाधावया भगवद्भक्ति । उपरी बोलिली धारणास्थिती ।
परी जंव सूक्ष्मीं प्रवेश नोहे मनाप्रति । तव स्थूल भगवंतीं लावावे ॥५९०॥
विद्याशाळेंत गेलिया पोर । आधीं काढी स्थूलाक्षर ।

पुढे लिहीतां लिहीतां साचार । सूक्ष्माक्षर वळी करीं ॥५९१॥
आधीं स्थूळीं लावावे मन । मग सूक्ष्मीं करावे धारण । (य१४-११९)
अभिप्राय कीं कर्म सांडून । म्हणती मन रोधू ते मूर्ख ॥५९२॥
स्थूल शरीर जिंकिले नाही । तो मनासी मुरडविल कायीं ।
ऐसेचि बोले लवलाही । तुकाराम संतमुकुटमणी ॥५९३॥

॥ अभंग ॥

हागतां ही खोडी । चळन मोडविते काडी ॥१॥
ऐसें अनावर गुण । आवरावे काय म्हूण ॥२॥
नाहीं जरी संग । तरी बडबडविती अंग ॥३॥
तुका म्हणे देवा । तुमचि न घडेचि सेवा ॥४॥

॥ ओव्या ॥

यालागीं स्थूल भगवंतीं आधी । करी एकाग्र मनोबुद्धि ।
तंव बोलता झाला चातुर्यनिधी । साधनावधि सच्छिष्य ॥५९४॥
भगवन् भिन्न भिन्न वस्तूवरी मनाला । नेवोनि जरी संयम केला ।
तरी उपास्तित्याग होईल वहिला । तो तंव निषेधिला योगवार्तिकीं ॥५९५॥
तेव्हां वदती सद्‌गुरु आपण । हृदयगर्भरत्ना करी श्रवण ।
सर्वां भूतीं नारायण । तेथ उपास्तित्याग घडेना ॥५९६॥
एका गृहांतुनी दुजें गृहीं जातां । जैसा दुसरा पती करिता ।
तैसी एक देवता सोडून दुजी धरितां । उपास्तित्याग होतसे ॥५९७॥
परी एका गृहीहुनी अन्य गृहीं जातां । पृथ्वीत्याग न घडे सर्वथा ।
तैसी ईश्वरोपासना मात्र करितां । रूप त्यागिता त्याग न घडे ॥५९८॥
इतर देवांची समर्याद शक्ति । यालागी तया त्यागिलीया ते क्षोभती ।
म्हणवोनीच सांगे श्रुति । की स्वदेवता त्यागूं नये ॥५९९॥
तैसा नोहे नारायण । आब्रह्मभुवन समसमान ।
तेथ स्थूलपण आणि सूक्ष्मपण । मनःसुलभत्वा कारणची ॥६००॥
(य१४-१२०) वृंदावन पाहोनि एक । रामभक्ति सोडोनि देख ।
स्वयें जाहला श्रीकृष्णभजक । संतमालेंत ही कथा ॥६०१॥
असो हे मीमांसा करणें । पाहतां येथील प्रसंगानुगुणें ।



स्थूल सूक्ष्म रूपें धरणें । एकाचि श्रीगुरूची ॥६०२॥
याही दृष्टीं साच पाहतां । उपास्तित्याग नाहीं सर्वथा ।
आतां स्थूल भगवंतीं लावावें चित्ता । तो क्रम तत्वतां परिसावा ॥६०३॥

॥ श्लोक २४ ॥

विशेषस्तस्यदेहोऽयं स्थविष्ठश्च स्थवीयसाम् ।
यत्रेदं दृश्यते विश्वं भूतं भव्यं भवा सत् ॥२४॥

(भाग.२-१-२४)

ज्या देशी जें धान्य निपजत । त्याचीच प्रान्नें करिती समस्त ।
तैं आधीं जे ओळत असेल चित्त । तेथचि भगवंत भजावा ॥६०४॥
या चित्तासी सकलां आधीं । विश्वपरिचयप्रसिद्धी ।
म्हणोनि हे भूत पृथिव्यादि । भगवदवयव कल्पावें ॥६०५॥
सर्वभूतोपहित चेतन । हेंचि मुख्य विराटलक्षण ।
तेथ एकाग्र करावें मन । धैर्य धरून आवडी ॥६०६॥
एवं भूतांचिया ठायीं । निरखावया भुजगशायी ।
विग्रहो बोलिला लवलाही । मन एके ठायीं करावया ॥६०७॥
जया परेशा नाहीं चलन । तेथ वृथा पादादिविकल्पन ।
परी नवल जीवाचे अनुसंधान । वृथा ओळखून सांडीना ॥६०८॥
कां मक्षिका पाखडलिया परे । तंव निमिख हे आयुख सरे ।
तथापि या शरीरे । भोगती भोगा ॥६०९॥
जिया जीवांची कविताशक्ति । विरोधाभासाचिया हातीं ।
युवतीलाळीं सुधाभ्रांती । वृथा निश्चिती उपजवी ॥६१०॥
जो एक पुत्र निमाला होता । तो स्वप्नीं देखीलीया तत्वता ।
परी चित्तसंस्कार तत्वता । विसरोनी जाती ॥६११॥
बहु दिवसाचे निमालेपण । जागृतीं सांठवित होते मन ।
ते क्षणांतची गेले विसरोन । स्वप्नीं नंदन देखिल्या ॥६१२॥ (य१४-१२१)
बहुदिसांचा संस्कारू । अभिभवी अल्प व्यवहारू ।
एवं जीवाचा प्रचारू । असत्य सत्या अभिभवी ॥६१३॥
याचें एकचि कारण । सुखहेतु वाटतो नंदन ।

दुःखहेतु तयाचें मरण । तें अंतःकरण सोडूं इच्छी ॥६१४॥
म्हणोनी सुखसमागम अल्प होता । चिरसंस्कार नावडे चित्ता ।
एवं सुखाच्या वासना वृथा । जीव विसरती निजभूमीं ॥६१५॥
कां पुत्र न होय जयाचे पोटीं । तो श्वानची पाळी ममतेसाठीं ।
तेणें लोभे लोभिया पोटीं । चावळी गोष्टी श्वानासह ॥६१६॥
एवं जीवाचीया चेष्टा । आघवियाचि गा अव्हाटा ।
तेथ मार्गाचि एक चोखटा । हा आग्रहो कां ॥६१७॥
कां जो स्वप्नरोगेंकरून । ओसणें पिडीलो म्हणून ।
तेथ एक वैद्य येऊन । स्वप्नीं औषध दिधले ॥६१८॥
तरी तया वैद्यावरी । ऐसा आरोप कवण करी ।
कीं या रोगिया स्वप्नामाझारीं । जागृदौषध कां न दिले ॥६१९॥
तेवि जीवांची वृथा प्रवृत्ति । मोडावया वृथा उपाय सांगे श्रुति ।
कां बिंदुस्थानीं एक कल्पिती । घेती गणिती वेध बहु ॥६२०॥
तैसा मूढांचिया मनीं । ईश्वर वाटतसे प्राणी ।
जैसे रक्षिती जनक जननी । तैसा संकटीं रक्षिल तो ॥६२१॥
तयांची व्यक्तिकल्पना न निषेधिता । आणि दाखविणें लागे व्यापकता ।
यालागीं अवघिया भूतां । कल्पिजे हरिव्यक्ती अवयवी ॥६२२॥
सन्निकर्षही मुख्य असोन । कवि स्त्रीमुखा भाविती चंद्र आपण ।
मग अत्यंत सन्निकर्ष भगवान । तदंगभूत भाविता कवण दोषू ॥६२३॥
अथवा दुसरेही रहस्य एक । केलिया आत्मयाचा व्यतिरेक ।
देह वेगळा पडेल देख । पृथक् सत्य होऊनी ॥६२४॥
चेतनावांचोनि पृथक् सत्ता । मानणें मुख्य मूळ द्वैता ।
आणि देह आत्मा एक मानिता । चार्वाक मतासम होय ॥६२५॥
म्हणोनि येथ एकचि युक्ति । भूता भाविजे भगवत् व्यक्ति ।
मग आपुलाहि देह निश्चिती । त्याचि भूतीं अंतर्भूत ॥६२६॥ (य१४-१२२)
मग जीवव्यतिरेक केला होय । परंतु भूतीं ईश्वरान्वय ।
तेथ आपुलाहि देह चिन्मय । आत्मा अनात्मा अभिन्न ॥६२७॥
अभेद असुनी अविवेक नाहीं । बंध मुक्तिरूप फळला पाही ।



ऐसे जें गूढपण कांहीं । ते लवलाही उपारत्ती करी ॥६२८॥
आपुला विवाह पुढें होईल जैसा । पुतळीविवाह बालिका खेळती तैसा ।
तेविं पुढील ऐक्याचा ओळखुनि ठसा । जगीं जगन्निवासा भावणें ॥६२९॥
मज एक असावा लागतो पति । हा परिचयचि नाहीं जिच्या चित्तीं ।
तियेस श्वशुरगृहशिक्षारीति । कवणिये पद्धति आधी द्यावी ॥६३०॥
तैसे भूत आणि भगवंत । एक हे कल्पूचि न शके जयाचे चित्त ।
तयासि बोधावया अद्वैत । कवण उपाय आधीं कीजे ॥६३१॥
याचिलागी श्रुति माय । भावना करावया सांगत सोय ।
कीं विश्वीं पहावा यादवराय । पादादि अवयव चिंतुनि ॥६३२॥
जे जे देखसी डोळिया भूत । तेथ वाटावा आदर बहूत ।
भूतीं भगवद्बुद्ध्या आदर उपजत । तंव तंव स्वार्थ हारपे ॥६३३॥
माझ्या औट हात देहासाठीं । आघवी निर्माण जाहली सृष्टी ।
याचि एका वृत्तीच्या पोटीं । असती कोटी असत्य ॥६३४॥
स्त्री म्हणे मजसाठीं पति । पति म्हणे मजसाठीं युवति ।
आम्हास्तव पिता पुत्र म्हणती । स्वार्थार्थ गणती मायबाप पुत्रा ॥६३५॥
एक पट चौघाचिया हातीं । ते चौघेहि आपणाकडे ओढिती ।
तया पटाची जैसी स्थिती । तैसीच रीति जीवप्रेमा ॥६३६॥
प्रेमवस्त्र विश्वीं एक । तया स्वार्थी ओढिती पृथक ।
यास्तव ठायीं ठायीं फाटोनि देख । कलह-कलंकयुक्त झाले ॥६३७॥
मुख्य कलहाचे कारण । विश्व मजसाठीं मी त्याहोन भिन्न ।
हा विवेकची परी करी बंधन । ज्ञानचि अज्ञान बोलिजे हे ॥६३८॥
यालागीं ऐसे भाविजे चित्तीं । ज्यानें रक्षिली गर्भी माझी व्यक्ती । (य१४-१२३)
तोचि रक्षिता विश्वाप्रति । त्यासी मी प्रतिकूल कां व्हावे ॥६३९॥
जो एकचि रक्षिता अवघियाप्रति । मजही त्यावांचोनि नाही गती ।
तरी तयाच्या रक्ष्य पदार्थी । विरोध कां मी करावा ॥६४०॥
का आपुलिया देहीं दोन्ही कर । भांडो लागती परस्पर ।
एक दुःखावलिया साचार । हानि होय दोघांची ॥६४१॥
तैसी अवयव भूते भगवंतीं । तेथ प्रतिकूल होतां मी एक व्यक्ति ।

तरी प्रेम हारपोनिया चित्तीं । कलहाभिमानें उठतील ॥६४२॥
कलहाभिमानें स्वार्थसिद्धि । स्वार्थ बळकावे देहबुद्धि ।
जी सर्व विकारांचा निधी । दुःख निरवधी जिचेनी ॥६४३॥
यालागी स्वार्थ करावया क्षीण । विश्वा अनुकूल होवावे आपण ।
तेथ अनुकूल होतांचि जाण । झणी येईल जडपण बुद्धीतें ॥५४४॥
दगडासारखा देह करितां । तरी बुद्धीसही येईल दगडता ।
यालागी पाषाणांतचि तत्वता । आधी भावावे चेतन ॥६४५॥
पाषाणीं देखिता परमेश्वर । मग त्या पाषाणाऐसे झालिया शरीर ।
तरी आपणही स्वयें निर्धार । पाषाणांतर्गत ईश्वर सम होऊ ॥६४६॥
एवं ऐक्य साधावया । आधी आश्रयिजे याचि उपाया ।
जनीं जनार्दनाचिया पायां । सर्वत्र पहावें ॥६४७॥
दुसऱ्यांच्या गृहीं जन्मली । आपुलिया अंकीं बैसली ।
ती कामिनी जैसी आपुली । संसारासाठीं मानी जीव ॥६४८॥
तैसी भिन्न भूतें आपणाहुनि । परी परमार्थाचिया स्थानीं ।
आपण व्हावया निरभिमानी । आपुलेपणी ओळखिजे ॥६४९॥
एवं भूतीं भाविता भगवंत । आपणा जीव म्हणावया कोण शक्त ।
कां सान नदी सागरी मिळत । तीतें कवण न म्हणे समुद्र ॥६५०॥
म्हणोनि येथ रूपक नाहीं । हा सन्निवेश मूळीं बोलिला पाही ।
अर्थ की सान जो श्रीकृष्ण हृदयीं । तो तीव्र कीजे विश्वभरी ॥६५१॥
(य१४-१२४) यालागी उपाय अनेक करून । या भगवत्स्थूल रूपीं ठेविजे
मन । याचे आणखीहि कारण । असे एक ॥६५२॥
सर्व स्थूल भूतें नारायण । ऐसे जन्मवरी भाविता जाण ।
मरणसमयीं जरी गेला विसरोन । तरी जाईल मिळोन भगवंती ॥६५३॥
भूत भगवंतावांचोनि कहीं । जयानें जन्मभर भाविलें नाहीं ।
तया न्यावया मरणसमयीं । कोण येईल हरिवांचुनि ॥६५४॥
अहो जनासी जनक-जननी-नातें । लावोनियां तोंडापुरतें ।
भिकारी पोट महीवरुते । भरिताती अल्प श्रमें ॥६५५॥
मग हरीच भाविलिया सकळाप्रति । ते अनूकुल न होतील कवणे रीति ।





एक वेळ ऐसेंही वाटेल यमदूती । यासी न कळतां न्यावे वैकुंठीं ॥६५६॥
यालागी विराडुपासन । जोवरी वृथा देहाभिमान ।
तोवरी वृथा वृथा म्हणोन । कदा सांडोन देवो नये ॥६५७॥
स्वप्नीं स्वप्नव्याघ्रासी झुंजतां । तरी न चुके स्वप्नमरणता ।
तैसे वृथा असोनी दुसरीया वृथा म्हणतां । बंधन सर्वथा चुकेना ॥६५८॥
एवं विराडुपासन । केलिया जाय स्थूलाभिमान ।
आतां देही निरभिमानपण । ओळखोनि खूण उपेक्षावे ॥६५९॥
मोठेपणीं भय उन्मादाचें । दीनपणी भय निराशेचे ।
यालागीं दोन्ही सांडोनि साचे । स्वानंदाचे स्थान व्हावे ॥६६०॥
तेचि व्हावयाकारण । भगवान् बादरायणनंदन ।
पुढील श्लोकेंकरून । गोड निरूपण सांगती ॥६६१॥
आपण भूते आणि ईश्वर । अथवा विराट जीव सर्वेश्वर ।
याचा अभेदप्रकार । उपासावया सांगितला ॥६६२॥
परी उपासना भावनाधीन । भावना मोडता होय व्युत्थान ।
यालागी अभेदाचे ज्ञान । करोनी घेतले पाहिजे ॥६६३॥
ज्ञान वस्तुतंत्र एक । ते कळावया देख ।
दृष्टान्त सांगितला साधक । प्रमाण प्रमेय सद्भावें ॥६६४॥
(य१४-१२५)
प्रमाणजन्य ते वस्तुतंत्र । भावना-जन्य ते कर्तृतंत्र ।
उपासना ते कर्तृतंत्र । वस्तुतंत्र विज्ञान ॥६६५॥
यालागी स्वप्नदृष्टान्तेकरून । करोनी घ्यावे भगवदैक्यज्ञान ।
मग करावे भगवद्भजन । हाचि क्रम उत्कृष्ट ॥६६६॥
आधी अभेद उपासन । ते मागील श्लोकीं निरूपण ।
अनंतर होय अभेदज्ञान । ते या श्लोकपूर्वार्धी ॥६६७॥
या श्लोकीच्या उत्तरार्धी । भजेत इत्यादि पदीं ।
ज्ञानानंतर भक्तिसिद्धि । केली हे बुद्धी आणिजे श्रोतीं ॥६६८॥
जगाकडे पाहतां लवलाही । स्वप्नांत त्यांत भेद नाही ।
स्वप्ननिर्माता मीच पाही । म्हणुनि जगनिर्माताहि मीच ॥६६९॥

महाराजांचे आव्हान

**वाद करावया कारण । मी नास्तिका आस्तिका करी आव्हान ।**
**माझा सिद्धान्त 'जगत् स्वप्न' । पूर्णप्रमाण येविषयीं ॥६७०॥**
**दृढ-संस्कारें दृढ-स्मृति ।**
**स्वप्नांत नाठवे जागृती । जागृतींत राहे स्वप्नस्मृति ।**
**यालागी स्वप्न दृढ मी म्हणे ॥६७१॥**
**अहो, स्वप्न दिसती नित्य नवीन । जागृतींत तेचि पदार्थदर्शन ।**
**जागृतींत पावलिया मरण । स्वप्नीं देखता तोचि भासे ॥६७२॥**
**आपुला मित्र जागृतींत मेला । तो जरी पुनः स्वप्नीं देखिला ।**
**तरी तोचि मित्र या भ्रांतीला । न सोडी मन ॥६७३॥**
**चिरकाळीचे मरणज्ञान । असोनि भ्रांती न सोडी मन ।**
**तेवि जागृतीहि नित्य नवीन । परी सुखहेतु मानोन, मन न सोडी ॥५७४॥**
**स्वप्नें दिसतील किती किती । याचा निश्चय नाहीं चित्तीं ।**
**तरी जागृतींतही गोष्टी किती । घडतील हा निश्चय नसे ॥६७५॥**
**स्वप्नीं स्तंभापासोन । होऊं शकेल रेडा उत्पन्न ।**
**तरी जागृतींतही जाण । नियम अझून कांहीं नसे ॥६७६॥**
**जड शास्त्राचिया उपपत्ती । विद्युत्स्पंदनाचिया हाती ।**
**भलते पदार्थ भलते पदार्थी । होऊं शकती निश्चयें ॥६७७॥**
**स्वप्नांत पदार्थ अतिनियत । जागृतींत जडशास्त्रोपपत्ति नाहीं नियत ।**
**अर्थक्रियाकारित्व म्हणाल जागृतींत । (य१४-१२६)**
**तरी स्वप्नींहि होत स्वप्नापुरतें ॥६७८॥**
**स्वप्नीं आपुले जनक जननी । आपणचि उपजवोनि ।**
**तयातें श्रेष्ठ समजोनी । आपण होतो अतिसान ॥६७९॥**
**तेवि आपणचि जागृती । उपजवोनियां निश्चिती ।**
**कार्यकारणता आपुली भ्रांती । जडाप्रति दिधली ॥६८०॥**

॥ दोहा ॥

**ननु यह भव अति भीतिप्रद जहनित आवन गौण ।**
**नाथ देहू उत्तर तदीय जननविधौ क्रम कौन ॥६॥**



॥चौपाई ॥

**क्रमबिनु यह भव उपजै खासा । इति विधि भाख्यौ निश्चलदासा ।**
**श्रुतिविचार जब नयनन देख्यौ । तब जहतह क्रम भव करी लेख्यौ ॥१॥**
**जामह मानहूं कौन विधाना । पूछत हूं कहूं कृपानिधाना ॥२॥**
**जहलौ गुरुपद शिस न नमावै । पढि पढि निगम, शक नहि जावै ॥३॥**

॥ दोहा ॥

**सुनि शिसबानी मुदितमति भै गुरु दयानिधान ।**
**बालकभूक न जानत बिनुजननि कौ आन ॥१॥**
**तात बडे तुम भागी हो कीयो प्रश्न अति नीको ।**
**उत्तर सुनतहि मिटे सब भवबंधन अति जीको ॥२॥**

गद्य :- वत्सा, **स्वामी निश्चलदास** लौकिक अध्ययनविद्येंत आचार्यांच्या बरोबरीला येऊं पाहतात असे म्हणण्याला आम्हाला विशेष प्रत्यवाय वाटत नाहीं, स्वतः ते ब्राह्मणेतर जातीचे असून ज्या पंथात ते आहेत त्याचे उपपादक पिंजारी असल्यामुळे ब्राह्मणावांचून वेदाधिकार इतरांना नाहीं. म्हणून अधिकारानुसार श्रुत्युक्त नियत वर्णाश्रम-निर्बंधक भगवत्पूज्यपादाचार्यांविषयीं स्वामी निश्चलदासांना जसा पाहिजे तसा आदर वाटत नसावा हे उघड आहे, **(य१४-१२७)** तथापि स्वामींनीं काढलेला सिद्धान्त बरोबरच असतां तर तो अनादर विशेष अनाठायीं झाला नसता.

स्वामी निश्चलदास आपल्या विचारसागराच्या पांचव्या तरंगात म्हणतात, 'जरी शारीरकशांकरभाष्यंत सर्वोत्पत्तिश्रुतीचें तात्पर्य तैत्तिरय श्रुतींत आचार्यांनीं सांगितले आहे, तरी ते मंदबुद्धी लोकांकरितां समजावे. माझा ग्रंथ हा उत्तम जिज्ञासुकरितां असल्यामुळें मला उत्पत्तिश्रुतीचा समन्वय करण्याची आवश्यकता नाहीं.'

पुनः स्वामी म्हणतात, 'श्रुतींत भिन्न भिन्न प्रकारची उत्पत्ति सांगितली आहे. त्या सर्व श्रुतींचा अभिप्राय हा आहे कीं जगन्मिथ्या आहे. त्याविषयीं क्रम काय निश्चित करावा? जगत् म्हणून जर सत्य असेल तर क्रम निश्चित सांगता आला असता.'

या सर्व विवेचनांत स्वामींनीं शांकरभाष्याला अधिक प्रमाण मानलें नाहीं

आणि अजातवादही उत्तम रीतीनें सांगितला नाहीं. **शांकरभाष्यापेक्षा स्वामीच्या ग्रंथाला आम्ही अधिक प्रमाण मानीत नाहीं.** स्वामींनीं जें म्हटलें कीं, मिथ्या पदार्थांत क्रम दाखवितां येत नाहीं, जगत् सत्य असतें तर क्रम दाखविला असता. यावरून स्वामीच्या म्हणण्याचा असा अर्थ आहे कीं, सत्य पदार्थांत उत्पत्त्यादि क्रम असूं शकतो. तो क्रम जगाविषयीं सांपडत नाहीं म्हणून त्याला मिथ्या म्हणावयाचे.

स्वामी संस्कृतादि भाषेंत मजहून अत्यंत विद्वान आहेत. तथापि वरील सिद्धांत सांगतांना त्यांचे मत निव्वळ चुकीचे आहे असें मी स्पष्ट म्हणतो.

तीनही काळीं ज्याचा बाध होत नाहीं त्याला सत्य म्हणतात. असें एक ब्रह्मच आहे. सत्य पदार्थाविषयीं क्रम दाखविला असतां असे म्हणणारे स्वामी ब्रह्माविषयी काय क्रम दाखवितात? सतापासून, असतापासून कीं जगतापासून. त्यांत [(१)]पहिल्यापक्षीं एकाच ब्रह्मापासून ब्रह्माची उत्पत्ति सांगत असतील तर आत्माश्रय दोष येतो. **(य१४-१२८)** [(२)]पहिल्या ब्रह्मापासून दुसऱ्या ब्रह्माची, व दुसऱ्यांपासून पहिल्याची उत्पत्ति सांगत असल्यास अन्योन्याश्रय दोष येतो. [(३)]पहिल्यापासून दुसऱ्याची व दुसऱ्यापासून तिसऱ्याची व तिसऱ्यापासून पुनः पहिल्याची उत्पत्ति सांगतांना चक्रिकापत्ति दोष येत असून [(४)]एका ब्रह्माला दुसरें ब्रह्म कारण व दुसऱ्यास तिसरें अशी ब्रह्माची धारा मानली असतां अनवस्था दोष येतो. याप्रमाणें दुसऱ्यापक्षीं व्याहती दोष येतो आणि [(५)]ब्रह्मज्ञानाने जगाचा बाध होतो म्हणून तिसरा पक्षही संभवत नाही.

याप्रमाणे सत्याविषयीं क्रम सांगण्याची प्रतिज्ञा आमच्या बोबड्या बोलाला मान देऊन तरी स्वामीनीं परत घेतलीच पाहिजे.

आतां असत् पदार्थ प्रसिद्ध नसल्यामुळें त्याविषयीं क्रम सांगणें अशक्य आहे. जगाविषयीं तर स्वामीही क्रम सांगत नाही व आम्हीही सांगत नाही. कारण प्रथम रज्जुसर्पाचे आईबाप प्रतीत होऊन नंतर त्याचा जन्म होतो असा क्रम दृष्ट नाहीं म्हणून अध्यासांत कोणत्याही प्रकारचा क्रम नियत नाहीं. [(१)]आईबापापासून पुत्र होतो हे पौर्वापर्य प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें कार्यकारणभाव आहे असें कोणी म्हणेल तर बरोबर नाहीं, कारण मानसपुत्र व ऋष्यादिकांचे जन्म बापांवाचूनही पुराणांत प्रसिद्ध आहेत. [(२)]केवळ पौर्वापर्यप्रत्ययच



कार्यकारणभावाला हेतु म्हणशील तर अव्यवहित पौर्वापर्यप्रत्यय कार्यकारणभाव समजण्याला हेतु आहे कीं व्यवहित पौर्वापर्यप्रत्यय कार्यकारणभाव समजण्याला हेतु आहे?

()प्रथमपक्ष संभवत नाहीं. कारण कपालाचे ठिकाणीं असणारा घटप्रागभाव प्रथम नाश पावतो व नंतर घटोत्पत्ति होते म्हणून कपालघटासंबंधी पौर्वापर्य प्रागभावनाशेंकरून व्यवहित आहे, अथवा कृष्ण तंतूपासून कृष्णपट उत्पन्न होतो. परंतु प्रथमक्षणी द्रव्य निर्गुण उत्पन्न होत असते. त्यांतही कारणगुणापासून उत्पन्न होणाऱ्या कार्यगुणामध्यें क्षणिक निर्गुणत्वाचे व्यवधान आहे.**(य१४-१२९)** ()दुसरा पक्षही संभवत नाहीं. कारण व्यवहित पौर्वापर्यसबंध कार्यकारणभावहेतु मानला असतां अन्यथासिद्ध करणापासूनही कार्यसिद्धी झाली पाहिजे. ()ननु नियत पौर्वापर्यसंबंध कार्यकारणभाव ज्ञानाला हेतु आहे, असें म्हणशील तरी संभवत नाहीं, कारण नियत पौर्वापर्यसंबंधच निश्चित सांगता येत नाहीं. घट जसे मृत्तिकेपासून होतात तसे अन्य धातूपासूनहि होतात. आतां घटाकारांचा व द्रव्यांचा नियतसंबंध आहे असेहि म्हणतां येत नाहीं. कारण त्याच द्रव्याचे दुसरेही आकार होऊं शकतात. मनुष्यापासून सर्पादि प्राणी झाल्याची उदाहरणेंहि पुष्कळ आहेत, आणि कारणापासून भविष्यत् कार्य नियमानें होईल हें सांगण्याकरितां त्या नियमाला विघातक शक्ति विश्वांत नाहीं असें गृहित धरावें लागते. परंतु तसें दिसत नाहीं. कारण पुत्रार्थ केलेला पितृयत्न पुष्कळदा सफल होत नाहीं. पुढें अलंकाराकरितां आणून ठेविलेलें सुवर्ण आकस्मात चोरी जाणें शक्य आहे. त्याप्रमाणें भूतकार्यकारणभावप्रत्ययही समीचीन हेतु नाहीं. कारण अमुकाच्या प्रपितामहाचा पिता अमुक होता हें कोणाच्या तरी सांगितल्यावाचून आपणाला कळत नाहीं आणि सांगितलेलें प्रमाण मानलें कीं पुराणाचें शब्दप्रमाणही अन्यथा म्हणतां येणार नाहीं. पुराणांत तर पुष्कळांचे जन्म मायामात्र सांगितलें आहेत.

बरें, कोणी सांगितलें नाहीं तरी सामान्य कारणाचे अनुमान होतें हें म्हणणेंही सम्यक नाहीं. कारण सामान्य कारणाचें ठायीं कार्य सद्रूपानें असतें कीं असद्रूपानें असते? ()पहिला पक्ष स्वीकारणें अयोग्य आहे. कारण कार्य सद्रूपानें आहे तर ते प्रगट कां होत नाहीं? प्रतिबंधामुळें म्हणाल तर प्रतिबंधाला काय कारण आहे? कीं अकारण आहे? कीं तिसरेंच कांहीं आहे?**(य१४-१३०)**

कारण उत्पादक असल्यामुळें प्रतिबंधक म्हणणें योग्य नाहीं. अकारण कांही प्रतिबंध होऊं शकत नाही. कारण घटाला अकारण स्तंभादिक पुष्कळ आहेत. ते सर्वच प्रतिबंधक मानलें असतां घटपटादि कार्याचा प्रत्ययच होऊं नये, परंतु तो होतो.

तिसरें मानण्याविषयीं कांहीं युक्ति नाहीं. प्रतिबंधावांचून कार्य सद्रूप कारणांत राहते असें म्हटलें असतां, कार्य कारणरूपी असतांच व्यक्त झाले पाहिजे व तसें झाले म्हणजे कार्य अनादि होऊन कार्यकारणभाव मानण्याची आवश्यकता राहणार नाहीं. कार्य अनादि मानलें तर व्यक्ताव्यक्ताचा प्रत्यय येतो, या प्रश्नाला उत्तर मिळत नाहीं. एवं दुसरा पक्षही संभवत नाही. असत् कार्य जर कारणापासून उत्पन्न होत असेल तर वंध्यापुत्रादिकहि उत्पन्न व्हावेत. पण ते कोठें दिसत नाहींत.

एवं, युक्तिदृष्ट्या कार्यकारणभाव जरी संभवत नाहीं, तथापि सर्व लोकांना कार्यकारणभावाचे भान मात्र आहे. तथापि तो **कार्यकारणभाव जगांत असिद्ध आहे, हें वर युक्तीनें दाखविलें. म्हणून आपल्या चित्तांतच तो कार्यकारणभाव आहे.** ज्याप्रमाणें स्वप्नांत आपल्या बरोबरच आईबाप उत्पन्न होतात तथापि आपण त्यांना आपले कारण समजतो किंवा स्वप्नांतलीच माती घेऊन स्वप्नांत घट करतो तथापि जागृतीमध्यें त्या घटाचा व मातीचा युगपत् बाध होतो म्हणून स्वप्नांतील कारणरूप माती व कार्यरूप घट दोन्ही भ्रांतीरूपच आहेत. तद्वत् जागृदंतर्गत कार्यकारणभावसंबंधही भ्रांतीरूपच आहे.

तथापि निरधिष्ठान भ्रांति होणें संभवनीय नाहीं कारण वंध्यापुत्रावर स्वपितृभ्रांती किंवा शशशृंगावर सर्पभ्रांती अद्याप कोणाला झाली नाहीं. म्हणून या कार्यकारणभावरूपी भ्रांतीला अधिष्ठान पाहिजे व तें अधिष्ठान भ्रांतिकाळीं अज्ञात असलें पाहिजे. **(य१४-१३१)** जडावर अज्ञातत्व रहात नाही कारण अज्ञात जड आहे म्हणतांच त्याचा सत्तांश गोचर होतो.

()सत्तेहून कांही अंश जाणावयाचे राहतात असे म्हणाल तर ते अंश सत्तेहून भिन्न झाल्यामुळें असत् असले पाहिजे किंवा अनिर्वचनीय असले पाहिजेत. पहिल्या पक्षीं ते जाणण्याची आवश्यकता नाहीं व दुसऱ्यापक्षी ते सत्ताभिन्न जडांशही ज्ञातच होतील.



तात्पर्य जड पदार्थाचे ठायीं कार्यकारणभाव नसून तो भ्रांतिरूप आहे व त्या भ्रांतीचे अधिष्ठान ज्ञान सद्रूप जड नसून अज्ञात सद्रूप चेतन आहे. म्हणून ते चेतनच तटस्थ लक्षणानें जगत्कारण आहे. असा श्रुतिसूत्रभाष्यादिकांचा सिद्धान्त आहे म्हणून आमच्या मतांत बौद्धाप्रमाणें विनाकारण कार्योत्पत्तिदोषापत्ति नाहीं.

(शंका) **शिष्य म्हणे करुणामूर्ती । शंका उपजली माझिया चित्तीं ।**
**ज्ञातसत्त्व मानता स्वमतीं । दोष येती अनंत ॥६८१॥**
**पदार्थ मानितां ज्ञातसत्ताक । तरी ते होतील क्षणिक ।**
**मग ध्रुवाद्यौरित्यादि श्रुति सम्यक । होतील अवघ्या अप्रमाण ॥६८२॥**
**दृष्टिसृष्टिवादाविषयीं । आकर ग्रंथही प्रमाण नाहीं. ।**
**स्वप्नजगद्वैधर्म्य लवलाही । आचार्य सांगती सूत्रभाष्यीं ॥६८३॥**
**आणि ज्ञातसत्त्व मानावया । श्रुतिसूत्र प्रमाण नाहीं यया ।**
**आनंदी षटक् सांगितले तया । वार्तिकासी विरोधू ॥६८४॥**
**एकजीवत्वास्तव जाण । होणार नाहींत जननमरण ।**
**लोक लोकान्तर गमन । वृथा होईल निगमोक्त ॥६८५॥**
**श्रीगुरु म्हणती शिष्यराया । तूं उत्तम ऐके ही प्रक्रिया ।**
**उत्तम भूमिरूढा तया । अभिमत हाचि सिद्धान्त ॥६८६॥**

॥ गद्य ॥

बौद्धमतांत ज्याप्रमाणें क्षणिक पदार्थ मानले आहेत त्याप्रमाणें आम्हीं क्षणिक पदार्थ समजत नाहीं. आम्ही असें म्हणतो कीं, ज्या पदार्थाचे सत्त्व ज्ञात होते ते देशकालासहित होते. म्हणजे ज्ञात पदार्थाची सत्ता व त्याला सहायक देशकाल सर्व ज्ञातच असतात. **(य१४-१३२)** त्या पदार्थाचे ठिकाणीं अविद्या महिमा, कोठें स्थिरत्वप्रत्यय व कोठें चलत्वप्रत्यय येतो.

जसे स्वप्नांत पाहिलेल्या पृथ्व्यादिकांचा स्थिरत्वप्रत्यय येतो व तरंगादिकांचा चलत्वप्रत्यय असतो, तद्वत् जागृतींतही आकाशादि पदार्थांचा स्थिरप्रत्यय व इंद्रधनुष्याचा चलत्वप्रत्यय येतो.

बौद्धाच्या मतांत तर सर्व पदार्थ अत्यंत क्षणिक आहेत. परंतु क्षणिक पदार्थाचे ठिकाणीं जन्मांवाचून दुसरे व्यापार संभवत नाहींत. प्रथमक्षणीं पदार्थाचे जायते असें ज्ञान होते व द्वितीय क्षणीं अस्ति असे ज्ञान होते. पण बौद्धमताचे

ठिकाणीं द्वितीयक्षणीं पदार्थ नष्ट होत असल्यामुळें कोणत्याहीं पदार्थाचे ज्ञान होणें संभवनीय नाहीं. ध्रुवाद्यौरित्यादि श्रुति पदार्थाचे ठायीं स्थिरत्वभ्रांतीच्या अनुवादक आहेत.

यद्यपि बौद्धमत खंडन करण्याकरितां स्वप्नसृष्टीच्या अपेक्षेने जागृत्सृष्टीचे सत्यत्व सूत्रकार व भाष्यकारांनीं सांगितले आहे, तथापि मांडुक्यकारिकेंतील वैतथ्यप्रकरणाच्या भाष्यांत आचार्यांनीं जागृत्सृष्टीसही स्वप्नतुल्यता दिली आहे. आणि सिद्धान्तदर्शनाच्या पहिल्या सूत्रांत भगवान् बादरायणाचार्य असे म्हणतात कीं,

**''अथ भावौ द्वौ वाव श्रुतोपपत्यंतरीक्षेभ्यः''**

श्रुति, युक्ति आणि अनुभव या तीन प्रमाणानें दोन सत्ता गोचर होतात. याच सूत्राचें भाष्यावर निरंजन म्हणतात, त्या दोन सत्ता म्हणजे पारमार्थिक व प्रातिभासिक होत. बौद्ध मताच्या निराकरणाकरितांही स्वप्नसृष्टीपेक्षां जागृत्सृष्टी सत्य मानण्याची अपेक्षा नाहीं. प्रातिभासिक भ्रांन्ति साधिष्ठान मानली म्हणजे बौद्धमताचे निराकरण होते.

जीव, ईश्वर, जीवेश्वरांचा भेद, अविद्या, शुद्धचेतन, व तिचा चैतन्याशीं संबंध, या अनादि पदार्थाचें ठिकाणीं दृष्टिसृष्टिस्वीकार नाहीं असें स्वामी मधुसूदन अद्वैतसिद्धींत म्हणतात. आणि अनिर्वचनीय अधिक स्थिरता आहे, असे इतर म्हणतात. **(य१४-१३३)**

अचेतन कार्यकारणभावरूप संसाराची भ्रांति ज्यांच्या मनांत दृढ झाली आहे, त्यांना बोध करण्याकरितां लयचिंतन सांगून चेतनभिन्न अनात्मसत्ता नाहीं असें दाखविण्याकरितां श्रुतिमातेनें उत्पत्त्यादि क्रम *पुत्रप्रसादन्यायाने सांगितला आहे. *(टीप :- आई जशी मुलाला उगी करिते)* त्या क्रमाला कल्प कल्प नियतत्व सृष्टी नियत भासण्याऱ्या बुद्धिकरितांच आचार्यांनीं नियत सांगितला आहे.

तात्पर्य, सताची उत्पत्ति नाहीं. असताची उत्पत्तिहि नाहीं. तद्वत् जगन्मिथ्या आहे म्हणून त्याचीहि उत्पत्ति नाहीं. एवं -

**''न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो नच साधकः ।**
**न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता ॥''**

ह्या वाक्यात सांगितलेला अजातवाद सिद्ध होतो.



अजातीचे ३ प्रकार

ही अजातीही गौणमुख्यबलेंकरून तीन प्रकारची आहे.

**१. अध्यस्तविवर्तरूपा,**

**२. अनध्यस्तविवर्तरूपा** आणि

**३. अखण्डैकरसरूपा.**

त्यांतून प्रथमा जगाविषयीं,
द्वितीया भगवत्तनूविषयीं व
तृतीया ब्रह्माविषयीं समजावी.

पहिलीचा प्रत्यय गौण असून शेष दोहींचा प्रत्यय मुख्य आहे.

त्यांत अध्यस्तविवर्त स्वप्नरूप आहे तो पुनः एकवार सांगून भक्त्याश्रय अनध्यस्तविवर्तरूपही सांगते. श्रवण कर -

जागृति व स्वप्न यांची तुलना

**इतुकेंही करून । ऐसे म्हणाल आग्रहान ।**
**कीं जागृतीचे संस्कार स्वप्न । तरी स्वप्नसंस्कार जागृती मी म्हणे ॥६८७॥**
**जागृतींतचि असोन । स्वप्नांत जागृती न स्मरोन ।**
**जागृतीसंस्कार म्हणणें स्वप्न । हेतुविण बोलणें ॥६८८॥**
**परी स्वप्नाची जागृतींत स्मृती । आणि जागृतींत असोनि निश्चिती ।**
**स्वप्न संस्कार मी म्हणे जागृती । म्हणोनि सहेतुक बोलणें मम ॥६८९॥**

(य१४-१३४)

**म्हणाल आपुलें स्वप्न दुसरें न जाणती ।**
**तरी स्वप्नस्थ पुरुष नेणती अन्यजागृती ।**
**म्हणाल जागृत्संस्काराविण नाहीं स्वप्नप्रतीती ।**
**तरी स्वप्नसंस्काराविण जागृत्प्रतीति नसे ॥६९०॥**
**आधीं गर्भनिद्रेआंत । बालका अस्पष्ट विकार स्वप्न दिसत ।**
**त्याचेचि स्पष्टरूप जन्म जगत । हे मानूं शकती जडवादीही ॥६९१॥**
**यालागीं मीचि परमेश्वरू । जगत्स्वप्न मम माया विस्तारू ।**
**आतां होवोनि साकार निराकारू । माझा आनंद भोगीन मी ॥६९२॥**
**परी त्या आनंदीं अहंपण । होईल रसास्वाद विघ्न ।**

यालागी पावोन ऐक्यज्ञान । मी करीन भजन द्वैताऽविरोधें ॥६९३॥
माझी माया मजवांचोन । जरी निर्मिल एकही तृण ।
तरी मायेस पृथक्सत्ता येऊन । माझें एकपण मोडेल कीं ॥६९४॥
एकत्वाभिमान जोंवरी । द्वैततिरस्कार राहील तोंवरी ।
यालागीं न पडोनि अहंकारीं । मी अद्वैत होईन द्वैताश्रय ॥६९५॥
परी ऐक्यत्वाहंकार सोडोनि देतां । त्या ऐक्यअहंकाराचा द्वेष तत्वतां ।
उपजेल यास्तव आतां । उपायान्तर शोधीन ॥६९६॥
ऐक्याभिमानास करीन युवती । अवशिष्ट चेतना करीन पति ।
"एकाकी न रमतें" ही श्रुति । घेवोनि भक्ति मांडीन ॥६९७॥
या भक्तिचाची बडिवारू । परमार्थमय करीन संसारू ।
संन्यास न घेता घराचारू । अवघा निर्धारू कैवल्य ॥६९८॥
स्वप्न जगत्पुत्र माझें उदरीं । व्यापक विश्वचित्त कृष्णापटांतरीं ।
एक्या पूर्ण प्रेमसूत्रीं । दोन्हीं बद्ध पति पत्नि ॥६९९॥
देह एक औट हात । त्यांत ब्रह्मांड स्वप्नीं भासत ।
मग एकदेशीय श्रीकृष्णव्यक्तींत । विश्वव्यापी संवित् सांठवे न कां ॥७००॥
म्हणोनि भोगमोक्षाचिये ठायीं । आम्हा श्रीमूर्तिवाचोनि नाही ।
हे बोलिले तात वचनाभिप्रायी । त्यांचेचि पायीं वाहोनि सकळ ॥७०१॥
आघवे विश्व माझे उदरीं । (य१४-१३५) आणि माझे जनन तातजठरीं ।
यालागीं ब्रह्मासही निर्धारी । अधिष्ठान मी श्रीगुरु म्हणे ॥७०२॥
ते माय माझी श्रीगुरुजननी । कविता अर्पूनि तियेचे चरणीं ।
शेखीं ज्ञानेश्वरनाम जपोनि । जाहले कवित्वाभिमानरहित ॥७०३॥
परी विश्वपुत्र भाग्यें करोन । मज यावया मातृपण ।
कन्यापणें पृथगिव राखोन । एकत्वें निरूपण करितील तात ॥७०४॥
तो अग्रिम पदन्यास । सेवावया सुधारस ।
श्रोते होवोत राजहंस । कामादि वायस निवारूनी ॥७०५॥
काव्य-कवि-श्रोते त्रिपुटी । आघवी तातचरणांगुष्ठीं ।
आतां हृदया करावया गोष्टी । उरले शेवटीं ज्ञानेश्वरनाम ॥७०६॥

॥ ॐ तत्सच्छ्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे आगमनविलासे उपायोपेयनिरूपणन्नाम प्रथमः पदन्यासः ॥



प्रियलीलामहोत्सव ः आगमनविलास

# ॥ द्वितीय पदन्यासः ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

जय जय सद्‌गुरो अविकृता । जय जय सद्‌गुरो शीर्षश्रौता ।
जय जय सद्‌गुरो मायानिवृत्ता । अनध्यस्तविवर्ता आळंदीपते ॥१॥
तुझे स्मरता युगुल चरण । निःशेष हरपे जन्ममरण ।
पूर्ण वेचतां, उरे जें पूर्ण । तें निधान तूंचि एक ॥२॥
नातरी ह्या संसारीं । अवघी अमंगळाची परी ।
तेथ तुझे नाम अवसरी । मंगळ करी वस्तुमात्रा ॥३॥
वासना न राहोनी कांहीं । प्रियता जे उमटे विषयीं ।
तें मंगळता तुझे पायीं । ज्ञानेश्वर आई कृपाळें ॥४॥
(१)विघ्नें वारावया तूं गणपती । (२)विक्षेप वारावया सरस्वती ।
(३)आवरण वारावया श्रीगुरुमूर्ती । आळंदीपति तूं एक ॥५॥
निवटावया (४)ज्ञानाभिमान । तूंचि अनध्यस्तविवर्त सगुण ।
तुज पाहता अन्वयें पूर्ण । चराचर जन ब्रह्मरूप ॥६॥
जय जय सद्‌गुरु करुणाघना । जय जय सद्‌गुरो मनमोहना ।
जय जय सद्‌गुरो कल्याणनिधाना । विश्वजीवना आळंदीपते ॥७॥
जय जय सद्गुरो प्रेमळ जननी । माते आपुलें स्तन्य देउनी ।
ब्रह्मानंद पुष्टी देउनी । ठेवी चरणीं आपुल्या ॥८॥
माये तुझिया चरणावीण । मी सर्वथा आश्रयहीन । (य१४-१३७)
अवघी ही पक्षपात करून । निवविले जन आपुले ॥९॥
चकोर करावया तृप्त । अत्रिकुमर वेची आपुलें अमृत ।
वल्लीरस द्रोणगत । वेची सुरार्थ बृहस्पति ॥१०॥
विष्णु घेवोनि अवतार । कर्में प्रवर्तवोनि सुखी करी सुर ।
ब्राह्मण असोनि भृगुकुमर । रक्षी असुर निजमंत्रें ॥११॥
गजमुख आणि षण्मुख । हे उमादुग्ध प्याले सकळिक ।
पयोब्धि उरला होता एक । तो उपमन्यूतें दिला शिवें ॥१२॥

एवं आपुलालिया जनीं । देवीं स्तन्य दिले वाटुनी ।
मी एकलेंचि श्रीगुरु जननी । सर्वदा मनीं भुकेलें ॥१३॥
लौकिकदृष्टीं पाहतां । शिशुपणीं विमुक्त माता ।
यास्तव तुझें स्तन्य सर्वथा । घाली तत्वतां मम मुखीं ॥१४॥
भेदवादी वचनलवणीं । क्षारनिगमसिंधुपाणी ।
तें करुणांबुद तव वदनीं । मधुरतर होवोनि वर्षो कां ॥१५॥

॥ चौपाई ॥

प्रनमहु पद तव परम सुहाई । ज्या बिन केवल मति गति नाहीं ।
श्रुति पदि उपजहि संशय नाना । मिलत न रूप करहि अनुमाना ॥१॥

॥ दोहा ॥

सोहि रूप निज भजन करी परब्रह्म साकार ।
सत्रित्सुखमय देखि मति ग्यानभक्तिनिर्धार ॥१॥

जोगी छंद - वृत्त

स्वशिर धरि सुमिरत तिपुरहर तुम चरणनखवारिरी ॥
विदित पद मद हरन करनहि मुरलि निज कर धारिरी ॥
अटत नित जनहित मुदित मति सजि खग पस वारिरी ॥
रुचिर सुगुन रटत मिटतु मम पिय हिय रयन कारिरी ॥१॥
(य१४-१३८)

॥ अभंग ॥

समर्पिल्याविण कर्म तुझे पायीं । निवटत नाहीं मलदोषू ॥१॥
आरंभी केशव शेवटीं अच्युत । पवित्रता येत तेव्हां कर्मी ॥२॥
तुजवांचोनिया अन्य उपासना । विक्षेप वासना न निवारी ॥३॥
तुजवांचोनिया न शोभे विज्ञान । रसास्वाद विघ्न अंगीं दाटे ॥४॥
म्हणोनि मंगळ तुझेंचि चरण । अन्य आचरण नको काही ॥५॥
माय बाप गुरु सख्या ज्ञानदेवा । एक्या प्रेमभावाहातीं मिळे ॥६॥

॥ ओव्या ॥

यालागीं श्रीजगन्मोहना । श्रोतियांच्या मानसविघ्ना ।
वारोनिया कल्याणनिधाना । सत्रिदानंदे जग भरी ॥१६॥



राखोनिया ग्रंथा भेदू । पुढील अध्याय सुगम प्रबंधू ।
जो व्यासनंदनपरीक्षित्संवादू । तदनुवादू ऐकिजे श्रोतीं ॥१७॥
नाना योगयागाचे फळ । आवडी चिंतिजे वैकुंठपाळ ।
जे जाणोनि सत्यवति सुबाळ । आरंभी अंतर्यामीध्याना ॥१८॥
पूर्वाध्यायीं निरूपण । बोलिले स्थूलविधारण ।
ये अध्यायीं गोड वर्णन । ईश्वरधारण सांगतू ॥१९॥
स्थूलवस्तूचिया ठायीं । पाहतां विचारोनि हृदयीं ।
मनावाचोनि दुसरें नाहीं । हे पाहती लवलाही धारणीं ॥२०॥
पुष्पाचा जो गंध गुण । त्याचा संस्कार घेत मन ।
संस्कारत्वें पाहता जाण । हृदयीं मन गुणाधारू ॥२१॥
संस्कारांवाचोनि कहीं । मूर्खास मनाचें ज्ञान नाहीं ।
संस्कार ते तव लवलाही । गुणरूप वा आकाररूप ॥२२॥
तैसें बाहेंरीं निरीक्षिता । इंद्रिया गुणाचीच ओळख तत्वतां ।
द्रव्यासी आहे अनुमेयता । मनःसाम्यता दोहीकडे ॥२३॥
संस्काररूप गुणाधार । चित्त अनुमेय अंतर ।
बाह्य द्रव्य गुणाधार । तेही अनुमेय चित्तसम ॥२४॥
ते जे द्रव्य कुरुराया । कार्यानुमेय वैदान्तिक माया । (य१४-१३९)
सांख्य न्याय म्हणती यया । प्रकृति आणि परमाणू ॥२५॥
परी ते जडचि म्हणोन । चेष्टू न शके चेतनाविण ।
हे बोलिले मागा निरूपण । आणि बोलिजेल बहुठायीं ॥२६॥
यालागी द्रव्याचे जे जे गुण । तत्संस्काराधिष्ठान मन ।
मनाचा साक्षि कूटस्थ आपण । आत्माराम म्हणती जया ॥२७॥
तैसे द्रव्य बाह्यगुणाधार । तयाचा साक्षी परमेश्वर ।
म्हणोनि स्थूल-ध्यान केलिया साचार । अंतर्यामी-ध्यान घटो शके ॥२८॥
असो या नैय्यायिकाच्या युक्ति । आता दिठीं सुवावी वेदान्तीं ।
सर्पू देखिलिया रज्जुवरती । तरी रज्जुज्ञान फणीप्रति बाधक ॥२९॥
ती ओळखावया दोरी । दीप पाहिजे मंदांधारीं ।
परी दीप नसोनी घडी एक जरी । उभे राहोनीं पाहतां ॥३०॥

तरी सर्प चालतां न दिसे जेव्हां । ऐसे मनीं वाटे तेव्हां ।
कीं हा सर्प मृत्युभावा । प्राप्त झाला ॥३१॥
तैसी निवटावया आघवी भ्रांति । ज्ञानांवाचोनि नाहीं गति ।
परि ध्यान करोनि पाहतां निश्चिती । विषय दिसती निरर्थक ॥३२॥
ते स्थूलाचें करिता ध्यान । ब्रह्मा समर्थ झाला आपण ।
जग एवढें निर्माण । निश्चयें जाण करावया ॥३३॥
हीचि धारणा करितां जीव । द्वितीयकल्पीं हिरण्यगर्भभाव ।
मिळे हा सत्ताद्वयवादाभिप्राव । वासिष्ठीं पाहाहो ऐंदवाख्यानीं ॥३४॥
येथ आत्मैक्यें धारणा धरितां । सूक्ष्म तत्त्व सांभाळिता ।
ऐंदवासी सावित्री वरता । प्राप्त जाहली निश्चयें ॥३५॥

॥ श्लोक २ ॥

शाब्दस्य हि ब्रह्मण एष पन्था यन्नामभिर्ध्यायति धीरपार्थैः ।
परिभ्रमंस्तत्र न विन्दतेऽर्थान्मायामये वासनया शयानः ॥

(भागवत स्कंध २-श्लोक २)

या निरूपणाचा अभिप्राय । की उपासितां भगवत्पाय । (य१४-१४०)
विरक्तासी अधिकार होय । परमात्मनिश्चय करावया ॥३६॥
यालागीं कर्मास न स्पर्शतां । आरंभींच उपास्ती धरिता ।
कार्य होय ही श्रीधरीवार्ता । येथ उणे पुरे सर्वथा मी नेणें ॥३७॥
अथवा विरक्तीं करावी उपास्ती । इतरीं चालावे कर्मपथीं ।
ऐसा ही श्रीधरोक्ति । अभिप्राय निघो शके ॥३८॥
श्रीनृसिंह हात धरून । टीका करवी जयाकडोन ।
तयाचे वाक्य म्हणावया न्यून । सामर्थ्य नाहीं ममांगीं ॥३९॥
तथापि ईशावास्यश्रुति । सांगे समुचित कर्मोपास्ति ।
श्रुत्यनुकूल प्रमाण स्मृति । सर्वाचार्य म्हणती ऐसे ॥४०॥

वेदाचे स्वरूप

यालागीं पुढील श्लोकावतरण । ईश्वरनिष्ठतया कारण ।
निःशेष नाहीं प्रयोजन । कर्मकांडाचे ॥४१॥
ऐसे वदोत कां कोणी । परी स्वकर्मणा तमभ्यर्च्य ही वाणी ।



स्वयें बोलिले कैवल्यदानी । यालागीं अवतरणीं काम्यकर्मनिंदा ॥४२॥
शब्दाधिष्ठान जें ब्रह्म । तत्तादात्म्यें बोलिजे शब्दब्रह्म ।
म्हणजे हा अवघा जगद्भ्रम । वाचारंभण निश्चयें ॥४३॥
तया भ्रमीं न पडावा जीवू । यास्तव कळवळोनी बहू ।
मुखीं ब्रह्मानंदमाऊ । श्रुतिजननी घालूं इच्छी ॥४४॥
परी *काकाध्यासाचेनि बळ । मुख आघवे रोगाकूळ ।
यालागीं पाजिताहीं बाळ । प्रेमदुग्ध पिवो न शके ॥४५॥

(टीप - *क=पुण्य, अक=पाप)

म्हणोनि कर्मफळाची खेळणी । जीवा दाखवोनि रिझवी जननी ।
यालागीच तियेलागुनी । शाब्दब्रह्म म्हणताती ॥४६॥
कां बाळ बोबडे बोले जैसे । माय बोलो लागे तैसे ।
परी बोबडेपणाचा ठावो नसे । माये आंगीं किंचित ॥४७॥
तैसे जीव वाचारंभण । म्हणोनि श्रुतिमाता अनुवादी आपण ।
यास्तव शाब्दब्रह्माभिधान । एरवीं निर्वाण अशब्द वेदू ॥४८॥
तया वेदानुवादीचें बळ । घेवोनिया मूढ सकळ ।
प्रशंसिती कर्मफळ । जे कां किडाळ आदि अंतीं ॥४९॥
कडु विष ते नर्क जाण । गोड विषा स्वर्गाभिधान । (य१४-१४१)
जैसा प्रथम मधुर बचनाग आपण । घेतसे प्राण हळु हळु ॥५०॥
तैसे यज्ञपुण्यसंचयबळें । स्वर्गीं भेटती भोगचाळे ।
मग तेणें वासनेचें उमाळे । शांत अळुमाळे न होती ॥५१॥
तया स्वर्गसुखाप्रति । वेदोक्त म्हणोनि अंगिकारिती ।
बद्धापरी तयांची भ्रांति । विचारे निश्चिती अधिकतर ॥५२॥
रोग असोनि न घे औषध । द्रव्य असोनि न घे आनंद ।
तैसा धार्मिक असोनि (न) ज्ञानशुद्ध । तरि भ्रांति कोण त्याहुनी ॥५३॥
म्हणावया चंचल जारिणी । परि पतिव्रता पतिसेवा करोनी ।
पतिऐक्य न जाणे अंतःकरणीं । तरी भ्रम त्याहोनि कोणता ॥५४॥
तैसे पशुपक्ष्यादि विषयासक्त । येथ नवल नाहीं किंचित ।
परी मानुषजन्म होवोनि प्राप्त । भोग वेदोक्त म्हणोनि वांछिती ॥५५॥

॥ श्लोक ३ ॥
अतः कविर्नामसु यावदर्थः स्यादप्रमत्तो व्यवसायबुद्धिः ।
सिद्धेऽन्यथाऽर्थे न यतेत तत्र परिश्रमं तत्र समीक्षमाणः॥
(भाग.२-२-३)

**एष पंथा या पदाचा । पुढील श्लोकीं अन्वयो साचा ।**
**अर्थ ऐसा कीं हा पंथ वेदाचा । जो वाचारंभू परित्यजिजे ॥५६॥**
**हाचि पंथ ओळखोनि । जे कां होती सर्वज्ञ मुनी ।**
**ते या जगातें नाम ब्रह्म मानोनी । न होती मनी प्रमत्त ॥५७॥**
**नारदांनीं विचारितां । प्रथम नामोपासना करी तत्वतां ।**
**ऐसे स्वयें जाहला सांगतां । सनत्कुमार छांदोग्यी ॥५८॥**
**नाममात्रचि रूपलक्षण । यालागीं नाम ब्रह्म पाहतां जाण ।**
**विश्व ब्रह्म उपासन । सहजचि घडे ॥५९॥**
**मग जे जे मिळती भोग कांही । तेथ आसक्त न होय देही (जीव) ।**
**विषय भाविता शेषशायी । भोक्ता भक्त सहज होय ॥६०॥**
**हीचि उपासनेची खूण । कृपा करतां करुणाघन ।** (य१४-१४२)
**मुनी ओळखती आपण । मग कल्याणनिधान चिंतिती ॥६१॥**
**ते भोग मिळवावया जाण । नाहीं श्रमाचें कारण ।**
**ब्रह्मत्वें भोग नाहींत भिन्न । यालागीं समान सर्वत्र ॥६२॥**
**नारायणचि गोड अन्न । नारायणचि निंबपान ।**
**मग अन्नार्थचि श्रम दारुण । काय म्हणून करावा ॥६३॥**
**लाधलिया भानुसंगति । मिळवावया तेलवाती ।**
**ऐसा कोण पामरमति । जो श्रम अति करील ॥६४॥**
**तेवि आपली अतृप्ति । याचेचि नांव क्षुत्तृड्वृत्ति ।**
**ते वृत्ति जाहलिया जगत्पति । क्षुधाक्षांति अति सुलभ ॥६५॥**
**स्वामी अत्यंत दयावंत । न मागतां अज्ञाना देत ।**
**तो सज्ञानासी उपेक्षित । म्हणतां जिव्हा कां न झडे ॥६६॥**

सुंदरदास हिंदी / इंदव छंद

**होई निचिंत करै मत चिंतही । चोंच दई वह चिंत करैगो ।**



**पाउ पसार पर्‍यो कि न सोबत । पेट दियो वह पेट भरैगो ।**
**जीव जितै जलके थलके पुनि । पाहनमे नर पहुचाय धरैगो ।**
**भूखहि भुख पुकारत है नर । सुंदर तूं कह भूख मरैगो ॥१॥**
**दात नथे तब दूध पिये प्रभु ।**

॥ अभंग ॥

**तो एक दयाळु असतांही शीरीं । वृथा चिंता करी चित्त माझे ॥१॥**
**आपुल्या भ्रतारें देतां अन्नपाणी । तथापि जारिणी इच्छी दुजा ॥२॥**
**तनु दिली त्याची पडला विसर । स्तविले ते नर धनोन्मत्त ॥३॥**
**म्हणोनि आंधळे जाहले नयन । पुढे आठवण राहावया ॥४॥**
**ऐसी जन्मो जन्म असो द्यावी कृपा । सख्या मायबापा ज्ञानेश्वरा ॥५॥**
(य१४-१४३)

॥ ओव्या ॥

**अथवा केवल ईश्वरावरी । विश्वासही नसला जरी ।**
**कर्मवाद घेवोनी तरी । समाधान होवों शके ॥६७॥**
**पापानें ये तिर्यग्योनि । तींतही सुलभ तृणपाणी ।**
**मग पुण्यें मनुष्यदेह येवोनि । अन्नपाणी सुलभ कां नव्हे ॥६८॥**
**तात्पर्य कोण्याहि दृष्टीं । यत्न करूं नये भोगासाठी ।**
**घडी घडी मरण पाहोनि दृष्टीं । श्रीजगजेठीं चिंतावा ॥६९॥**
**हे वादपूर्वक निरूपण । *यामुनाश्वासनीं पंचमानुमोदन ।**
**त्यांतोनि पाहोत सज्जन । येथ वर्णिजे गुण माधवाचे ॥७०॥**

*(*टीप :- सौ. यमुना आईला पाठविलेलें आश्वासनपत्र. सूक्तिरत्नावली द्वादशयष्टी पृष्ट २२ श्लोक २५.)*

**वर्णितां एक अर्जुनसखा । अवघा संसार वाटे फिका ।**
**तेणें सर्वभूतीं समाधिसुखा । देखे निष्कलंका विरक्तू ॥७१॥**
**ज्या पृथ्वीवरी अंग घालितां । मृत्यु महानिद्रांही मिळे तत्वतां ।**
**त्याची महीवरी अंग ठेवितां । अल्प निद्रा जीवंता मिळे न कां ॥७२॥**
**जे पोटीं जागा दे प्रेतासी । ती अव्हेरील केवी जीवंतासी ।**
**पृथ्वी माउली कां असतां ऐसी । शय्येसी अपेक्षिजे ॥७३॥**
**बाहु असता कासया उशी । अंजूळी असतां आपणापाशी ।**

**पंचपात्र संध्यापात्राशी । घेवोनि काय चोखिजे ॥७४॥**
**येचविषयीं प्रमाण । बोलिले अमृतराय आपण ।**
**ऐसे वचन सांपडतां प्राचीन । मग कासया नवीन रचावे ॥७५॥**
**पितयाचे करीची सांठवण । असतां श्रमाचे काय कारण ।**
**यालागीं श्रोते सावधान । अमृतवचन ऐकावें ॥७६॥**

॥पद : अमृतरायांचे॥

**अखंड हरि हरि भजा बापनो । अखंड हरि हरि भजा ॥धृ०॥**
**किति सेवाल धनदुर्मदा, बापनों ॥ अखंड ॥** (य१४-१४४)
**काय रानांत आटल्या नद्या । काय तरू म्हणति फळ न द्या ।**
**किती कांडोकांडी मिरवाल मुद्या ।**
**वाचा एकोबाचा भागवत अध्या रे । बापनो ॥१॥**
**काय वाटेसी न मिळती चिंध्या । काय मिळे ना भोपळा दुध्या ।**
**या तर गोष्टि सुखाच्या सुध्या । गेली घडी आजचि न ये उद्यां रे ॥२॥**
**काय सांडोनि गोष्टीं खऱ्या । काय दुकाळ पडला कऱ्या ।**
**काय महर्घ तृणाच्या बोऱ्या । या तर गोष्टि शुकाच्या बऱ्या रे ॥३॥**
**काय लोकि दारवंट रोधिलें । काय न घालती चार जोंधळें ।**
**हे काय नेणती दुर्मद आंधळें । व्यर्थ अमोलिक आयुष्य उधळे रे ॥बाप०॥४॥**
**बाहु असतां आपणांपाशीं । मग कशासी पाहिजे उशी ।**
**काय अडचण महदाकाशीं । काय पृथ्वी ठाव नेदि कुशी ॥ बापनो ॥ ॥५॥**
**कर जोडोनि अमृत विनवितो । बाहु उभारोनी गर्जतो,**
**जो का निश्चय धरुनी बैसतो । त्यासि हरि बैसल्या ठायीं देतो ॥६॥बापनो०**

॥ श्लोक ६ ॥

एवं स्वचित्ते स्वत एव सिद्ध आत्मा प्रियोऽर्थो भगवाननन्तः
तं निर्वृतोऽनियतार्थो भजेत संसारहेतू परमश्च यत्र ॥६॥

(भाग.२-२-६)

**ओव्या :- <u>एवं वैराग्याचिये बळें । विषय विषचि दीसती सगळे ।</u>**
**<u>तेणें इंद्रियांचे डोहळे । आंतलिया आंत मुरती ॥७७॥</u>**
**नवल वाटे माझिया चित्तीं । आधुनिक जनांची रीती ।**



**योगाभ्यास करूं इच्छिती । मंचकावरती निजोनी ॥७८॥**
**आधींच भुकेले श्वान । वरी तया दाखविले अन्न ।**
**मग बोलावितां अंगुली दाऊन । तरी ते सर्वथा नायके ॥७९॥**
**तेवीं वासनाबळें क्षुधित । हपापले श्वानचित्त ।** (य१४-१४५)
**वरी विषयान्न पुढे दिसत । ते अभ्यासें निश्चित नाटोपे ॥८०॥**
**तें मन प्रबुद्ध होय जरी । नील नयन मिळवोनि तरी ।**
**दिठी सुवोनि विषयांतरी । विष निर्धारी देखतु ॥८१॥**
**ते विषमिश्रित विषयान्न । त्यागोनि परते निळू मन ।**
**मग न शिकवितां आपण । अभ्यास करिती इंद्रियें ॥८२॥**
**डोळे अंगुळी न रोधितां । दृष्टि न जाये रूपपथा ।**
**तिखट-लवण न सोडितां । रसना रसपथा रिघेना ॥८३॥**
**न पिडिताहि टाचेकरुनि । उपस्थ न वांछी कामिनी ।**
**एवं अवघिया अभ्यासाची खाणी । विषयविरति निश्चयें ॥८४॥**
**प्राणायामाचा अभ्यास थोर । कित्येक करिती पोहणार ।**
**पैसा टाकितां तीरस्थ नर । काढिती वर निजशक्ति ॥८५॥**
**तेवीं अंगीं नसतां वैराग्यबळ । योग कोल्हाटियांचा खेळ ।**
**हे मी न बोले युक्तिजाळ । अनुभव प्रबळ ऐसाचि ॥८६॥**
**अन्यथा वाटेल ज्याचे मनीं । तेणें पतंजलीस यावे पुसुनी । म्हणावें कीं**
**अभ्यास समर्थ असोनि । निर्विकल्प समाधीस परवैराग्य कां हेतु ॥८७॥**
**अत्यंत लागलिया तहान । मृगजळ घ्यावया धांवे कवण ।**
**मृगजळीं जावो न द्यावे मन । हा कहीं अभ्यास कोणं केला ॥८८॥**
**तेवीं मिथ्या कळलिया विषयसंपत्ति । मग अभ्यास कीजे किमर्थ वृत्ति ।**
**ती तयाची पूर्ण विरक्ति । धरी निश्चिति विश्वातें ॥८९॥**
**तयाच्या क्षमेची साक्षदात्री । जनपादतळीं राहे धरित्री ।**
**तयाच्या अलिप्त गामगोत्री । आकाश दिनरात्री अलिप्त ॥९०॥**
**ऐसियाच्या अंतःकरणीं । भावनेवाचोनि प्रगटे चिन्मणी ।**
**जेवी सरोनि जातां रजनी । प्रगटे दिनमणि श्रमाविण ॥९१॥**
**तया प्राप्ताचीच होय प्राप्ति । तोचि प्रगटे वृत्तिसूर्यकांति ।**

यालागीं निर्गुणी सगुणीं प्रीति । समान निश्चिती पघळतु ॥९२॥
कारणअविद्ये सहित भव । याचा येथ अत्यंताभाव ।
तो परमात्मा वासुदेव । सर्वभावें भजावा ॥९३॥
विरागें जगन्मिथ्या निश्चितार्थ । ज्ञानें होवोनिया तृप्त । (य१४-१४६)
प्रेमभावें अखंडित । उचंबळत विलसावें ॥९४॥
जरी अवघियाहोनी श्रुति । प्रियता सांगे आत्मयाप्रति ।
तरी अहमर्थातें निश्चिती । प्रियता कल्पांती घटेना ॥९५॥
अहमर्थासी प्रियता म्हणतां । चिदाभास प्रिय होईल तत्वतां ।
आणि अहमर्थरहिता प्रिय म्हणतां । तरी तो परमात्मा सहजचि ॥९६॥
अहंकार वेगळा करून । जे निरभिमान प्रियपण ।
तोचि व्रजगोपिकारमण । मनमोहन जगद्गुरू ॥९७॥
अहमर्थाचा बाध करून । प्रभुसि सामानाधिकरण ।
हें भक्तिवांचून वाक्यज्ञानाकडून । न होय आण श्रीगुरूची ॥९८॥
व्युत्थानीं विषयरूप नारायण । समाधींत अहंरहित आनंदघन ।
याचि नांव ज्ञानपूर्वक भजन । हे मुख्य खूण श्रीगुरूची ॥९९॥
दयाळू आळंदीवल्लभ । वळतां हे होय सुलभ ।
एरव्ही यत्न करितां स्वयंभ । निघती कोंभ वासनेला ॥१००॥
एक श्रीगुरु नसतां शिरावरी । निद्राचि लागे समाधिअवसरी ।
कृष्णचरित्र ऐकतां निर्धारीं । कामचि उपजे ॥१०१॥
श्रवणीं उपजे विरति । मननीं सुचती कुयुक्ति ।
निदिध्यासनीं कषायप्राप्ति । साक्षात्कारीं रसास्वादु ॥१०२॥
म्हणोनी प्रेमजळेंकरून । क्षाळावे आळंदीपतिचरण ।
मी ब्रह्म हा बोध तयावरून । ओवाळून सांडावा ॥१०३॥
ब्रह्मास ब्रह्मत्वें बोधपण । हे तयाच्या एकरसीं क्षार लवण ।
अति कडू निंबरूप मीपण । त्या दोहोंचे निंबलोण करावे ॥१०४॥
भक्तिरहित मुक्त्यभिमानी । मी ऐसें पुसे तयास छळुनी ।
कीं तुमचिया मतीं निर्वाणी । वासनानुसार फळ मिळे ॥१०५॥
आणि ज्ञान न होय जोपर्यंत । तोंवरी वासना अनादिअनंत ।



आमुचा वासनाविषय भगवंत । नाहीं मनीं भोगइच्छा ॥१०६॥
वासनेनें फळ मिळे म्हणून । आम्हांस मिळेल जरी श्रीकृष्ण ।
वासना अनादि अनंत म्हणोन । तो फलत्वें अनादि अनंतचि ॥१०७॥
(य१४-१४७) ऐसे जरी होईल दैवेकरूनि । तरी तुमचे ज्ञान इच्छावे काय
म्हणूनी । एवढा भक्तिमहिमा सांपडे अज्ञानीं ।
तंव तो ज्ञानाभिमान त्यागुनी न मिळेल कां ॥१०८॥
म्हणोनि होवो न होवो ज्ञान । स्वापेक्षारहित करावें भजन ।
जय इंद्राणीमूळपद आळंदीरमण । ज्ञानमेयमान ज्ञानेश्वर ॥१०९॥

॥ श्लोक ७ ॥

कस्तां त्वनादृत्य परानुचिन्तामृते पशूनसतीं नाम युञ्ज्यात् ।
पश्यञ्जनं पतितं वैतरण्यां स्वकर्मजान्परितापाञ्जुषाणम् ॥

(भाग. २-२-७)

नवल भजनाची अंतरस्थ गोडी । मुक्ताही उपजवी जन्मावडी ।
अहो ही प्रेमाची परवडी । मूळ सोडी परकीयासाठी ॥११०॥
आपुले मूळ मातृसदन । तें कांतासाठीं परित्यागून ।
पातिव्रत्य अवलंबून । जगन्मातृपण पावती स्त्रिया ॥१११॥
तेवीं मी ब्रह्म हा मूळाभिमान । त्यागोनि भोगावें दासपण ।
तेव्हां अंगी संतचिन्ह । उमटती जाण निश्चयें ॥११२॥
माझिया पाहोनि बहु पुनरुक्ति । झणीं श्रोते कंटाळतीं ।
परी परमार्थी पुनरावृत्ति ।"आवृत्तिरसकृदुपदेशादिति" सूत्र सांगे ॥११३॥
वाचेनें मंत्रजप करणें । तैसे वृत्तीनें ज्ञानाची आवर्तनें ।
पुनरुक्तिमाजी गणणें । नव्हे योग्य सर्वथा ॥११४॥
जयाचे ऐकतांचि गुण । गोपिका जाहला पार्वतीरमण ।
तो एक स्वामी वेगळा करून । पुनरुक्ती कराव्या कवणें स्थळी ॥११५॥
समर्थ असतां आपुली जननी । बालकें शोक रोधावा काय म्हणुनी ।
वारंवारचि रडोनी । कां न स्तन्य मागावें ॥११६॥
तेवीं माझी अरूष वाणी । माझिया मना बुझावणी ।

एरवी निववावया पंडितखाणी । सामर्थ्य कोठुनी आणिजे ॥११७॥
कां रोगें जो पिडिला होय । तो वैद्याची घडीघडी वाट पाहे । (य१४-१४८)
अझोनि कां न ये ऐसे पुसताहे । जवळीचिया जनासी ॥११८॥
तेवीं अंतर्बाह्य नयनहीन । मी वैद्य बोलावी आळंदीरमण ।
एथ कोट्यावधि पुनर्वचन । होतां मम मन निःशंकचि ॥११९॥
असो माझिया पुनरुक्ती । मी पुसे तुम्हां महाजनां प्रति ।
एक सोडोनी जगत्पति । नव्हें कोणाप्रति वर्णू वदा ॥१२०॥
परलोकीही जयाचें जीवित । पुत्रश्राद्धावलंबी होत ।
त्या कर्मठांची मात । वर्णू काय सांगा तरी ॥१२१॥
जन्मदाती सांडोनी जननी । हृदयीं पूजिती कुटिल कामिनी ।
त्या विषयी जनांप्रति श्रीपति सांडोनि । वर्णू काय सांगा तरी ॥१२२॥
मायबाप म्हणोनि घेती । पुत्र मेलिया हांक फोडिती ।
क्षुधा लागलिया सुखें जेविती । त्यांप्रति वर्णू काय सांगा ॥१२३॥
नवल बापा जीवांची गति । पुत्र सांपडोनि वैकुंठपति ।
सहा बाळे तयाप्रति । मागती झाली देवकी ॥१२४॥
जयाचें करितां नामस्मरण । मुनि देहही जाती विसरोन ।
तो देह झांकावया पांघरूण । याज्ञसेनीने कष्टविला ॥१२५॥
ब्रह्मनिष्ठ संदीपन । जेणें ओळखिला हा नारायण ।
तोही मागतां झाला निजनंदन । वासनाधीन होवोनि ॥१२६॥
धांव म्हणें गांठीं सुटतां । इतुकिया दे सरूपता ।
ऐसा सांडोनी उदार दाता । सांगा तत्वतां वर्णू कवणा ॥१२७॥
जयातें सारथ्य करवील पूर्ण । ऐसें पुण्य आहे कवण ।
जो अकर्ता नारायण । कर्म तंव जाण कर्तृजन्य ॥१२८॥
तथापि प्रेमाचियासाठीं । जेणें देवपण लपविलें पोटीं ।
तो सांडुनिया जगजेठी । पसरूं ओटी कवणापुढें ॥१२९॥ (य१४-१४९)

॥ पद ॥

कवणाचे वर्णू गुण । तया दातियावीण ॥धृ॥
भिल्लीणीचीं उष्टी बोरं । मुखी घातली प्रेमानं ।


वैरियाहि वरी दया । देतो पदसमान ।
दुर्वासाला खांदीं वाहे । होवोनिया वाहान ।
कबीराचे शेले विणी । देवपणा सोडोन ॥१॥
एकलिया चिंधीमुळे । पितांबर झांकिला गा ।
तीन मुठी पोह्यासाठीं । गांव सोनियाचा दिला गा ।
दानवाच्या बाळासाठीं । कैसा स्तंभीं प्रगटला गा ।
माधवदासा अतिसारी । पट धुवोनिया दिला गा ॥२॥
युगायुगीं उभा आहे । ऐसे गाती संतजन ।
आंधळ्या पांगळ्याचा । मायबाप दयाघन ।
पापपर्वत छेदी । घालोनिया सुदर्शन ।
ज्ञानेश्वरकन्या तया याची । पददासपण ॥३॥

ओव्या -

पशु खाववयापुरतेंचि घेति । संग्रह कदापि न करिती ।
बुद्धिमान मानव असोनि संग्रहिती । यास्तव न तुलती पशूसि ते ॥१३०॥
म्हणवोनि सोडोनि भगवच्चिंता । जे जीवें वांछिती कामिनी कान्ता ।
तुलाया तन्नीचत्वपंथा । दृष्टान्त नाहीं नरकीं ही ॥१३१॥
नरकही भोगोनि जाण । पाप होवों लागे क्षीण ।
हे मूढतम सुख भोगोन । वासना अधिक वाढविती ॥१३२॥

वात्सल्य भक्ति

असो या जनांची रीति । आतां वर्णू तयाप्रति ।
जिहीं हृदयीं भगवन्मूर्ति । स्थापिली प्रेमें ॥१३३॥
जो परमात्मा सर्व परिपूर्ण । तो हृदयीं स्थापिला काय म्हणोन ।
कीं तयाचें तें ईश्वरपण । कराया रक्षण निजसत्ता ॥१३४॥
गर्भांतूनि बाहेर निघती । मग जीव सोहंस्मरण विसरती ।
तैसा बाहेर निघतां जगत्पति । झणी विसरेल देवपणा ॥१३५॥
याचिलागीं हृदय । करोनियां गर्भाशय ।
तेथ ठेविती यादवराय । आपण माय होवोनि ॥१३६॥
तया प्रेमशयनसुकुमारा । प्राणविंझणें घालिती वारा ।

वृत्ति धांवती सामोरा । दृष्टि तयाची काढावया ॥१३७॥
ते जरी मनुष्यवेषधारी । परी निश्चयेकरोनि नारी । (य१४-१५०)
स्तन उलटविले अंतरी । पूतनारी पाजावया ॥१३८॥
प्रादेशमात्र हृदय पूर्ण । जिहीं ठेवावया हेंचि कारण ।
कीं सर्वकाळ रमारमण । बाळ होवोनि राहावा ॥१३९॥
हृदयाकाशविस्तार करिता । तरुण होणें लागेल भगवंता ।
मग तारुण्याची चिंता । माझ्या सुकुमारा स्पर्शेल झणीं ॥१४०॥
याचिलागीं वत्सलपणीं । प्रादेशमात्र हृदयसदनीं ।
साठविती चक्रपाणि । अति सेवनीं आसक्त ॥१४१॥
प्रथम व्यापक बाहेर होतां । तो दोन्ही बाहीं आलिंगिता ।
हृदयीं शिरला परंतु आतां । बाहेर सर्वथा येवों न शके ॥१४२॥
शंखचक्रगदाधारी । जो युगीं युगीं असुर हरी ।
तो कोंडला हृदयमंदिरी । हेंचि आश्चर्य वाटते ॥१४३॥
जेणें मीनावतारीं पुच्छेंकरोनि । अवघा सागर उडविला गगनीं ।
तो सांठविला हृदयभुवनीं । हेंचि आश्चर्य वाटतें ॥१४४॥
जेणें आपुली दृढतर पाठीं । दिधली मंदराचळा तळवटीं ।
तो अंग आखडोनि हृदयसंपुष्टी । बैसला हे आश्चर्य ॥१४५॥
जेणें नखीं विदारिला असुर । पाताळीं घातला दानवेश्वर ।
त्रिसप्त पृथ्वी केली निःक्षत्र । तो प्रादेशमात्र नवल हे ॥१४६॥
जो शिवप्रिय सीतारमण । जो रावणांतक रघुनंदन ।
जयाचें यश गेले ब्रह्मांड भेदोन । तो प्रादेशापन्न नवल हें ॥१४७॥
जो हलमुसलधारी दानवहंता । जो बौद्धावतारीं करुणाकर्ता ।
जो कल्की म्लेच्छसंहर्ता । तो हृदयभुवनीं नवल हें ॥१४८॥
कीं चक्रगदा पाहोनि करीं । भलतीच कळ आणील घरीं ।
म्हणोनियां हृदयांतरी । कोंडोनी निर्धारी ठेविला ॥९४९॥
ऐसा हृदयीं ठेवोनि आधीं । मग तेथेंचि धारणा धरिती त्रिशुद्धि ।
म्हणवोनि ही ध्यानसिद्धि । कर्तृतंत्र न म्हणावी ॥१५०॥
तेचि धारणा कवणें रीति । शुक सांगती परीक्षिती ।



सावधान चतुर श्रोतीं । निश्चलमतीं ऐकावी ॥१५१॥ (य१४-१५१)

॥ अभंग ॥

तो एक सांडूनि यशोदानंदनु । नको अन्य वाणू सखे जिव्हे ॥१॥
पोट भरावया स्तविले धनिक । तेणें अविवेक बळावला ॥२॥
हित केले तरी अनहित भासे । नानाविध ऐसे लोक सारे ॥३॥
शिणलीस लोक पुजोनि अनंत । घेई प्रायश्चित्त आतां तरी ॥४॥
केशव माधव गोविंद गोपाळ । त्रिभुवनपाळ सकरुण ॥५॥
शरण येवोनि कोणी उपेक्षिला । ऐसा आयकिला नाही नाही ॥६॥
तयांहूनि सांडी ओवाळूनि काया । आळंदीच्या रायामाजी मिळे ॥७॥

॥ श्लोक ॥

जिव्हे म्यां पहिले तुला दधिमधू पाजीयले आदरें ।
देहांतीं स्मरशील राम रसने या कारणातें बरें ।
तें तूं विस्मरलीस भूल पडली जन्मासी आलो पुन्हा ।
आतां मी तुज निंब पाजित असे तूं ध्यायिं नारायणा ॥१॥

॥ ओव्या ॥

सकल योगाचिया शिरीं । वृत्तिरोधाची सरोभरी ।
तो वृत्तिविषयो होता हरी । योग निर्धारी सहज साधे ॥१५२॥
जो आलिंगावया निजभक्त जन । दों-वरी भुजा धरी दोन ।
ऐसा सांडूनि करुणानिधान । सांगा अन्य कोण वर्णावा ॥१५३॥
तोडावया भक्तांतराया । गदा धरणे लागे जया ।
निःशेष निवटावया माया । करीं धरिलें चक्र जेणें ॥१५४॥
एके हातीं धरिलें कमळ । तयाचा हाचि अर्थ निष्कळ ।
कीं कठीण आयुधें धरोनि सकळ । अतिसुकुमार कमळ धरिलें ॥१५५॥
(य१४-१५२) म्हणजे जो कर्मानुसार न्यायकर्ता । तोचि दीनें कृपें उद्धरता ।
ऐसिया विसरोनी त्रैलोक्यनाथा । आणिक तत्वतां कवण वर्णू ॥१५६॥
नवल नवल जनसृष्टि । जी प्रेम करी नथणीसाठीं ।
या स्त्रियेचा विश्वास वाटे पोटीं । नावडे जगजेठी विश्वकर्ता ॥१५७॥
असो तो एक करुणाघन । सकळ शब्दा अधिष्ठान ।

तेथेंचि ठेविती मन । होती सज्जन हरिभक्त जे ॥१५८॥
चित्तनिरोध योगलक्षण । त्या चित्ताच्या भूमी पांच जाण ।
*मूढ *क्षिप्त *विक्षिप्त *एकतान । *निरुद्ध प्रमाण पांचवी ॥१५९॥
हिताहित कांहींच नेणें । कर्तव्याकर्तव्य न जाणे ।
सत्य कपट दोन्हीं नेणें । झोंप घेणें आवडे ॥१६०॥
जयाचिया झोंपेंसांठीं । तीनतीन दिवस पोटीं ।
कोचंबे होवोनि चोरटी । क्षुधातृषाही ॥१६१॥
काना येईल ते ऐकावें । तोंडा येईल ते बकावें ।
जो करणियाचेनि नांवे । भलतेच करी ॥१६२॥
तृत्तिाची भूमिका मूढ । तो ब्रह्मा असला तथापि दगड ।
तया नाहींच चाड । उपदेशाची सर्वथा ॥१६३॥
बाष्प होवोनि जळ जाय वरी । भूमीं पडे वर्षावसरीं ।
कीं श्वासोश्वास दिवसरात्रीं । जागृतिनिद्रेत चालती ॥१६४॥
कीं धृवाचिया गतीसरसें । गृहांचें गमन सर्वथा दिसे ।
कीं पिसाळलें श्वान जैसें । बिदोबिदी हिंडत ॥१६५॥
तैसे जयाचिया मना । विसावा नाहीं कवणिया क्षणा ।
जयाचिया आचरणा । पाहतां उमटे हास्यरसु ॥१६६॥
घडी एक शेतामाजीं जायें । वृक्षी माळा बांधोनि राहे ।
गृहीं येतांचि लवलाहे । मंचकीं राहे निश्चिन्त ॥१६७॥
डोळीया पाहे परावी नारी । धांवो पाहे कुतरीयापरी ।
परधन पाहता उमजे चोरी । जेवीं पढला कार्तिक्यशास्त्र* ॥१६८॥

(*स्वामी कार्तिकेयांचा चौर्यशास्त्रावरील ग्रंथ)

अवचटें पाहतां साधुसदन । आसन मांडी योगियासमान ।
घडी एक ऐकतां पुराण । रडे जेवीं भागवत ॥१६९॥
अथवा आलिया सिंधुलहरी । पुराणिकाच्या मुखांत मारी । (य१४-१५३)
उगाचि लोटांगण पायावरी । घालूं इच्छी भलत्याच्या ॥१७०॥
ऐसी जयाची चंचलवृत्ति । तयाची भूमिका क्षिप्त म्हणती ।
जो स्थिर असे बहुधा चित्तीं । परी भोगासक्ति सुटेना ॥१७१॥



जैसा आपुलाचि कुमर । घरामाजीं निघाला चोर ।
तरी अपराध झांकों पाहे समग्र । जननीं जेवीं ॥१७२॥
तेवीं काय करावे हें कळें । परी विषयवशें नुघडती डोळे ।
मग उदास ऐसा खेळे । भोगसुख ना योगसुख ॥१७३॥
कां मानासाठीं वेंचले धन । मग उपवास पडती दारुण ।
बाहेरी भला संतप्त मन । तैसें उदासपण यृत्तिा ॥१७४॥
वाईट नावडेचि अंतरीं । कुतर्के उत्तमही अव्हेरी ।
प्रेम ना क्रोधही न ये अंतरीं । मग कार्य करी यंत्रासम ॥१७५॥
हीचि भूमिका विक्षिप्त । जी रजोबाहुल्यें दुःख देत ।
विषय विष समजोनी यथार्थ । मारोनी लाथ उभा जो ॥१७६॥
कां जीणें घेतलें सतीचे वाण । जी विषयचि नेणे कांतावीण ।
कीं क्षुधेनें व्यापिता बाळ तान्ह । मायेवांचोनि राहेना ॥१७७॥
कोट्यावधी खेळणीं देतां । उगे न राहे न भेटता माता ।
तैसे विषय सर्वथा । निःशेष चित्ता नावडती ॥१७८॥
अमृत न मिळाले जरी । बिषताट कां घ्यावे तरीं ।
असले आयुष्य निर्धारी । कां लवकरी दवडावे ॥१७९॥
तैसी न कळेल जरी मुक्ती । तरी कां धरावी विषयासक्ती ।
ऐसें उमजोनिया चित्तीं । जो एकाग्रस्थितीं राहू इच्छी ॥१८०॥
काकविष्ठा कराया भक्षण । न घे जेंवी यतीचें मन ।
तेंवी ब्रह्मलोकावरी भोग संपूर्ण । जयाचें मन इच्छीना ॥१८१॥
जोंवरी वैराग्य नाही पोटीं । तोंवरी देहात्मअविवेकगाठी ।
भोग दुःख कळतांचि शेवटीं । वाटे मी भोक्ता न व्हावे ॥१८२॥
भोक्ता होणें देहसंग । मी देहाहूनि भिन्न चांग ।
ऐसा विवेकही सुरंग । उपजे मनीं ॥१८३॥ (य१४-१५४)
मग जेणें जेणें देहाध्यास । होईल ते त्यागी विशेष ।
समाधान मानी कीं सुटलो निःशेष । काळाजीचे हातुनी ॥१८४॥
ऐसी जयाची चित्तवृत्ति । एकाग्रभूमिका तिये म्हणती ।
ग्राह्य-त्याज्यरहित वृत्ति । आत्मस्थितिविरुद्ध ती ॥१८५॥

जयाचिया दृष्टीपुढे । विश्वाचे विश्वपण आघवे बुडे ।
व्यवहार करिताही रोकडे । समाधी चढे अधिकची ॥१८६॥
जैसा वयाचिये शेवटीं । एखादे बाळ प्रसवे वांझोटी* ।

(टीप- *जन्मवंध्या नव्हे, काकवंध्या)

तो जवळी असतां प्रीती पोटीं । ते वाढे मोठी दुरी जाता ॥१८७॥
तैसे अनंत जन्माचे बंधन । सुटले ज्याच्या कृपेकरून ।
त्याचे व्यवहारीं न दिसतां चरण । अधिकची मन व्याकुळ ॥१८८॥
'तद्विस्मरणे परमव्याकुलता' । हें नारदसूत्रीं बोलिलें तत्वतां ।
येणें भगवद्भक्तां । व्युत्थानींही समाधी ॥१८९॥
ऐसी जे कांहीं पूर्ण स्थिती । ते हृदयारूढ व्हावयाप्रती ।
मुख्य उपाय भगवद्भक्ति । आण निश्चिती श्रीगुरूची ॥१९०॥

योग व भक्ति : तुलना

नवल या भक्तिचे विंदान । कैसी श्रेष्ठ योगाहून ।
येथ अनुभवचि परम प्रमाण । तेचि खुण सांगतो ॥१९१॥
योगी समाधीहूनि उतरती । प्रारब्धें विषय स्वार्थ भोगिती ।
जेवण करूनी रात्रीं बैसती । आसनीं समाधी लावावया ॥१९२॥
तैसे न होती भगवज्जन । विषयचि करिती कृष्णार्पण ।
माझिया भोगासाठीं पदार्थनिधान । सृष्टिमाजीं नाहीं म्हणती ॥१९३॥
फूल पाहतांचि क्षणीं । गंध घ्यावें हें न ये मनीं ।
वाटे पुजावा चक्रपाणीं । एवं व्युत्थानीं स्मरती गोविंदू ॥१९४॥
करिताति उत्तम अन्न । नैवेद्य दाखववावया कारण ।
जेवण जेविती प्रसाद म्हणून । एवं जेविता स्मरण हरीचे ॥१९५॥
केवळ योगिया भोगसमयीं । समाधिस्मृतीही न ये कांहीं ।
तेचि भगवद्भक्त लवलाही । प्रति-विषयीं स्मरती हरी ॥१९६॥
म्हणोनि अधोभूमीवरीही असता । जरी पाहिजे एकाग्रता । (य१४-१५५)
तरी कोणत्याही मिषें भगवंता । स्मरावे हा सर्वथा उपायू ॥१९७॥
तेंचि एकाग्र झालिया मन । पुनः न परतावे म्हणोन ।
करावें हरीचें सगुण ध्यान । देहभिन्न होउनी ॥१९८॥



हृदयांत हरीचें ध्यान करितां । सहज आपणा देहभिन्नता ।
जैसा गृहांत पाहुणा जेवविता । तरी गृहभिन्नता आपणासी ॥१९९॥
आतां ते कवणेंरीतीं ध्यान । कैसे अंगप्रत्यंगचिंतन ।
तेंचि श्रीकरुणानिधान । शुक आपण बोलतु ॥२००॥

॥ श्लोक ९ ॥

प्रसन्नवक्त्रं नलिनायतेक्षणं कदंब-किञ्जल्क-पिशंग-वाससम्।
लसन्महारत्न-हिरण्मयाङ्गदं स्फुरन्महारत्नकिरीटकुण्डलम् ॥

(भाग.२-२-श्लो.९)

॥ ओव्या ॥

वस्तू ठेवावयाकारणे । आकाशाशी मठाकाश होणें ।
तैसे प्रारब्धविषय अर्पावयाकारणे । सगुण होणें भगवंता ॥२०१॥

॥ श्रुती ॥

'अपाणिपादो जवनो गृहीता पश्यत्यचक्षुः स श्रुणोत्यकर्णः' इति श्रुतिः ॥
''म्हणोनिया विश्वतश्चक्षु । हा अचक्षूच्या ठायीं पक्षू ।
बोलावया दक्षू । जाहला वेदू' ॥'' ज्ञानेश्वरी.

श्लोक

'सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति' ॥ गीता अ१३ श्लो१३
(य१४-१५६)

ओव्या - प्रारब्धें जें मिळे अन्न । तें जेविता मिळे भोक्तृपण ।
तेंचि भगवंतीं करिता अर्पण । फुटे वदन निर्गुणांते ॥२०२॥
कृष्णार्पण करिताक्षणीं । प्रतिगृह्णामि म्हणावयालागोनी ।
तो निर्विकार कैवल्यदानी । चतुःपाणी जाहला ॥२०३॥
म्हणोनी आपण होवोनी निर्गुण । आवडीकरोनी भजावें सगुण ।
जैसी नदी समुद्र होऊन । आपुलें नदीपण सांडीना ॥२०४॥
तेंवी न यावा ज्ञानाभिमान । यालागी भजावा सावयव कृष्ण ।
तेंचि अंगप्रत्यंग ध्यान । श्रोते सावधान परिसोत ॥२०७॥
कां शत शत गुणानंदसीमा । जेथे करणे पडे निगमा ।

**तेचि वंदनीं उघडी गरिमा । प्रसन्न प्रतिमा म्हणोनी ॥२०६॥**

॥ अभंग ॥

**कमललोचन करुणासंपन्न । करिती मोचन दीनार्तीचें ॥१॥**
**पीतपटधारी रत्नमयांगद । सज्ञनसंगद स्वानुग्रहे ॥२॥**
**किरीटकुंडले महासनयुक्त । ऐसा ह्रदयांत व्यक्त दिसे ॥३॥**
**ज्ञानेश्वरतात कळवळोनिया । जाहला गुणीं या निर्विकारू ॥४॥**

## ॥ श्लोक १० ॥

उन्निद्रहृत्पंजकर्णिकालये योगेश्वरास्थापितपादपल्लवम् ।
श्रीलक्ष्मणं कौस्तुभरत्नकंधरमम्लानलक्ष्म्या
वनमालयाऽऽचितम् ॥

(भागवत २-२-१०)

ओव्या :-

**जे योगियाची ध्येय मूर्ति । निगम गाती अखंड कीर्ति ।**
**ती ह्रदयाकाशीं श्यामाकृति । उभी निश्चिती देखिजे ॥२०७॥**
(य१४-१५७) **ग्नारण-पैंजण-झणत्कारें । निद्रावृत्ति निःशेष विरे ।**
**यालागीं उन्निद्र ऐसे बा रे । मुळीं पद ओळखिजे ॥२०८॥**
**ह्रदयालागीं कमळ उपमा । हीही जयाची चरण महिमा ।**
**एरवीं मांसाचिया उगमा । कमल उपमा कासया ॥२०९॥**
**भवजलामाजी कवणिये समयीं । योगीह्रदय बुडत नाहीं ।**
**जयाचे चरण धरोनि ठायीं । बैसलें म्हणोनि ॥२१०॥**
**कां कमल इंदिरेचे घर । तेथ पाहुणा इंदिरावर ।**
**तया कमळींच आदर । जो जाहला आकार निराकारा ॥२११॥**
**श्रीचिन्ह आणि वत्सलांछन । कंठीं कौस्तुभ वनमाला अम्लान ।**
**ऐसे ह्रदयीं धरितां भगवान । जाणावें बंधन निमालें ॥२१२॥**
**मेखला नूपुर कंकणें मुद्रिका । हे जयाचिये शोभा भूषण संज्ञका ।**
**म्हणजे सुवर्णादि जडादिका । आधार नाहीं चिन्मयावीण ॥२१३॥**
**शरीर परमात्मा चैतन्यघन । आघवें विश्व हें तयाचें भूषण ।**
**ऐसे दृढ व्हावया ध्यान । स्मरावें सगुण आवडी ॥२१४॥**



**कां चरणामृत शिवजटेंत गेले । तदपेक्षया कृष्णकेशा सापत्न्य आलें ।**
**म्हणोनि अधरामृत घ्यावया धांवले । हास्यमुखा देखुनी ॥२१५॥**
**माझें न मोडोनि निर्विकारपण । भक्तीं मज दिधलें सर्वस्वदान ।**
**हेंचि एक मनीं धरून । हास्यवदन दिसतु ॥२१६॥**
**कीं मी सर्वज्ञ सर्वाठायीं । त्या माझे पुढील वर्तमान पाहीं ।**
**वाल्मिकीसमान जाणोन ह्रदयीं । आधींच ठेविती लिहूनी ॥२१७॥**
**मजही वर्तणें लागे तैसें । हेंचि नवल वाटोनि हांसे ।**
**कीं आणिक गुह्य कारण असे । हांसावया देवाते ॥२१८॥**
**मज जैसे जे भजती । त्यांचिया ह्रदयीं तेवीं ममाकृति ।**
**ऐसें असोनि देव न भेटती । हें आश्चर्य वाटोनि हांसतु ॥२१९॥**
**तरूतें छायेचा उपयोग नाहीं । परी श्रांतातें निववितें पाहीं ।**
**नदीतें आपुला उपयोग नाहीं । परी जीववीत तृषितांतें ॥२२०॥**
**जीवन वर्षोनियां घन । औषधि पोसावया कारण कवण ।**
**आघवें जयाचें उदारपण । लीला निदान सकलाते ॥२२१॥** (य१४-१५८)
**तया आप्तकामाचिया ठायीं । प्रयोजनाची कल्पना नाहीं ।**
**प्रणतप्रतिपाल लवलाहीं । लीला-नवाई जयाची ॥२२२॥**
**जयाचिया अंपागपातें । वाटे विश्व स्वानंदीं नाहतें ।**
**ऐसिया परमेश्वरातें । ह्रदयीं निश्चितें पहावे ॥२२३॥**
**अति सुलभ नारायण । एक चित्तचि एथ साधन ।**
**किंवा चित्तहि सोडोनि आपुलेपण । पाहता निर्वाण तेंचि तें ॥२२४॥**
**एथ साधनांचा उपयोग पाहीं । वस्तु मिळवावया नाहीं ।**
**अवस्तुभावना लवलाहीं । दूर करावी साधनें ॥२२५॥**
**आहे तोचि नारायण । रक्षावा ह्रदयामाजीं धरोन ।**
**एवढेंचि सांगे साधन । मिळविणें जाण अनर्थू ॥२२६॥**

## ॥ श्लोक १३ ॥

एकैकशोऽङ्गानि धियानुभावयेत्पादादि यावद्धसितं गदाभृतः
जितं जितं ज्ञानमपोह्य धारयेत्परं परं शुद्ध्यति धीर्यथा यथा

(भाग. २-२-१३)

सगुण रूपाची ध्यान-धारणा (प्रक्रिया)

**एवं विजातीय वृत्ति । निःशेष जेव्हां निघोनि जाती ।**
**तोंवरी कल्पावी मूर्ति । श्रीहरीची ॥२२७॥**
**परी कल्पितांक्षणीं । आपण साक्षी जावें होवोनि ।**
**म्हणजे ती कल्पना भूषण होवोनी । चेतना लागुनी व्यक्त करी ॥२२८॥**
**आपण साक्षी झालिया जाण । कल्पनेचें जे इदंपण ।**
**तेथ अभिव्यक्त होय जें चेतन । ते सगुणध्यान ओळखें ॥२२९॥**
**एवं कल्पनाजरायुवेष्ठित । शरीर प्रगटे अनध्यस्तविवर्त ।**
**ध्यानजरायु फिटत । मग प्रत्यक्ष प्रगटत हृदयकमळीं ॥२३०॥**
**ऐसी धारणा झालिया स्थिर । मग ध्यानीं लावावे अंतर ।**
**एक एक अवयव निर्धार । धरावा धि. ............. ॥२३१॥**
**प्रथम ध्यावे भगव्दारण । तयाचें हेंचि कारण ।** (य१४-१५९)
**कीं चरणीं लोळलियाविण । दीनता जाण न सांपडे ॥२३२ ॥**
**जया चरणतळीची रक्तिमा । जाहाली आकाशीं अरुणिमा ।**
**येणेचि होय अनुमिति प्रमा । कीं व्यापक असती श्रीचरण ॥२३३॥**
**आकाश भरी उदयें अरुण । अरुणासमान आरक्त चरण ।**
**म्हणोनि चरणा व्यापकपण । हें अन्यथा बोलणें न म्हणावे ॥२३४॥**
**येथ हेत्वाभास म्हणाल जरी । बोलणें मिथ्या होय तें तरी ।**
**कीं उपमान अरुणिमा निर्धारीं । उपमेय झाले चरण ॥२३५॥**
**तया श्रीचरणाचिया स्थानीं । उपमिति होतांचि क्षणीं ।**
**प्रभात्वजाति निर्वाणी । राहिली तेथ ॥२३६॥**
**प्रभात्व-जाति भगव्दारणीं । जातिस्वभाव व्यापकपणीं ।**
**व्यापक आश्रय निर्वाणीं । अव्यापक होऊं न शके ॥२३७॥**
**तरी तया अलंकारा । हेत्वाभासचि सुखकरा ।**
**नेवो शके म्हणोनि परा । व्यापकपणा आलें ॥२३८॥**
**तेथ अंगुलिया सरळ । जे सुखाचे मार्ग केवळ ।**
**पाहताचि सुढाळ । आटती दुःखें ॥२३९॥**
**बोटीं नक्षत्र बैसलें येऊन । यास्तव नभसंज्ञा पावले गगन ।**





**नक्षत्रें जाहली आकाश-विहीन । म्हणोनि नखातें 'न-ख' संज्ञा ॥२४०॥**

(ख = आकाश)

**सगुणब्रह्म हृदयारविंदीं । यदाविष्टमन मोक्षासी निंदी ।**
**यया ब्रह्म म्हणावयाची बुद्धि । भ्रमाधिष्ठ म्हणोनि ॥२४१॥**
**जे जें भ्रमातें अधिष्ठान । तया तयातें ब्रह्मपण ।**
**परी विजातीया भ्रम अधिष्ठान । ...............॥२४२ ॥**
**तोचि सजातींय भ्रम कैसा । श्रीपति जाणा आपैसा ।**
**तेणेहि सगुण ब्रह्मठसा । ठसावें हृदयी ॥२४३॥**
**पदनखामाजी आपुली मूर्ति । प्रतिबिम्बली दशधा दिसती ।**
**यालागी पाहता निश्चिती । 'कवण कृष्ण' हें न कळे ॥२४४॥**
**एवं सजातीय भ्रांति । तयाची अधिष्ठान एकादशवी मूर्ति ।**
**यालागी सगुणब्रह्म मूर्ति । येथ हेत्वाभास श्रोतीं न कल्पावा ॥२४५॥**
**कीं एकादश मूर्ति हृदयीं । दशनखी ज्या बिम्बल्या पाही ।**
**त्या दश इंद्रियद्वारीं बैसोनि लवलाही । विषय हृदयीं येऊं न देती ॥२४६॥**
(य१४-१६०) **विषयसंस्पर्शाचा वारा । झणीं लागेल माझिया सुकुमारा ।**
**म्हणोनिया दशही द्वारा । दशबिम्बमूर्ति निरोधिती ॥२४७॥**
**एवं जिंकिलिया चरणकमळ । ज्ञानाभिमान तुटे सकळ ।**
**'तस्यैवाहं' भक्ति केवळ । एथचि होय ॥२४८॥**
**आतां 'ममैवासौ' भक्ति । करावया निश्चिती ।**
**हळू हळू अवयवांतरीं मति । चढती वाढती असों दे ॥२४९॥**
**कां जिंकिलियावीण चरण । निरोधेल भगवद्गमन ।**
**आणि सेवे चंचल सहाय आपण । इंदिरा एक ॥२५०॥**
**यालागीं तो हृदयींच राहावा । आणिक कोठेंहि न जावा ।**
**म्हणोनि प्रणयरशनया बांधावा । चरणचि धरूनी ॥२५१॥**
**जया चरणाचिया साठीं । निजगर्व सांडोनि शेवटीं ।**
**नित्य दास्याचिया पटीं । बैसली रमा ॥२५२॥**
**जयाचे ध्यान धरोनि मनीं । स्मशानीं बैसला शूलपाणी ।**
**ते कारुण्य कोमल खाणी । अंतःकरणीं चरण ध्यावे ॥२५३॥**

मग पदतल चोहाटा । लेववावी आपुली उत्कंठा ।
जेणें सौकुमार्य प्रगटा । पावोनि राहे ॥२५४॥
कठिणपणाचे आवरण । त्यांत झांकलें श्रीचरण ।
तें काठिण्य निराकरण । होय उत्कंठावृत्तीनें ॥२५५॥
तेचि उत्कंठा कवणे रीति । वाढवावी आपुल्या चित्तीं ।
तें सावध ऐके परीक्षिति । श्री शुकमूर्ति बोलतु ॥२५६॥
नाचणें गाणें नामग्रहण । खेळणें वाजविणें आलिंगन ।
मार्दवपरिचयावीण । वाहूनि आण समूळ मिथ्या ॥२५७॥
उदरीं वस्त्र बांधोनि । दाखवावया वंध्या गर्भिणी ।
तथापि पान्हा फुटेना स्तनीं । बाळांतिणी जाहल्यावीण ॥२५८॥
तेवीं भाव ओळखिल्यावाचोनि । आघवी सोंगसंपादणी ।
तेथे नाहीं शार्ङ्गपाणि । बोलिले वाणी तुकाराम ॥२५९॥ (य१४-१६१)

॥ तुकारामांचा अभंग ॥

''लावोनियां मुद्रा बांधोनिया कंठीं । हिंडे पोटासाठी दाही दिशा ॥
शुभ्रवर्ण चांग नेसोनी कौपीन । पहातो मिष्टान्न भक्षावया ॥
तुका म्हणे ऐसे मायेचे मइंद । त्यापासी गोविंद नाहीं नाहीं'' ॥३॥

॥ ओव्या ॥

भक्ति करावी वाटे यास्तव । तेणे ओळखावे भाव ।
त्यांत चरणध्यानीं सावेव । उत्कंठाभाव सुखदाता ॥२६०॥
ऐसें इच्छिले पाहिजे मनीं । की या सुंदर चरणाहूनि ।
कोटी कंदर्प ओवाळुनी । परी निर्वाणी सांडावे ॥२६१॥
वीणा घेवोनि नारद फिरतां । तयाच्या मागें पुढें चालतां ।
शिणले असतील चरण तत्वतां । ते मी एकट आतां सेवीन ॥२६२॥
कैकयीने धाडिलें वनीं । तेव्हां खडे कंटक रुतले चरणीं ।
ते श्रम या कोमळ करेंकरूनी । आतांचि सेवुनी परिहरीन ॥२६३॥
मज पाहता कैकयीहून । माय यशोदा अतिनिर्घृण ।
एकटाचि मनमोहन । वनीं धाडिला गाई मागे ॥२६४॥
कैकयीने पाठवितां वनीं । तेव्हां जवळी होती जनकनंदिनी ।



तिनें न मानोनि दिवसरजनी । प्रभुपादश्रम परिहरिले ॥२६५॥
एथें सेवावया नसोनि कोणी । यशोदेने धाडिले वनीं ।
ते श्रम मी आज म्हणोनि । चरण सेवोनि परिहरीन ॥२६६॥
लक्ष्मी आणि धरणी । दोघी असोनि कामिनी ।
चरण सेवावया निर्वाणीं । उपयोगी कोणी पडेना ॥२६७॥
धरणी तंव स्वभाव कठिण । तिनें सेवितां सुकुमार चरण ।
श्रमेल माझा करुणाघन । यालागीं तिचें हें कार्य नव्हे ॥२६८॥
लक्ष्मीचा स्वभाव चंचल । ती सोडील पळ पळ ।
याविषयीं अनुभव केवळ । मागीलचि असे ॥२६९॥ (य१४-१६२)
रघुनाथ निघता वनीं । लक्ष्मी पाय सेवी सीता होउनी ।
आणि श्री कृष्णनाथ जाता वनीं । तरी पादसेवार्थ दिसेना ॥२७०॥
एकावतारीं पादसेवित । दुजिया अवतारीं जाहली निश्चिंत ।
यालागी चरणसेवा विख्यात । तिजवरी समस्त टाकूं नये ॥२७१॥
पुंडरिकाच्यासाठीं । विटेवरी उभा जगजेठी ।
तेथहि रुक्मिणी गोरटी । आपण बैसत एकीकडे ॥२७२॥
प्रत्यक्ष पाहतां पंढरी । विठ्ठल रुक्मिणी दोन मंदिरीं ।
हे सुकुमार चरण विटेवरीं । त्याची चिंता तिज नाहीं ॥२७३॥
देव दयाळू म्हणोन । उभा राहिला सांभाळाया वचन ।
तयाचे श्रम नेणोन । पुंडरिकही संमति दे ॥२७४॥
एथ ब्रह्मज्ञान मिरवोनि कोणी । म्हणेल श्रमू न शके चक्रपाणि ।
तरी हे सत्य तथापि वाणी । भक्तिविघातक हें ॥२७५॥
भगवत्श्रमाचे हेंचि लक्षण । कीं बाळ खेळतां जाण ।
त्यासी श्रम न वाटताही पूर्ण । माउली मानी श्रमला सुत ॥२७६॥
बाळ बोबडे बोले जे क्षणीं । तैं दृष्टि उतरी आपण जननी ।
दृष्टि झाली कीं नाहीं मजलागुनी । हे बाळाचे स्थानीं कल्पना नसे ॥२७७॥
तेवीं चरणसामर्थ्यही जाणोनि । हें अघटित कार्य पाहुनी ।
माझा गोजिरवाणा कैवल्यदानी । श्रमला असेल हे मनीं भावी ॥२७८॥
त्रिविध तापें पोळला । षडरी पाहोनि घाबरला ।

म्हणवोनि आश्रय घेतला । जया चरणांचा ॥२७९॥
तेचि चरण श्रमले म्हणून । भवसमुद्रीं आपुलें हृदय आपण ।
नौका करोनि वरी ते श्रीचरण । स्थापूं इच्छी ॥२८०॥
ना तरी मागिलिया भक्तीं । जे जे श्रम दिधले प्रभुप्रति ।
ते अवघेचि सेवा रीती । परिहरीन हें चित्तीं वांछी ॥२८१॥
नवल त्या भावांचे विंदान । जे भक्तीचे प्रसिद्ध उपाय पूर्ण ।
तेही अपाय वाटती जाण । प्रेमाविष्ट मन होतां ॥२८२॥
ऐसीचि एकादी उठे वृत्ति । कीं मी कीर्तन करितां बहुप्रीती ।
मजपुढें नाचेल जगत्पति । तेणेंचि श्रमती झणीं चरण ॥२८३॥(य१४-१६३)
कीर्तन करितां आवडीकरून । जवळी राहे नारायण ।
ऐसें संत बोलिले वचन । म्हणोनि कीर्तनासीही बिहे ॥२८४॥

॥ अभंग - तुकारामांचा ॥

''निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ॥१॥
उभा राहोनियां मुखें नाम वदे । नाचे नाना छंदे पांडुरंग ॥२॥
मार्गाने चालतां नाम वदे वाणी । उभा चक्रपाणि मागे पुढे ॥३॥
तुका म्हणे त्याला कीर्तनाची गोडी । वेगें घाली उडी नामासाठी'' ॥४॥

॥ ओव्या ॥

एवं तुकारामवचन । पाळोनि तरी मनमोहन ।
श्रमेल मी करितां कीर्तन । म्हणोनि लाजोनि उभा राहे ॥२८५॥
''तरी ऐसिया हो ध्वनी । झणीं थारा देशील मनीं ।
पैं नित्य सेविला मी निदानीं । सेवकु होय'' ॥ (ज्ञानेश्वरी) ॥
एवं तातांचेही वचन । म्हणोनि मी जरी करीन नामस्मरण ।
तरी शेवटी प्रभू सेवक होऊन । श्रम करील मजसाठीं ॥२८६॥
ऐसीच एकादे वेळीं वृत्ति । उठोनियां सप्रीति ।
ओठीं नाम येतांही निश्चिती । चित्तीचे चित्तीं जिरे प्रेमें ॥२८७॥
जरी मी करीन ध्यान । लक्ष्मी जवळी असता मनमोहन ।
सत्वर धांवेल सुख सोडोन । म्हणोनि ध्यानासही लाजे ॥२८८॥
एवं ध्यानाचीही ऐसी स्थिति । तेथ कवण पुसे प्राणायामादि योगाप्रति ।





प्रेमाश्रु येतां नेत्रांप्रति । एखादी वृत्ति उठता रोधी ॥२८९॥
माझिया विरहालापेंकरूनी । मजजवळी राहील चक्रपाणी ।
झणीं त्याच्या अंतःकरणीं । अन्य कामिनी आवडत असल्या ॥२९०॥
(य१४-१६४) तरी तयांते सोडोन । माझे करावया समाधान ।
मजजवळी राहतां मनमोहन । श्रम संपूर्ण होतील तया ॥२९१॥
येणे सात्त्विक भावही येत । मग तया स्थिती कैसी होत ।
जें गुणसाक्षी असोनि गुणाश्रय भगवंत । गुणींच मिळवीत गुणालिंगनें ॥२९२॥
हा भाव ये न ये जेव्हां । तंव ऐशाही उठती हावा ।
मी काय तपस्थ जाहले देवा । कवणें असेल सेवा केली ॥२९३॥
लक्ष्मी चंचल गरुड सपक्ष । स्मशानीं बैसला विरूपाक्ष ।
नारद तंव एकत्र प्रत्यक्ष । कदा न राहे ॥२९४॥
ऐसेंचि मानोन साश्रुपूर्ण । निहाळी कोठें भगव्वारण ।
त्या अश्रु चरणावरी पडोन । गंगौघ होऊनी तारिती जना ॥२९५॥
एवं उत्कंठेची अवधि । अनुभवा येईल दृढ सिद्धी ।
तोवरी चरणध्यान दृढबुद्धि । करीत जावें सदैव ॥२९६॥
जरी ध्यानीं सांगितले अवयव सकळ । तरी ते उपासकार्थ केवळ ।
भक्तासी नखमात्रही प्रबळ । स्वानंददाते ॥२९७॥
कुंकू लावोनि पाणिग्रहण । इत्यादि कुमारीसीचि विधि पूर्ण ।
विरहिणी तव वस्त्रही पाहोन । येवोनि स्मरण प्रेमवश होय ॥२९८॥
एवं चरणध्यान समुत्कंठ । वर्णितां रसा फुटले पाट ।
म्हणोनिच मौन ब्रह्मासी स्पष्ट । बोलता आले शुकपण ॥२९९॥
आतां तेंचि प्रत्यवयव ध्यान । उपासनावाच्य भक्ता व्यंग्यसमाधान ।
परिसोत पंडित सज्ञन । जे व्यासनंदन स्वयें वर्णी ॥३००॥
व्यासें वेदाचे विभाग केले । बहु फळें बहु वृक्षा लाविलें ।
परी शुकें तें समस्त चाखिले । मग उच्छिष्ट दिधलें परीक्षिता ॥३०१॥
तेथ बैसावया पंक्ती । तुम्ही आम्ही बैसावे समस्ती ।
ज्ञानेश्वरकृपा होय वाढती । निःशंक चित्तीं जेवावें ॥३०२॥
कां स्वपितृभोगाचें पाप मोठें । ऐसे सरस्वतीतें वाटे ।

मग प्रायश्चित्त घ्यावया नेटें । मम जिव्हाग्री बैसली ॥३०३॥
आतां वर्णोनि कृष्णगुणा । निःशेष क्षाळील पापपणा । (य१४-१६५)
मग ज्ञप्तिमात्र सद्‌गुणा । व्यापकपणा लाहील ॥३०४॥
यालागीं माझी भारती । मियां नमिली पुढतपुढती ।
माये लाज सोडोनि यदुपति । अनंतशक्ति वर्णावा ॥३०५॥

ज्ञानी व भक्त

एवं उत्कंठा वाढतां पोटीं । प्रेमरूप भासे सृष्टि ।
भूतें न दिसती सान मोठीं । व्यापिला जगजेठी चहूंकडे ॥३०६॥
नवल या व्यापकतेची गोष्टी । जे सकल विश्वा पाठींपोटीं ।
ज्ञानिया कळे उठाउठीं । तें करसंपुटीं चढे प्रेमें ॥३०७॥
सूर्य सकळांते दिसत । आकाश वसे सकळा आंत ।
परी उपेक्षिती जन समस्त । कार्यासक्त होवोनी ॥३०८॥
तेवीं ज्ञानियांचें व्यापकपण । मीचि ब्रह्म झालो म्हणून ।
रसास्वाद घेवोनि विघ्न । अथवा उदासीन कषायें ॥३०९॥
विषयानंद टाकिला दूरी । ब्रह्मानंद नयेचि करीं ।
मी व्यापक या अहंकारीं । सर्वापरी गोविले ॥३१०॥
तैसे न होती भक्तजन । तयांचे विलक्षण व्यापकपण ।
हातीं लागलियाही भगवन्निधान । विरहिणीसमान वर्तती ॥३११॥
कां जळामाजीं राहती मीन । परी जळा न कंटाळती एक क्षण ।
तेवीं व्यापक ओळखोनि भगवान । विरहचिन्ह न सोडिती ॥३१२॥
येचि विषयीं श्रोतेजन । ऐका हितहरिवंशवचन ।
परमती तथापि अमृत म्हणोन । घेता प्रमाण लाज न ये ॥३१३॥

॥ श्लोक ॥

अंतःस्थितेऽपि दयिते कमपि प्रलापम् ।
हा मोहनेति मधुरं विदधात्यकस्मात् ।
श्यामानुरागमदविव्हलमोहनांगी ।
श्यामा मणिर्जयति क्वाऽपि निकुंजसीम्नि ॥१॥

(राधासुधानिधीं : हितहरिवंश)



(य१४-१६६) कां जवळी असोनि आपला प्राण । मरणा भिती अवघे जन ।
मियां वांचावें म्हणोन । बोलती आशीर्वचन आपणा ॥३१४॥
तेवीं जवळीं असता मनमोहन । राधा करितां कृष्णध्यान ।
कृष्णरूप होतां आपण । पुढें यदुनंदन दिसेना ॥३१५॥
ध्यातृध्येय होतां एक । हरपला वाटे जगन्नायक ।
म्हणोनि ‘हा मोहन’ इत्यादि निष्कलंक । प्रीत्यालापें विलापी ॥३१६॥
ना तरी भोजनपरिणाम तृप्ति । तेचि तृष्णा वाढवी पुढती ।
जरी भोजनें न होती तृप्ति । तरी न वाढती तृष्णा ॥३१७॥
तैसे ध्यातां जगज्जीवना । समाधिस्थान पावणें मना ।
तो समाधी वाढवी तृष्णा । कोठे कृष्णा म्हणोनी ॥३१८॥
कीं आत्मा होतां परमात्मा आपण । मन साक्षिभास्यत्वे होय भिन्न ।
मग मनासि आत्मवियोग होऊन (वाटे म्हणून) । ‘हा मोहन’ म्हणे राधा ॥३१९॥
एवं श्यामानुरागविव्हल तनू । श्याम! श्याम! बाहे अनु अनु ।
तिया मातेचे चरणरेणु । शिरी धरू चला निकुंजीं ॥३२०॥
एवं राधासुधानिधींत । बोलिले हितहरिवंश समर्थ ।
आणि तैसेंचि प्रमाण पंडित । महाराष्ट्र भाषेंत बोलिले ॥३२१॥

॥ श्लोक ॥

प्रियोत्कंठता स्त्रीस जैसी वियोगीं । मला प्रीति ती दे हरी नित्य योगीं ॥
जशी भेटि अत्यंत काळें पतीची । सदा भक्ति ऐसी असो श्रीपतीची ॥१॥

(वामन पंडित )

एवं उत्कंठातिशयित मति । तीव्र जाहलिया निश्चिती ।
आत्मचैतन्य कृष्णमूर्ति । अनध्यस्तविवर्त देखे ॥३२२॥
तया आत्मचैतन्या भक्ति शरीर । तेथ पंचप्राणाचे अलंकार ।
लेवावया निर्धार एकएकावयव । ध्यान करी ॥३२३॥ (य१४-१६७)
प्रति अवयवाचें करितां ध्यान । आशंकितील श्रोतेजन ।
कीं एवढी उत्कंठाही असोन । कवण कारण उपासना ॥३२४॥
तरी ती नोहे उपास्ति । ऐसे वाटे भक्तचित्तीं ।
तया ध्यानाचिया पंक्ती । प्रेम निश्चिती रक्षितु ॥३२५॥

वरील अवयवांचें करितां ध्यान । चरणांचा विरह होय दारुण ।
चरणांचें एकटिया करिता ध्यान । तरी मुखादिकांचा विरह वाटे ॥३२६॥
एवं संयोगध्यानीं वियोगप्रीति । उपासनेंत महती भक्ति ।
म्हणोनि प्रति अवयव ध्याती । ध्यातांचि होती तन्मय ॥३२७॥
कां सूर्य रथीं बैसला । तरी पांगूळपणा नाहीं सुटला ।
म्हणोनि अरुण कंटाळीला । तो येवोनि बैसला तळवियावरी ॥३२८॥
तेणें तळवे जाहले आरक्त । कीं आणीकही हेत ।
ज्या माधुर्यभक्ति करिती यथार्थ । तयांचे मस्तककुंकुम तें ॥३२९॥
मस्तकें धरितां श्रीहरिचरण । सौभाग्य शोभें कुंकूपण ।
याचिलागी नारायण । आरक्त चरण धरीतसे ॥३३०॥
कीं डोळीयाचीं कृपादृष्टि । व्यभिचारू पावे शेवटी ।
प्रलयाचिये वेळी मोठी । क्रोधरूपता पावतु ॥३३१॥
तैसे न होती चरण आपण । सर्वथा दीनावरी सकरुण ।
याचिलागीं प्रेमजीवन । गंगा म्हणोन वाहतु ॥३३२॥
चंद्रें गुरुपत्नी भोगिली । मग निजतनु प्रयागीं कर्वतली ।
दशधा करून बैसविली । श्रीहरिचरणीं नखरूपें ॥३३३॥
इंद्रनीळाचे ईर्षित मन । कीं माझा कृष्णासमान वर्ण ।
परी इंद्रउपपद लावोन । मज जन बोलती वृथा ॥३३४॥
तरी आतां कृष्णनीळ । जेणें मज म्हणतील सकळ ।
तो उपाय करीन प्रबळ । म्हणोनि जाहला हरिगुल्फ ॥३३५॥
रंभेनें शुकमूर्ति छळिली । त्या पापें केळीवृक्ष जाहली ।
ती कृष्णपोटरिया होउनी उद्धरिली । अक्षय निवाली सर्वांगें ॥३३६॥
माधुर्य भक्ताचेअधिष्ठान । त्या श्रीहरिअंका वर्णील कवण ।
कंठीं ब्रह्मांडाचे धारण । जगद्रक्षण हरिबाहू ॥३३७॥ (य१४-१६८)
हृदयीं श्रीवत्सलांछन । धरावया हेंचि कारण ।
कीं प्राप्त जाहलें ईश्वरपण । तरी धरोनि अभिमान धर्म न सांडे ॥३३८॥
जें प्रणवाचे जन्मस्थान । जेंथोनि वेदवृक्षा जीवन ।
तें सुंदर सुख पाहता पूर्ण । करावे निंबलोण जीवांचे ॥३३९॥



सकळ अवयवा एक स्थिति । तें भगवच्छीर्ष ब्रह्माकृति ।
वरी मुकुटमणियांची ज्योति । कवण निश्चिती वर्णूं शके ॥३४०॥
दिव्य अदिव्य दिव्याऽदिव्य । ऐसे असे पुरुषत्रय ।
देवलोकीचें केवल दिव्य । अदिव्य मनुष्यलोकींचें ॥३४१॥
ईश्वर असोनि मनुष्यलोकीं । दिव्याऽदिव्य बोलिजे तें कीं ।
मंदारमरंदकार श्लोकीं । बोलिले निकी प्रक्रिया ॥३४२॥
शिखेपासोनि नखापर्यंत । दिव्य नायक वर्णावे समस्त ।
नखापासोनि शिखेपर्यंत । अदिव्यनायक वर्णिजे ॥३४३॥
दिव्यादिव्य दोहीं परी । वर्णावा हे महद्वैखरी ।
नखादिशिखांत वर्णिला जो हरी । तोचि शिखेपासोनि वर्णूं ॥३४४॥
चरणापासोनी शिखेंपर्यंत । हृदयीं ध्याता जगन्नाथ ।
चरणध्यानाची आवडी चित्त । शिखा पाहोनीही सोडीना ॥३४५॥
जैसे मायेचिया तोंडाकडे । बाळ पाहतांही रोकडे ।
अंतःकरण स्तनाकडे । दुग्धासाठीं ओढितू ॥३४६॥
तैसी निहाळीली श्रीहरिमूर्ती । परी चरणामृताची आवडी चित्तीं ।
म्हणोनि व्यापक करोनि आपुली वृत्ति । सांठविला श्रीपती अंतरीं ॥३४७॥
"जो आघवाचि करणी । लेईला शांतीची लेणीं ।
तयाचे चित्त गवसणी । व्यापका मज" ॥ ज्ञानेश्वरी ॥
ऐसे तात बोलिले आपण । तैसेचि करूनी अंतःकरण ।
विशेष तो चरणध्यान । कराया मन लुब्धले ॥३४८॥
केश कुरळी पाहोनी । ऐसेहि वाटे अंतःकरणीं ।
कीं पुढे अवलोकिता क्षणीं । सीमा संपेल मतीची ॥३४९॥
सर्वव्यापक नारायण । तयाची सीमा करितां जाण । (य१४-१६९)
प्रेमा येईल समर्यादपण । यालागीं उलटोनि चरण ध्याई ॥३४९॥
भाळीं कस्तुरीचा तिलक । ऐसे सुचवी जगन्नायक ।
की कोणेही योनींत भक्त असता देख । तयाची सेवा मज पावे ॥३५०॥
मृगयोनींत भक्तमणी । तन्मृगमद मम भालस्थानीं ।
पुढे बिकट भ्रुकुटिया कमानी । ज्या दीना पाहोनी लवल्याती ॥३५१॥

कर्णी कुंडले मकराकार । लेवोनि उद्धारीले स्थावर ।
नेत्रांची शोभा मनोहर । कृपापात्र जाण ती ॥३५२॥
श्रीकृष्णमूर्तीच प्रतिबिम्बली । तेचि डोळिया जाहली बाहुली ।
मग कृपादृष्टिपणे संचरली । गुप्त होउनि भक्तहृदयीं ॥३५३॥
नासिक सरळ सुंदर पूर्ण । सोहं शब्द करितां पवन ।
निःश्वासीं देव संपूर्ण । जन्मले जन ताराया ॥३५४॥
मुखें जन्मली जागृच्छ्रुति । म्हणोनि समन्वयीली पूर्वोक्ती ।
जया अधरामृताचिये पातीं । अक्षय बैसती गोपिका ॥३५५॥
पोटी जन्मला कामबाळ । म्हणोनी कारण जाहला घननीळ ।
कार्यचि जग मोहें सकळ । मग कारण मोहितां काय नवल ॥३५६॥
कार्यरूप कामाची शक्ती । मिथ्या विषय दावी सत्यप्रतीती ।
मग काय श्रीकृष्ण अधरामृतीं । का न मुक्ती तुच्छ वाटे ॥३५७॥
रत्नाचे तेज एकत्र झाले । ते हरिदंत अलंकारिले ।
जी अक्षय ना भी म्हणोनी बोले । ती जिव्हा माता कवण वर्णी ॥३५८॥
उपनिषद्रूप ब्रह्मज्ञान । श्वासीं जन्म व्हावया हेचि कारण ।
कीं जिव्हा न शिणवी वेदेंकरून । जी मधुर वचनें पाळी दासा ॥३५९॥
शोभा कंठींची अलौकिक । जी मुनीजनदृष्टी मणीआधारक ।
भक्त आलिंगिती हृदयसुख । तें वर्णिता देख अनिर्वाच्य ॥३६०॥
अबाधित अनिर्वाच्यपण । हेचि तया हृदयलक्षण ।
बाहुवटी बाहुभूषण । मुद्रिका कंकण आदिकरूनि ॥३६१॥
उदर त्रिवळी ललित सुरेख । जेथ सुखावले तीन्हीं लोक । (य१४-१७०)
कटीं पितांबर कसिला सुरेख । विद्यारूप तेजस्वी ॥३६२॥
प्रेमळ प्रियांचे अधिष्ठान । ते अंक सर्वसंपन्न ।
पोटरीया दाविती चिन्ह । आम्ही दीना आधार भिऊं नका ॥३६३॥
आतां जेथ भक्ताचा मेळा । तया चरणांचीया अगाध लीला ।
वाटे मनुष्ययोनी टाकोनी आम्ही बाळा । आधी घेऊं कीटयोनी ॥३६४॥
होवोनिया भ्रमरी । पंख लावोनि उडुं झडकरी ।
बैसोनि चरणकमलावरी । सेवूं अक्षय आमोद ॥३६५॥



उपासकांसी प्रत्यवयवध्यान । ते मुखहास्यांत जाती मिळून ।
मग पुढती येती भक्त होउन । विसावती हरिचरणीं ॥३६६॥
म्हणोनी तोंवरी करावी उपासना । जों आपुले चैतन्य नारायणा ।
माळ घालोनी आलिंगना । मिळो न शके परप्रेमें ॥३६७॥

॥ श्लोक १४ ॥

यावन्न जायेत परावरेऽस्मिन्विश्वेश्वरे द्रष्टरि भक्तियोगः ।
तावत्स्थवीयः पुरुषस्य रूपं क्रियावसाने प्रयतः स्मरेत ॥

(भाग.२-२-१४)

नित्य नैमित्तिके कर्म । चुकूं न द्यावा कदा नियम ।
पतिव्रतेचा हाचि धर्म । कीं दिवा गृहकर्म करावे ॥३६८॥
पतिचिया वीर्ये करोनि । त्रिभुवनाचि जाहली जननीं ।
तें जग पाळावें कर्मे करोनी । यज्ञादि अन्यीं देवतांदिका ॥३६९॥
मग कर्माचिया अवसानीं । पहुडलिया हृदयशयनीं ।
मुक्तिसुरतचिंतामणी । कांत अंतःकरणी कामिजे ॥३७०॥
तोवरी चुंबनालिंगन । जंव सुरतानंदी न विरे मन ।
तैसे तंवचीवरी उपासन । जंव चैतन्यघन भक्तिमय नोहे ॥३७१॥
आधीं प्रौढापुढे यौवना । म्हणोनि प्रथम बाळ पोषिले कर्मसंपन्ना ।
पुढें भक्तीं पावलीया निधाना । प्रियचरणाविना न वांछी अन्य ॥३७२॥
येचविषयीं तुकारामवचन । श्रोतिया घेउनि सांगू प्रमाण । ....॥३७३॥
(य१४-१७१)

॥ अभंग श्रीतुकारामांचा ॥

'सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ । तोडियेले जाळ मोहपाश ॥१॥
याचिसाठी सांडियेले भरतारा । रातलोया परापुरुषासी ॥२॥
तुका म्हणे आतां गर्भ नये धरू । औषधी जे करूं फळ नोहे' ॥३॥

ओव्या :-

प्रसुतान्त नायिका म्हणून । गर्जे साहित्यशास्त्र आपण ।
अखंड आलिंगावा मनमोहन । यालागीं विश्व व्यतिरेकिलें ॥३७४॥
ज्ञानें विश्वव्यतिरेक केला । पुढें विश्वपुत्रपणें अन्वयिला ।

आतां प्रौढाचि होऊनि बाला । व्यतिरेक केला भक्तिमुख्य ॥३७५॥
मग दृश्य इदंपण वारिलें । अहंपणही सहज निवाले ।
तेथ हृदयाचिये पुढति उरले । द्रष्टरि अनध्यस्तविवर्त सगुण ॥३७६॥
हाचि द्रष्ट्याचा भक्तियोगू । समाधीं व्युत्थानीं वियोगीं संयोगू ।
रहस्य उघडोनिया भक्तभवभंगू । म्हणे सांगू परिक्षिता ॥३७७॥
जो मूहूर्तमात्र कवणिये ठायीं । जगानुग्रह-इच्छेनें न राही ।
तो शुक कवणिया आशे लवलाही । हृदयपंजरीं कोंडिला राये ॥३७८॥
कीं वंशपरंपरा गीताज्ञान । अर्जुनातें देतां झाला श्रीकृष्ण ।
तें रक्षावया आपुलें वचन । आला शुक होऊन सांगावया ॥३७९॥
तो पुढें बोलेल कृपामूर्ती । तें सावध परिसावें श्रोती ।
येथ उणे पुरें नाहीं माझिया हातीं । सकळ जाणती ज्ञानेश्वर जननी ॥३८०॥
एवं ऐकितां शुकाची वाणी । परिक्षिती संकोचिती मनीं ।
तो अभिप्राय महामुनी । ओळखितां झाला तत्काळ ॥३८१॥ (य१४-१७२)
कां लेकराचि भूक । मायचि ओळखी निःशंक ।
तेंवी शिष्यांच्या उपाधी सकळीक । सद्‌गुरुनायक ओळखी ॥३८२॥
शिष्य-उपाधी ओळखून । मग सांगावें ब्रह्मज्ञान ।
हे सामार्थ्य नाहीं संपूर्ण । निःशेष आंगीं शास्त्रांच्या ॥३८३॥

अमृतानुभव -

''जयाचा दिठिवा वसंतू । जंव न रिघे निगमवनाआंतू ।
तव आपुलिया फळी हातूं । न घापती ही ॥२०॥'' (प्र.२)
ऐसे विश्वतारकपादवचन । कीं वेद असमर्थ सद्‌गुरुवीण ।
जैसा निधी गृहीं ठेविला संपूर्ण । तो दिपावांचोनी प्रकाशेना ॥३८४॥

ज्ञानेश्वरी –

''कां अन्न आणि भूक। पाशीं असतांही देख ।
जेवूं नेणें जरी बालक । लंघनचि तें'' ॥ (अ.१७ ओ.३५०)
तैसा वेदसंपन्न होय ठायी । परी तयातें मथोनियां पाही ।
आयतें बह्म शिष्यहृदयीं । सद्‌गुरुआई पहुडवी ॥३८५॥
गुरुवांचोनी शास्त्रपठन । ती घाणीयाची करकर जाण ।



वेदांवाचोनि सद्‌गुरुवचन । होय नागवण उघडी ती ॥३८६॥
शाखेवरी चंद्र न दिसतां । तरी अंगुळीवरी दाविती तत्वतां ।
परी चंद्रासी नाही नूतनता । सिद्धांत सर्वथा हा असे ॥३८७॥
तेंवी शिष्यांच्या उपाधी अनंत । म्हणोनी प्रक्रिया रचिती सद्‌गुरुनाथ ।
तथापि ब्रह्म पुरातनचि यथार्थ । जो बोलिला सिद्धांत वेदे बापें ॥३८८॥
वेदाब्धीचे गूढ क्षार पाणी । जेव्हां जाये सद्‌गुरुघनवदनीं ।
तेव्हां वृष्टी होय अधिकारीहृदयअवनीं । मग पिके निर्वाणीं ब्रह्मरसू ॥३८९॥
समुद्र नसतां मेघाप्रति । जळ न मिळेचि कवणीये रीती ।
आणि मेघ नसतां वृष्टि क्षितीं । न होयेचि सर्वथा ॥३९०॥
तेवी वेदांवाचोनीं गुरुपण व्यर्थ । सद्‌गुरुवांचोनी वेद असमर्थ ।
म्हणोनि गुरु-शास्त्र मिळोनियां निश्चित । होय कृतार्थ सच्छिष्य ॥३९१॥
दुग्धें भरले जननीस्तन । परि तें बाळाचे मुखीं घातल्याविण ।
कदापि क्षुधानिवारण । नाही हें जन जाणती ॥३९२॥ (य१४-१७३)
तेंवीं वेदाचियें ठायीं । ज्ञानामृताची उणिव नाही ।
परि श्रवणीं न घालितां सद्‌गुरुआई । नाना उपायीं कळेना ॥३९३॥
असो हें बोलणें बहुत । दृष्टांत देणें कवीचे मत ।
परिक्षितीतें शुक बोलत । वत्सा तूं संकोचित कां झाला ॥३९४॥
आम्ही केलें जें निरूपण । तें तुज वाटलें अति कठीण ।
हें कालावधीचे कार्य म्हणून । झालें तव मन साशंक ॥३९५॥
जवळी मरण आलियावरी । हा उपाय कोणी कैसा करी ।
ऐसी शंका तुझिये अंतरीं । ती निर्धारी निवटी पां ॥३९६॥
घालोनिया दृढ आसन । मनें नियमावा आपुला प्राण ।
बुद्धीनें नियमावें मन । बुद्धि क्षेत्रज्ञांत मिळवावी ॥३९७॥
क्षेत्रज्ञ मिळवावा शुद्धात । ते शुद्धचि मी आहे निश्चित ।
ऐसे ध्यान करोनि त्वरित । हा जडभाव समस्त सोडावा ॥३९८॥
ऐसे ऐकिताची वचन । अधिक संकोचला नृपनंदन ।
मग उभा ठाकला कर जोडून । दंडवत करून बोलतूं ॥३९९॥
म्हणे महाराज बोलिला जें कांहीं । त्यांत अन्यथा अल्पही नाही ।

परी हे अशक्ताचिया ठायीं । न घटो शके ॥४००॥
जया मरणाचिया शाब्दिक भिती । अपशकुन समुदाय नांदती क्षिती ॥
''शुभं ब्रूयात्'' इत्यादी श्रुती । प्रकट झाल्या मरणभयें ॥४०१॥
मरणाचिया भयेंकरून । ऐसें शास्त्र झाले निर्माण ।
कीं विंचू सर्व जीव असोन । मारितां त्याकारण दोष नाहीं ॥४०२॥
एवं हिंसाचि अहिंसा । वरिष्ठहि बोलिले सहसा ।
हा अवघाचि ठसा । मरणभयाचा ॥४०३॥
एवं जयाचे शब्दभय एवढें । तें प्रत्यक्ष पातलिया पुढें ।
आसन मांडोनिया घडे । प्राणायाम कोणाचेनी ॥४०४॥
कोणी करावा तो योगू । जें काळचि शोधी हृदय लागूं ।
ऐसा ऐकोनि वचनप्रसंगू । तो परम निःसंगू बोलत ॥४०५॥
म्हणे रे बाळा भयें करून । सर्वथा न चुकें मरण ।
जरी उपाय असतां चुकवावया कारण । तरी यथार्थ भिणें तें होतें ॥४०६॥
आणि जें भयेंकरुनि न चुके कहीं । तयाची भिती धरूनि कायी ।
मरण येवो न येवो लवलाही । शेषशायी आठवावा ॥४०७॥
आपले आधीचपासोन । ऐसे असो द्यावे अंतःकरण ।
कीं कोण्याही उपाये येतां मरण । राहील नारायण डोळ्यापुढें ॥४०८॥
मज सर्पेकरुनि आलिया मरण । माझा स्वामी करी शेषशयन ।
यालागीं तद्भक्त हातें मरण । मज दावील चरण श्रीहरीचे ॥४०९॥
अग्नींत जळोनि मरण येतां । अग्निमुखें आहुती घेती देवता ।
तो अग्नी मजही आपुलिया सत्ता । नेईल तत्वतां हरीकडे ॥४१०॥
एवं जो जो ताप होये मना । तेथ भावावे नारायणा ।
तो कदा नुपेक्षी सज्जना । ऐसिया वचना बोलती साधू ॥४११॥

॥ अभंग ॥

आलिया भोगासी असावे सादर । देवावरी भार घालुनिया ॥१॥
मग तो कृपासिंधू निवारी सांकडे । येर ते बापुडे काय रंक ॥२॥
भवाचिये पोटीं दुःखाचिया राशी । शरण देवासी जातां भले ॥३॥
तुका म्हणे नव्हे काय त्याकरितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥४॥



॥ओव्या ॥

यालागी असो नसो शक्ती । भगवंती असावी प्रीती ।
मग न करिताही निश्चिति । तो कृपामूर्ती रक्षील ॥४१२॥
सामान्य मित्र-योग जे होती । ते व्यवहारकालीं दूरी राहाती ।
रोग झालिया जवळी येती । शुश्रुषा करिती यथाशक्ती ॥४१३॥
परमात्मा तंव अनादि मित्र । तो संकटीं सोडिल, हे न घडे अणुमात्र ।
येथ साक्ष देतीं श्रुतिशास्त्र । नव्हे मम उत्तर पदरीचे ॥४१४॥ (य१४-१७५)
"तरी गा ऐसिया हो ध्वनी । झणीं थारा देसी गा मनीं ।
पै नित्य सेविला मी निदानीं । सेवक होय ॥१२३॥
पै रंक एक आडलेपणें । काकुळती धांव गा धांव म्हणें ।
तरी तयाचिये ग्लानी धांवणें । काय न घडे मज ॥१२८॥
आणि भक्ताही तेचि दशा । तरी भक्तीचा सोस कायसा ।
म्हणवूनि हा ध्वनी ऐसा । न वाखाणावा ॥१२९॥''
(ज्ञानेश्वरी अ. ८ श्लो. १४-१५)
म्हणोनि मरणाचिये वेळीं । तो सगुण स्मरावा वनमाळी ।
आणि तोचि मी अनुभवमेळीं । निर्गुणरूपी असावे ॥४१५॥
देहबुद्धीनें असावे दास । जीवबुद्धीनें असावें अंश ।
ब्रह्मदृष्टीनें असावे समरस । माधुर्यरस लक्षोनी ॥४१६॥
मग पुण्य तीर्थ उत्तरायण । हें आघवेचि गा अकारण ।
एक हृदयीं जगज्जीवन । धरीतां आन अपेक्षू नये ॥४१७॥
जया श्रीहरीचीया परोक्षवृत्ति । पाषाणा म्हणती विष्णुमूर्ती ।
तो नाथ अपरोक्ष धरितां चित्ती । मग कां बाह्यस्थिती अपेक्षावी ॥४१८॥
एरव्ही पाहतां आत्मदृष्टीं । मृगजलासारिखी मिथ्या सृष्टी ।
कां स्वप्नाचिया पोटीं । प्रकटले कोंभ ॥४१९॥
''मृगजळ जेथे नुमंडे । तेथे असे पां कोरडे ।
मा मंडे तेथ जोडे । ओल्हासू कायी ॥३४॥''
(अमृ.प्र.६)
स्वप्न जेव्हां पाहतो आपण । पर्वत वृक्ष पुष्प पर्ण ।

**ते स्वप्नकाळींच होती उत्पन्न । आपणही उपजतो स्वप्नकाळीं ॥४२०॥**
**परी ऐसें वाटे आपणांप्रती । की या पर्वतादिकांची निश्चिती ।**
**माझ्या पूर्वीच जाहली उत्पत्ती । अनादि कालापासूनि ॥४२१॥**
**स्वप्नीची आपुली माता । आपणचि होय उपजविता । परि माझ्या पूर्वी**
**जन्मली माता । ऐसी भ्रांति स्वप्नींचि होय ॥४२२॥ (य१४-१७६)**

॥ लावणी ॥

**पहिल्या पहारीं स्वप्न देखिलं अर्थ करा पंडिता हो ।**
**आधीं जन्मला बाळ मग जन्मली बाळाची माता ।**
**तिच्याच पोटीं भ्रतार जन्मला तोच तिचा पिता हो ।**
**आला बायकोचा बाप, त्यानें लेक केली अंतोरी ।**
**सासु भोगितां सून भोगिली बसून पारावरी ।**
**निद्रा घेतां जागृत झाले स्वप्नाच्या अवसरीं ।**
**चौ प्रहाराचे चार ऐसे स्वप्न देखिले भारी ॥१॥**
**दुसऱ्या पहारीं स्वप्न देखिल त्याहून तें आगळं ।**
**खाल्या बगाड वरते विहीर आंत पाणी डळमळं ।**
**झाडाच्या शेंड्याशीं केले आळ बुडख्याशीं आले फळ ।**
**त्या फळाचा विक्रा केला पहा त्या माळ्यानें ।**
**त्या माळ्यानें फळ भक्षिलें ढवळ्या बाजारीं ।**
**चौ प्रहाराचे चार ऐसे स्वप्न देखिले भारी ॥२॥**
**तिसऱ्या पाहारीं स्वप्न देखिले आली एक गाय ।**
**तोंडावाटे हागमूत करे गांडीनं चारा खाय ।**
**तिच्या पाठीवर एकच शिंग नवल सांगु काय ।**
**त्रिभुवनासी आधार देल्हा ते कैसी गाय ॥**
**चौ प्रहाराचे चार ऐसे स्वप्न देखिले भारी ॥३॥**
**चौथ्या पहारीं स्वप्न देखिल, एक गारुडी आला ।**
**बीन टाळ्याचा नाग केला खेळ मांडिला ।**
**दारूच्या बुधल्यांतून त्यान हिंगळ काढला ।**
**दिली पाण्याला अग्न त्यामध्ये कापूर विझविला ।**



**गोट्यावरतें पेरला आंबा त्याला आली एक सुपारी हो ।**
**रघोजी ब्राम्हण म्हणे सभेंत खुण सांगून द्या शास्त्ररीं ।**
**चौ प्रहाराचे चार ऐसे स्वप्न देखिले भारी ॥४॥**

अभंग - श्रीज्ञानेश्वर महाराजांचा –

**काट्याच्या अणीवर तीन गांव वसले । दोन उजाड एक वसेचना ॥१॥**
**वसेचना तेथ आले तीन कुंभार । दोन थोटे एक घडवेचना ॥२॥**
**घडवेचना त्याने घडविलें तीन मडकें । दोन हिरवे एक भाजेचना ॥३॥**
**भाजेचना त्यामध्यें रांधले तीन मूग । दोन क्गो एक शिजेचना ॥४॥**
**शिजेचना तेथे आले तीन पाहुणें । दोन रुसले एक जेवेचना ॥५॥**
**जेवेचना त्याला मारल्या तीन लातां । दोन हुकल्या एक लागेचना ॥६॥**
**लागेचना त्यानें आणल्या तीन म्हशी । दोन वांझा एक फळेचना ॥७॥**
**फळेचना तिला झाली तीन हेले । दोन मेले एक वांचेचना ॥८॥**
**वांचेचना तेथे आले तीन पारखी । दोन मुके एक बोलेचना ॥९॥**
**बोलेचना त्याने दिले तीन पैसे । दोन खोटे एक चालेचना ॥१०॥**
**ज्ञानदेव म्हणे गुरुघरच्या खुणा । गुरुवीण अर्थही कळेचिना ॥११॥**

ओव्या

**या आघवियाचा अर्थ पाही । ब्रह्मासी विश्वाचा संस्पर्श नाहीं ।**
**लहान मोठे स्वप्नीच्या गृहीं । भासती लवलाही निश्चये ॥४२३॥**
**स्वप्नांतील दिवस रात्र काळ । स्वप्न उपजताचि उपजे केवळ ।**
**स्वप्न नाशतां नाशे सकळ । उरे सोज्वळ निजरूप ॥४२४॥**
**तेंवी परमात्म्यासी कहीं । कल्पितकाळ स्पर्शिला नाही ।**
**तेथ दक्षिणायन उत्तरायणाचीं ग्वाही । बोलणें पाही अति मिथ्या ॥४२५॥**
**दृढचित्त असेल जिकडे । ते नेईल बा तिकडे ।**
**तेथ उत्तरायणादिकांचे कोरडे । साह्यचि नको ॥४२६॥**
**दक्षिणायनांतही उपासक मेलिया । ब्रह्मलोक न चुके तया ।**
**हें ब्रह्मसूत्रीं शांकरभाष्यीं पाहाया । मिळेल प्राज्ञातें ॥४२७॥**
**दक्षिणायनीं मेलिया जाण । पुनः येतसे परतोन ।**
**हें जें जागृत् श्रुतीचें वचन । तें स्मार्तकर्मफलदर्शक ॥४२८॥**

किंवा उपासनेवरी प्रेम नसतां । नुसतेचि जे ध्यान करिती तत्वता ।
तयासि उत्तरायणावांचोनी सर्वथा । गती नाहीं हा सिद्धांतू ॥४२९॥
अग्निबळ असलीयावीण । कदा न राहे स्वच्छ स्मरण । (य१४-१७८)
स्वच्छ नसतां ध्येयस्मरण । इष्टस्थान प्राप्त नोहे ॥४३०॥
जैसे न ओढितां माळेचे मणी । जपाची आठवण न राहे मनीं ।
अधिक उणा जप होतांची क्षणीं । अनर्थ काहणी चुकेना ॥४३१॥
तेवीं मरणाचे वेळीं आठवण । नसता न चुके पुनरागमन ।
हा उपासकासीच नियम पूर्ण । भक्तासी भगवान रक्षी सदा ॥४३२॥
कामुकांचा प्रेम कामिनीपाठीं । ते स्वप्नीं ओसणती तिच्याचि साठीं ।
तैसा प्रेमीं गोविता जगजेठी । मग अकस्मात संकष्टीं तोचि स्मरें ॥४३३॥
संवय जी लागली मनां । वरी प्रेमें गोविला यादवराणा ।
म्हणोनी दक्षिणायन उत्तरायणा । पावणें नलगे हरिभक्ता ॥४३४॥
एवं ज्ञानदृष्टीं काळची नाहीं । भक्तिदृष्ट्या समर्थ शेषशायी ।
यालागीं भगवद्योग दृढ धरोनि लवलाही । आणिक अपेक्षा त्यजावी ॥४३५॥
एरव्ही योगियातें जाण । सिद्धासन अथवा पद्मासन ।
दृढ घालोनियां प्राण । न्यावे लागती ब्रह्मरंध्री ॥४३६॥
या शरीराचा त्याग करितां । प्राणायाम करोनि तत्वतां ।
ब्रह्मरंध्री अक्षय चित्ता । ठेवणे लागे योगिया ॥४३७॥
तैसे न होती भगवद्भक्त । ते जेव्हां आठविती भगवंत ।
तेव्हांचि होती शरीरातीत । जन्ममरणार्थ तेथ मिथ्या ॥४३८॥
अहो ! जन्म जेव्हां घेयावा । तेव्हां मृत्यूच्या इच्छेनें ब्रह्मांडीं प्राण न्यावा ।
तो जन्मचि मिथ्या जेव्हां । ते मरण स्वभावा इच्छी कोण ॥४३९॥
बागुलाचे भय बाळाचें पोटीं । तो मेला म्हणतांची हांसोनि उठी ।
परी जाणतियाचे दृष्टीं । तो बागुल नाहीं मग मरण कोणा? ॥४४०॥
''बागुलाचेनि मरणें । तोषावें की बाळपणें ।
येरा तो नाहींच, मा कोणें । मृत्यु मानावा'' ॥१३॥
( अमृ.प्र.३)
एवं ताताचें वचन । यालागी जन्मचि मिथ्या पूर्ण । (य१४-१७९)



मग उगेचि कां इच्छावे मरण । कां न्यावा प्राण ब्रह्मरंध्री ॥४४१॥
गोविंद गोपाळ रुक्मिणीवर । मृगांकमस्तक पिनाकधर ।
हीं नांवे असतां जिव्हेवर । जनन मरण अति मिथ्या ॥४४२॥
मन जाईल ज्या ज्या देशीं । प्राणही तेथ जाय निश्चयेसी ।
हे अमनस्कखंडांत पार्वतीसी । कैलासवासी बोलिले ॥४४३॥

श्लोक

''मनो विलीयते यत्र प्राणस्तत्र विलीयते ।
प्राणो विलीयते यत्र मनस्तत्र विलीयते'' ॥
( अमनस्कखंड)

ओव्या :- जेथ प्राण पावे लय । मनही तेथ जाय स्वयें ।
आणि जेथ मन पावे लय । तेथचि लय प्राण पावे ॥४४४॥
म्हणोनि श्वासोश्वासीं घ्यावे नाम । हाचि उत्कृष्ट प्राणायाम ।
मनीं चिंतावा घनःश्याम । आत्माराम कृपाळू ॥४४५॥
एवं मन प्राणाचे ऐक्य होतां । मग देह जावो अथवा राहो तत्वतां ।
तो निश्चयें पावेल भगवंता । येथ आण सर्वथा तातांची ॥४४६॥
जैसी नदी उगमापासोनी निघतां । ते समुद्री पावेल यांत नाहीं चिंता ।
तेवीं हृदय अर्पितां उमाकांता । देह असतां नसता भगवंत तो ॥४४७॥
यास्तव बापा ! परिक्षिती । तूं भय सर्वथा न धरी चित्तीं । अतिशय आवडी
राधिकापति । सुकुमार मूर्ती आठवी पां ॥४४८॥ (य१४-१८०)

॥ श्लोक १६,१७,१८ ॥

मनः स्वबुद्ध्यामलया नियम्य क्षेत्रज्ञ एतां निनयेत्तमात्मनि ।
आत्मानमात्मन्यवरुध्य धीरो लब्धोपशान्तिर्विरमेत कृत्यात् ॥१६॥
न यत्र कालोऽनिमिषां परः प्रभुः कुतो नु देवा जगतां य ईशिरे ।
न यत्र सत्त्वं न रजस्तमश्च न वै विकारो न महान् प्रधानम् ॥१७॥
परं पदं वैष्णवमामनन्ति तद्यन्नेति नेतीत्यतदुत्सिसृक्षवः ।
विसृज्य दौरात्म्यमनन्यसौहृदा हृदोपगुह्यार्हपदं पदे पदे॥१८॥
(भाग.स्कं२.अ२)

॥ ओव्या ॥

मन बुद्धीचिया हातीं । देवोनी बुद्धिसहित निश्चिती ।
क्षेत्रज्ञ आत्म्याचिया हातीं । देयावें पुनः ॥४४९॥
तया क्षेत्रज्ञाचा लय । ब्रह्मामध्यें करावा स्वये ।
तेव्हां कर्माऽकर्मातीत होय । योगीराज तो ॥४५०॥
तेव्हां शिष्य म्हणे श्रीगुरुनाथा । जीवाचा लय नोहे सर्वथा ।
जीव ब्रह्मरूपचि तत्वता । तयाचा लय केवीं होय? ॥४५१॥
ऐसा ऐकोनिया प्रश्न । सद्‌गुरु बोलती कृपाघन ।
की ज्ञानदृष्टीनें पाहतां जाण । जीव निर्वाण परब्रह्म ॥४५२॥
परी मंदबुद्धी लोकांच्या पोटीं । ज्ञानाची कल्पांतीं न रुचे गोष्टी ।
यालागी उपासनापरिपाटी । श्रुतिमाता सांगत ॥४५३॥
जैसे मुखरोगें पिडिले बाळ । दूध मागोनि घेतसे आळ ।
तेव्हां पीठ कालवोनिया जळ । माय पाजी ज्यापरी ॥४५४॥
तैसा माहावाक्याचा गुह्यार्थ । कदापि ने घे ज्याचे चित्त ।
तयासी करावया भवांतूनी मुक्त । उपासनासिद्धान्त श्रुति सांगे ॥४५५॥
नवल बापा मनाची गती । परिस आलिया प्रत्यक्ष हातीं ।
तो झुगारोनि साधू जाती । धातुक्रियाऔषधीबळें ॥४५६॥
जीवंत मायबापास भाकरी । न देऊनि मेलिया गयावर्जन करी ।
सुंदर कामीनी सांडुनी घरी । पराचे द्वारीं सावडी जोडे ॥४५७॥
सोमवार शंकराचा । मंगळवार भवानीचा ।
रविवार खंडोबाचा । आवडी साचा व्रत करी ॥४५८॥
देव बैसवोनी देव्हारां । करो धांवे नाना यात्रा ।
एवं मनाचिया विकारा । नाही थारा सर्वथा ॥४५९॥ (य१४-१८१)
ऐसिया मनासी नियमन । मुख्य करावया कारण ।
श्रुति माता उपासन । दृढ करोन सांगतसे ॥४६०॥
स्थिर झालियावांचोनि मन । जन्मभरी केलिया श्रवण ।
तरी न उपजे ब्रह्मज्ञान । नव्हे समाधान कदापि ॥४६१॥
यालागी उपासनेचीया दृष्टी । बुद्धिमनास विसरोनि शेवटीं ।



जीवासही विसरलिया पाठीं । एक ब्रह्म पोटीं चिंतावे ॥४६२॥
जे देश कालविवर्जित । जेथ रात्री ना दिवस होत ।
जें ऐसें ना तैसे निश्चित । शब्दांतीत चैतन्यघन ॥४६३॥
तें योगी स्वयें पावती । हा योगीयांचा मार्ग निश्चिती ।
परी ज्यास बाणली भगवद्‌भक्ती । ते देहासहित होती हेचि रूप ॥४६४॥
अहो ! मनचि जै जन्मले नाहीं । तरी तें निरोधावे कवणें कही । जीव जो परमेश्वराहूनि भिन्न नाहीं । तंव तो मिळवावा कैसा पुनः त्यांत ॥४६५॥
हाचि ज्ञानीयांचा निश्चय । कीं भूतें आघवी यदुराय ।
तेथ कोणी कोणाचा करावा लय । प्रेमें धरावे पाय हरीचे ॥४६६॥

॥ श्लोक १९ ॥

इत्थं मुनिस्तूपरमेद् व्यवस्थितो
विज्ञानदृग्वीर्य-सुरन्धिताशयः ।
स्वपार्ष्णिनाऽऽपीड्य गुदं ततोऽनिलं
स्थानेषु षट्सून्नमयेज्जितक्लमः ॥

(भाग.स्कं.२-अ.२-१९)

॥ अभंग ॥

जयाचा विषय झाला नारायण । इंद्रियें अभिन्न एकवट ॥१॥
हृदया हृदय मिळाले रोकडे । नाहींच सांकडे वासनेचें ॥२॥
चहुंकडे खेळे सांवळे सुंदर । निमग्न अंतर ब्रह्मानन्दीं ॥३॥
प्रकाशलें शुद्ध चैतन्याचे लिंग । वृत्ति त्या तरंग प्रेमाब्धीचें ॥४॥
व्युत्थान-समाधि आघवीच लीला । ज्ञानेश्वरबाला सदा सुखी ॥५॥
(य१४-१८२)

॥ ओव्या ॥

भगवद्भक्तांचिया ठायीं । बंध मोक्षाचें वास्तव्य नाहीं ।
नवल या भक्ताचिया गेहीं । कामचि होय मोक्षरूप ॥४६७॥
वैद्याचिया सदनीं । बचनाग बैसे अमृतस्थानीं ।
तेवीं भगवद्भक्तांचिया आंगणीं । काम निर्वाणी मोक्ष होय ॥४६८॥
नवल भक्त आणि योगीया । कैसा विरोध उपाया ।

परी तेही यादवराया । आवडूं पावे ॥४६९॥
टांचा लावोनि गुदद्वारीं । योगी बैसती आसनावरी ।
भक्त म्हणोनि रामकृष्णहरी । नाचती साचारी किर्तनी ॥४७०॥
नाभीवरिला ओढोनी प्राण । हृदयांतोनि तालुमुळीं नेवोन ।
भृकुटीमधून ब्रह्मरंध्र भेदोन । शिशुमारस्थान पावती योगी ॥४७१॥
मग पंचभूत वश करोनि । आकाशमय होवोनि ।
शेवटीं अवघे त्यागोनि । ब्रह्मचि होती ॥४७२॥
तेचि ब्रह्म भक्तांसवे । खेळ खेळे नवे नवे ।
यालागी योगतत्त्व आघवे । भक्तांचिया करांजलीं ॥४७३॥

॥ पद ॥

भजिये भोलानाथ, हे मन ! भजिये ॥ धृ॥
गिरीजाके पति शशिशेखर शिव । पंचवदन दशहात॥१॥
फणी भूषण विभूतिलेपन करी । खेलत भूतन साथ॥२॥
जोगजागजपतपफल येही । हिय ज्ञानेश्वर तात ॥३॥

॥ श्लोक २० ॥

नाभ्यां स्थितं हृद्यधिरोप्य तस्मादुदानगत्योरसि तं नयेन्मुनिः।
ततोऽनुसंधाय धिया मनस्वी स्वतालुमूलं शनकैर्नयेत ॥

(भाग.२-२-२०)

॥ श्लोक ॥

पवित्रं यत्पवित्राणां मंगलानां च मंगलम् ।
पंचमं पुरुषार्थाख्यं ज्ञानेश्वरपदं भजे ॥ (य.१४-१८३)

॥ ओव्या ॥

एरव्हीं तरी योगियां । भगवत् प्रसादावांचोनिया ।
केलियाहि नाना उपाया । महा-अपाया माजीं पडणे ॥४७४॥
मनपवनाचिया गांठी । मणिपूर चक्राचिया पोटीं ।
तैं पवन धरुनि मनोमुठीं । अनाहत चक्रीं आरोपिजे ॥४७५॥
मन तें सात्त्विकभूत भाग । पवन ते भूतांचें राजसांग ।
दोंहीचा साधतां संयोग । कष्टतर मार्ग योगिया ॥४७६॥



रजोगुणाचिया निर्मिती । पवन फोफावे नानागती ।
तेवी मनाचिया उठती वृत्ती । तैं योगिया होती अति श्रम ॥४७७॥
मन रोधावे की रोधावा श्रम । दोन्ही मार्ग अति दारुण ।
भक्त-पाठीराखा  भगवान । तो स्वयें मन-पवन आवरी ॥४७८॥
नाभीपासोनि हृदयीं गेला । तो हृदयाहुनि पाहिजे कंठीं आणिला ।
मग कंठीहुनि उचलिला । पाहिजे वायू ॥४७९॥
वायू आधींच रजोगुणी । कंठावरी निघतां क्षणी ।
भलतिया द्वारांतूनी । निघो पाहे बाहेरी ॥४८०॥
ब्रह्मरंध्रीं नेलियावीण । अर्चिरादि पथ न मिळे पूर्ण ।
यालागी निरोधोनि मन-पवन । हळूच न्यावा तालुमूळीं ॥४८१॥
रोधितां रोधितां नानापंथी । मग भ्रूमध्यें द्यावीं विश्रांती ।
पुढे ब्रह्मरंध्रावरुति । आर्चिरादिपथ जिंकावा ॥४८२॥
एवं एवढीया श्रमा । ते पात्र न होती कुरूत्तमा ।
जयांचा अविट जडला प्रेमा । मेघःश्याम-पदांबुजीं ॥४८३॥
हृदयीं धरितां सांवळी मूर्ती । शरीर उजळे चैतन्यदीप्ती ।
मनपवनाची खुंटे गती । मग यातायाती कासया ॥४८४॥
चैतन्याच्या आश्रये वासना । हालवूं शकती महाप्राणा ।
त्या वासना अर्पिता जगज्जीवना । प्राणत्राणा ब्रह्मरसू ॥४८५॥ (य.१४-८४)
अमनस्कखण्डीं शूळपाणी । स्वये बोलिले अमृतवाणी ।
की पवन-मनाची एकवटणी । सहज चैतन्यीं फांवत ॥४८६॥

श्लोक २१

तस्माद् भ्रुवोन्तरमुन्नयेत निरुद्धसप्तायतनोऽनपेक्षः ।
स्थित्वा मुहूर्तार्धम् अकुण्ठदृष्टिर्निर्भिद्य मूर्धन्विसृजेत्परं गतः

(भाग.२-२-२१)

ओव्या :-

म्हणोनी योगी आणि निष्काम । षण्मुखी मुद्रा करोनि परम ।
श्रोत्रादिद्वारांचा उपरम । करोनी अंतःस्थान अवलंबी ॥४८७॥
मग आज्ञाचक्रीं मरुन्मना । मुहूर्तार्ध ठेऊनि कुरुनंदना ।

पुढें ब्रह्मरंध्र भेदूनि इंद्रियगणा । मनासहीत सोडावे ।।४८८।।
हें असो परी भगवृारणीं । चित्त जडेल जिया क्षणीं ।
तेव्हांचि तो नारायणीं । मिळाला म्हणोनी क्षीण-श्रम ।।४८९।।
एवं निष्काम योगियांहून । भगवद्भक्तसमाधान ।
आतां सकाम योगियांहून । भक्तसमाधान ऐक राया ।।४९०।।

।। श्लोक २२ ।।

यदि प्रयास्यन्नृप पारमेष्ठ्यं वैहायसानामुत यद्विहारम् ।
अष्टाधिपत्यं गुणसन्निवाये सहैव गच्छेन्मनसेन्द्रियैश्च ।।२२।।
(भाग.२-२-ओव्या-२२)

लिंगदेह सोडिल्यावीण । सर्वथा न चुके गमनागमन ।
तो लिंग देह मनेंन्द्रियप्राण । असतां गमन अन्य लोकीं ।।४९१।।
(य१४-१८५) इंद्रिय-मन-प्राणांची गांठी । माथां बांधोनिया मोठी ।
परलोक भोग वासनेसाठीं । मार्ग परिपाटी कामा जाती ।।४९२।।
मग स्वाराज्य वैराज्य साम्राज्य । भोज्य का पारमेष्ठ्य महाराज्य ।
ते पावती सगुण सायुज्य । ब्रह्मलोकीं ।।४९३।।
जगाचे उत्पत्ति स्थिति लय । एवढे मात्र तयासि न ये ।
एरव्ही ज्या ज्या भोगाची इच्छा होय । ते भोग मिळती संकल्पें ।।४९४।।
तयास वाटे मिळावी जननी । तरी माताची भेटे संकल्पें करोनीं ।
बाप भेटावा वाटे मनीं । तेंचि क्षणीं बाप भेटे ।।४९५।।
एवं कांता बंधु सुतादिक । अवघेची मिळे सांकल्पिक ।
एवं छांदोग्य बृहदारण्यक । अभिप्रायार्थ सकामार्थ ।।४९६।।
तो नानारूपें धरोनि । भोग भोगी त्या त्या स्थानीं ।
सकळ देव मिळोनी । पूजा करिती तयाची ।।४९७।।
तो जरी अर्चिरादि मार्गे गेला । तरी ब्रह्मणा सह ज्ञानें मुक्ती त्याला ।
जरी पंचाग्निसाधनादि द्वारा गेला । तरी फिरे मागुता अन्य कल्पी ।।४९८।।
असो हें कामुकांचे गोमटे । परी ते पाहतां अति ओखटे ।
रागद्वेषांचे चपटे । भोगासवे आदळती ।।४९९।।
म्हणाल संकल्पें तया सकळ । भोग राहती अनुकूल ।



तेथ रागद्वेषांसि मूळ । कांहींच नाहीं ।।५००।।
परी भोग भोगावे वाटल्यावीण । संकल्पचि न होय उत्पन्न ।
संकल्प कराया जंव उत्पन्न । तंव कर्तेपण आत्मया ।।५०१।।
अकर्तया आत्मया वरुती । कर्तृत्व-संकल्प महा भ्रांती ।
येथचि जडतां आसक्ति । तरी मृत्युलोक ब्रह्मलोक सम झाले ।।५०२।।
आपुलीया भोगावीण । इतर ऐश्वर्य असे न्यून ।
दैत्यनाशार्थ ब्रह्मा प्रार्थी नारायण । हें आघवे पुराण बोलती ।।५०३।।
हिरण्यगर्भाचिया हातीं । नाहीं जगज्जन्मस्थितिसंहति ।
म्हणोनी कारणब्रह्म नारायणाप्रति । अवतारार्थी प्रार्थी ब्रह्मा ।।५०४।।
जे भोग भोगिले मृत्युलोकीं । त्याचीच वासना ब्रह्मलोकीं ।
तरी ब्रह्मदृष्टीनें पाहतां शेखीं । महानरकीं सकाम योगी ।।५०५।।
(य१४-१८६) दैत्यांनी गांजितांक्षणीं । विप्लव वाटे अंतःकरणीं ।
एवं ब्रह्मलोकांची स्थिती पुराणीं । बोलीली वाणीं तिरस्कृत ।।५०६।।
जय-विजय वैकुंठांतून । रागद्वेषें पावले पतन ।
संन्निध असोनि नारायण । अनुपयोग सर्वथा ।।६०७।।
लागोनी धेनुस्तनाप्रति । गोचिड अशुद्धचि सेविती ।
तेवीं वैकुंठी संनिध असोनि जगत्पति । भोग सेविती कामुक ।।५०८।।
कवणिया रायाचा सेवक । कैलासीं नेता उमानायक ।
तया रायाने युद्ध करोनि सम्यक । आणिला सेवक परतोनि ।।५०९।।
राधा श्रीदामाचे शाप । गोलोकांतही ऐसे संकल्प ।
एवं जेथ जेथ भोगारोप । दुःख खटाटोप तेथ तेथ ।।५१०।।
महानरकीं आणि वैकुंठीं । वासना असतां दुःखपेटी ।
यालागी निष्काम योगी गोमटी । ब्रह्मदृष्टी आश्रयिती ।।५११।।
प्रथम विषयांचे वैराग्य धरून । अभ्यासें नियमिती मन पवन ।
मग ब्रह्मरंध्री नेवोनि प्राण । धरिती वैराग्य गुणांचे ।।५१२।।
तया परवैराग्य संपत्ती । महावाक्यशब्दस्मृतीं ।
उपजे ब्रह्माकारवृत्ति । जीस विद्या म्हणती महाप्राज्ञ ।।५१३।।
ती कार्यासहीत अविद्यावन । जाळोनि योगिया करी ब्रह्मसंपन्न ।

यास्तव ज्ञानियांचे प्राण । न करिती गमन अन्यलोकीं ॥५१४॥
परी याहीहोनी भगवद्भक्त । समाधी अथवा व्युत्थानांत ।
होवोनी राहती भगवंत । तो प्रकारार्थ ऐक राया ॥५१५॥
जैसी सकाम योगियाप्रति । संकल्पेंचि भोगप्राप्ती ।
तैसी भगवद्भक्तांप्रती । रासप्रतीती संकल्पें ॥५१६॥
ब्रह्मलोकीं संकल्प । कर्मचि पुरवी अल्प ।
परी भक्तांचा संकल्प नसतांहि जल्प । स्वयें साक्षेप हरी पुरवी ॥५१७॥
जगज्जन्मस्थितिलय । हे ब्रह्मलोकीं सामर्थ्य न ये ।
परी अर्जुनासाठीं यादवराय । ब्राह्मणपुत्र आणिता झाला ॥५१८॥
तात्पर्य सकाम योगियाहून । व्युत्थानीं भक्तासी समाधान । (य१४-१८७)
आतां निष्काम योगियाहून । एवं समाधान भक्ता ॥५१९॥
भक्तींत होता भोगदृष्टी । तरी अंतरींच अंतर्धान पावे जगजेठी ।
तया वियोगपक्षें समाधान (समाधी) पोटीं । भक्ता नेहटी उठो लागे ॥५२०॥
कीं रासानंद घेतां क्षणीं । तटस्थ होय अंतःकरणी ।
तया तटस्थाच्या साक्षीपणीं । समाधिस्थानीं भक्तराजू ॥५२१॥
कीं ब्रह्मरंध्री जावून । निष्काम योगी परवैराग्यसंपन्न ।
भक्त तंव विषय आणि गुण । नारायणावीण व्युत्थानीं त्यजिती ॥५२२॥
''शांति क्षमा दया । त्याहि नको पंढरीराया ॥''
एवं ही तुकारामोक्ती । कीं गुणाचाही नाश करी भक्ती ।
यालागीं साक्षित्वें निर्विकल्प स्थिती । भक्ता प्राप्ती सहजचि ॥५२३॥
कां मागे पुढें मोक्षदानी । प्रेमपूर्ण अंतःकरणीं ।
साक्षित्व लाहे निश्चिंतपणीं । समाधिस्थ म्हणोनी भक्त ॥५२४॥
यालागीं आणिका परीस । राया तूं चिंता सोडी निःशेष ।
तूं वंशानुवंशी श्रीकृष्णदास । म्हणोनी व्याससनंदन म्हणे ॥५२५॥
(अपूर्ण)

०००



# सांख्यशास्त्रावरील रचनांचा अनुक्रम


१. **सांख्यसुरेन्द्र – ओवीबद्ध** सूत्रे ५७ (१८७)

(यष्टी १४) ओवी संख्या (१) ७०६ + (२) ५२५ = १२३१

पान १८९ - ३०९

२. **सांख्यसुरेन्द्र गद्य** (३०९)

(पूर्वीची यष्टी १७ तून) पृ.२०६ ते - २८३

३. **सांख्यसार** (विज्ञानभिक्षूंच्या ग्रंथावरील भाष्य ) (३९१)

(पूर्वीची यष्टी १८ भाग २ तून) पृष्ठे १०२ ते ११२

४. **सांख्यसूत्रांवर काही विचार** (४०२)

(यष्टी १५) पृष्ठे २८५ ते २९५

५. **सांख्यावरील एक निबंध** (४१२)

(यष्टी १५) पृष्ठे २९६-३०१